

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT



सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, ११ मार्च २०२५ | युगाब्द ५१२६ | वर्ष ४१ वे अंक १२३ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


# 'महाराष्ट्र आता थांबणार नाही...'

## 'विकसित भारत-विकसित महाराष्ट्रा'चे स्वप्न साकारणारा अर्थसंकल्प

◆ **मुंबई, १० मार्च**

शेती, शेतीपुरक क्षेत्रे, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, महिलांचे आर्थिक बळकटीकरण, पर्यटन, पायाभूत सुविधा, कल्याणकारी योजना, सामाजिक विकास क्षेत्रांसाठी भरीव तरतूद असलेला, 'विकसित भारत-विकसित महाराष्ट्रा'चे स्वप्न प्रत्यक्षात साकारणारा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत तर, आशिष जैयस्वाल यांनी विधान परिषदेत सादर केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचा संकल्प केला आहे. त्यांच्या संकल्पपूर्तीला बळ देणारा २०२५-२६ चा अर्थसंकल्प असून,'महाराष्ट्र आता थांबणार नाही.., विकास आता लांबणार नाही...' असे सांगत अजित पवार यांनी हा अर्थसंकल्प सादर केला.

यातून देशांतर्गत, विदेशी गुंतवणूक, रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील. विधानसभा निवडणुकीत राज्यातील मतदारांनी व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरवण्यात अर्थसंकल्प यशस्वी होईल, असा विश्वास



अजित पवार यांनी त्यांचा अकरावा अर्थसंकल्प विधानसभेत सादर करताना व्यक्त केला.

अर्थसंकल्पीय भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज, स्वराज्यजननी जिजाऊ माँसाहेब, छत्रपती राजर्षि शाहू महाराज, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजमाता पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे स्मरण केले

राज्यात गुंतवणुकीला पोषक वातावरण असल्याचे सांगत अजित पवार म्हणाले की, औद्योगिक विकासात राज्य सदैव अग्रेसर असून, थेट विदेशी गुंतवणुकीतही देशात अव्वल आहे. दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत राज्य शासनाद्वारे एकूण ६३ कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. त्याद्वारे येत्या काळात १५ लाख ७२ हजार ६५४ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. त्यातून सुमारे १६ लाख रोजगार निर्मिती होईल, असा अंदाज आहे. वस्तू व सेवा कर कायदा लागू होण्यापूर्वी राज्यकर विभागातर्फे राबविण्यात आलेल्या विविध कायद्यांनुसार सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडे असलेली थकबाकीची तडजोड करण्याबाबत अभय योजना उपमुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात जाहीर केली. सदर अभय योजनेचे नाव महाराष्ट्र कर, व्याज, विलंब शुल्कांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ असे असून, या अभय योजनेचा कालावधी प्रस्तावित कायदा लागू झाल्यापासून ३१ डिसेंबरपर्यंत असेल.

(बजेट वृत्त पान ३ व ६ वर)

**● लाडकी बहीण योजनेसाठी ३६ हजार कोटी ● पाच वर्षे कमी दरात वीज पुरवठा ● चार चाकी सीएनजी, एलपीजी वाहनांवर करवाढ ● नागपूरच्या देवलापार येथील गौ-विज्ञान अनुसंधान केंद्रास सहाय्य ● बांबू आधारित उद्योगांना चालना देण्यासाठी बांबू लागवड प्रकल्प ● भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांचे स्मारक उभारणार ● स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे राष्ट्रीय स्मारकासाठी २२० कोटी ● ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले, अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक उभारणार ● नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी निधी ● राज्यातील प्राचीन मंदिरांचे जतन ● आग्र्याला शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक ● शिवाजी महाराजांची स्फुर्तीदायी ओळख म्हणून पुणे येथे शिवसृष्टी ● संगमेश्वर येथे संभाजी महाराजांचे भव्य स्मारक ● पानिपत येथे मराठ्यांच्या शौर्याचे प्रतीक म्हणून भव्य स्मारक**

### विकासाची पंचसूत्री



विकसित भारतासोबतच विकसित महाराष्ट्राचा संकल्प साकार करणारा, लोकाभिमुख असा हा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पात शेती, उद्योग, पायाभूत सुविधांबरोबरच रोजगार आणि सामाजिक विकास अशी पंचसुत्री आहे. संतुलित अशा या अर्थसंकल्पाला अनुसरून आमची पुढील वाटचाल, असेल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे दिली.

### हे तर चॅम्पियन बजेट




गेल्या अडीच वर्षांपासून सुरू असलेल्या लोकाभिमुख योजना आणि पायाभूत सुविधा यांचा योग्य तो संतुलन राखणारे हे चॅम्पियन बजेट अजित पवार यांनी मांडले आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अर्थसंकल्पाविषयी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

## महत्त्वाचे

### अस्थिरतेमुळे शेअर बाजारांत घसरण

**मुंबई** : उद्योग, खनिज तेल आणि नैसर्गिक वायू क्षेत्रावर आलेल्या विक्रीच्या दबावामुळे निर्माण झालेल्या अस्थिरतेमुळे सकारात्मक सुरुवात होऊनही शेअर बाजारांत सोमवारी घसरण झाली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक २१७ अंकांनी घसरून ७४,११५ वर बंद झाला. मुंबई शेअर बाजारातील २२ कंपन्यांना आज तोटा झाला. आठ कंपन्या फायद्यात राहिल्या. बाजार तेजीने सुरुवात झाला. निर्देशांकाने ७४,७४१ पातळीपर्यंत भरारी घेतली होती. मात्र, सत्र संपायच्या काही वेळेपूर्वी विक्रीचा दबाव निर्माण झाला आणि निर्देशांक ३१० अंकांनी खाली आला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ९२ अंकांनी घसरून २२,४६० या पातळीवर बंद झाला. जागतिक स्तरावरील नकारात्मक परिस्थिती बाजारातील भावनांवर परिणाम करीत आहे. अमेरिकेतील बेरोजगारीचा दर आणि शुल्कात झालेल्या वाढीमुळे अनिश्चितता निर्माण झाली आहे. त्यामुळे आणखी काही काळ अस्थिरता कायम राहण्याची शक्यता असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले.



### फेब्रुवारीत शाकाहारी थाळी झाली स्वस्त

**नवी दिल्ली** : फेब्रुवारीमध्ये भारतात घरगुती शाकाहारी थाळीची किंमत १ टक्क्याने घसरून २७.२ रुपयांवर आली. गेल्या वर्षी फेब्रुवारीत शाकाहारी थाळीची किंमत २७.५ रुपये होती. भांडवली बाजारातील कंपनी क्रिसिलने त्यांच्या अन्नथाळीच्या किमतीच्या मासिक निर्देशकात ही माहिती दिली. क्रिसिलने त्यांच्या 'आरआरआर: राईस रोटी रेट अहवालात म्हटले आहे की, जानेवारीच्या तुलनेत फेब्रुवारीमध्ये शाकाहारी थाळीच्या किमतीत ५ टक्के घट झाली आहे. जानेवारीमध्ये या थाळीची किंमत २८.७ रुपये होती.

### पीएफ खात्यात कागदपत्राविना होणार माहिती अपडेट

**नवी दिल्ली** : कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संस्था ईपीएफओने युनिव्हर्सल अकाऊंट नंबर आधारशी जोडलेल्या सदस्यांना कागदपत्रांशिवाय वैयक्तिक तपशीलातील मुख्य माहिती बदलण्याची परवानगी दिली आहे. यूएएनची पडताळणी आधारद्वारे केली गेली असेल, तर सदस्य कोणतेही कागदपत्र अपलोड न करता त्याचे नाव, जन्मतारीख, लिंग, राष्ट्रीयत्व, वैवाहिक स्थिती, वडिलांचे नाव, जोडीदाराचे नाव आदी सर्व माहिती अपडेट करू शकतात. यापूर्वी सदस्यांना आपले प्रोफाईल अपडेट करण्यासाठी नियुक्तांची परवानगी लागत असे. त्यामुळे २७ दिवस उशीर होत असे.

### सॅम पित्रोदांविरुद्ध कर्नाटकात एफआयआर

**बंगळुरू** : राहुल गांधी यांचे निकटवर्तीय आणि इंडियन ओव्हरसीज काँग्रेसचे अध्यक्ष सॅम पित्रोदा यांच्याविरुद्ध सोमवारी कर्नाटकात एफआयआर दाखल करण्यात आला. त्यांच्या एनजीओ फाऊंडेशन फॉर रिव्हायटायझेशन ऑफ लोकल हेल्थ ट्रेडिशन्सवर वन विभागाच्या जमिनीवर कब्जा केल्याचा आरोप आहे.

### आता मटण दुकानांना मल्हार प्रमाणपत्र

**मुंबई** : मटण दुकानांना मल्हार प्रमाणपत्र देण्याचा निर्धार मात्सोद्योग आणि बंदरेविकास मंत्री नितेश राणे यांनी केला आहे. मल्हार सर्टिफिकेशन डॉट कॉमच्या माध्यमातून फक्त हिंदू समाजातील खाटीकांना हे सर्टिफिकेट मिळणार आहे. मल्हार प्रमाणपत्र नसेल, तिथे मांस खरेदी करू नका, असे आवाहन देखील नितेश राणे यांनी केले आहे. नितेश राणेंच्या आवाहनामुळे नव्या वादाला फोडणी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राणे यांनी याबाबत माहिती दिली. त्यांनी म्हटले की, आज मल्हार सर्टिफाईड झटका मांस... आज आम्ही महाराष्ट्रातील हिंदू समाजासाठी अतिशय महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. मल्हार सर्टिफिकेशन डॉट कॉम या निमित्ताने सुरू झाले आहे. मल्हार सर्टिफिकेशनच्या माध्यमातून आपल्याला आपल्या हक्काची मटण दुकाने उपलब्ध होतील. यात १०० टक्के हिंदू समाजाचे प्राबल्य असेल व विकणारा व्यक्तीदेखील हिंदू असेल. कुठेही मटणात भेसळ झालेले आढळणार नाही. मल्हार सर्टिफिकेशनचा वापर जास्तीत जास्त करावा किंबहुना जिथे मल्हार सर्टिफिकेशन नसेल, तिथे

# महामार्गाच्या पॅचवर्क व डांबरामध्ये कोट्यावधीचा घोटाळा?

**▸▸याचिकेनंतर मुंबई उच्च न्यायालयाची बांधकाम अधिकाऱ्यांसह कंपनीला नोटीस**

**रत्नागिरी, १० मार्च**

राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या वडिलांच्या नावे असलेल्या मेसर्स आर.डी. सामंत कन्स्ट्रक्शन प्रा. लि. कंपनीने मुंबई गोवा महामार्गासह इतर काही ठिकाणच्या रस्त्यांना डांबर न लावताच कोट्यावधी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याविषयीची याचिका मुंबई उच्च न्यायालयात आर.डी. सामंत कन्स्ट्रक्शन सहित सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सहा अधिका-यांच्या विरोधात दाखल करण्यात आली आहे. या जनहित याचिकेची गंभीर दखल न्यायालयाने घेत येत्या चार आठवड्यात यावर उत्तर सादर करण्याच्या नोटीसा दिल्या आहेत.

मुंबईतून कोकणात जाणाऱ्यां मुंबई-गोवा महामार्गाचे काम गेली १७ ते १८ वर्षे रखडले आहे. मात्र आता या महामार्गावरील खड्डे भरताना जे पॅचवर्क झाले आहे, त्यामध्ये देखील घोटाळा झाल्याचे समोर आले आहे. हा घोटाळा सरकारी अधिकाऱ्यांच्या संगनमताने झाल्याचा आरोप मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेतुन करण्यात आला आहे. या याचिकेत मेसर्स आर. डी. सामंत कन्स्ट्रक्शन प्रा. लि. कंपनीवर आरोप करण्यात आले आहेत. गंभीर बाब म्हणजे ही कंपनी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या वडिलांची असल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. राज्यातील एक मंत्री आणि एक विद्यमान आमदार यांच्या वडिलांच्या नावे ही कंपनी असल्याने या याचिकेची गंभीर दखल मुख्य न्यायमूर्ती अलोक अराधे आणि न्या. भारती डांगरे यांच्या खंडपीठाने घेतली आहे. आर. डी. सामंत यांच्या कंपनीसह राज्य शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि अन्य प्रतिवादींना न्यायालयाने नोटीसा पाठवल्या आहेत. यावर पुढील सुनावणी ९ एप्रिलला होणार आहे. मेसर्स आर. डी. सामंत कन्स्ट्रक्शन प्रा. लि. कंपनीने महामार्गावर डांबर न लावताच कोट्यावधी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप या याचिकेत करण्यात आला आहे. या कंपनीसह भ्रष्टाचाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांविरोधातही गुन्हा नोंदवण्यात यावा अशी मागणी या याचिकेत करण्यात आली आहे.

## संघाच्या वीर सावरकर शाखेवर दगडफेक

◆ **ठाणे, १० मार्च**

डोंबिवलीतील चौधरी वाडी मैदानात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वीर सावरकर शाखेवर दगडफेक करण्यात आल्याचे वृत्त आहे. ९ मार्चला रात्रीच्या सुमारास ही दगडफेक करण्यात आली.

काही लहान मुले शाखेत प्रशिक्षण घेत होते. यादरम्यान अचानक काही अज्ञातांकडून दगडफेक करण्यात आली. यात सुदैवाने कुणी जखमी झाले नसून, पुढील तपास पोलिस करीत आहेत.

जंगलातून आणि शेजारील इमारतीतून काही अज्ञातांनी ही दगडफेक केली. दगडफेकीनंतर लहान मुले घाबरली होती. काही वेळ शाखेजवळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.काही वेळानंतर परिस्थिती नियंत्रणात आली. संजू चौधरी आणि शिक्षक पवन कुमार हे या शाखेचे कामकाज पाहतात. दगडफेकीनंतर काही स्वयंसेवक आक्रमक झाले आणि त्यांनी संताप व्यक्त केला. सध्या कार्यकर्त्यांकडून दगडफेक करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ◂(वृत्तसंस्था)

# भूपेश बघेल यांच्या मुलावर ईडीची छापेमारी

### मद्य घोटाळा प्रकरण

◆ **रायपूर, १० मार्च**

मद्य घोटाळ्यातील 'मनी लॉण्ड्रिंग' प्रकरणी तापासाचा भाग म्हणून अंमलबजावणी संचालनालय अर्थात्? ईडीने छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे नेते भूपेश बघेल यांच्या मुलाच्या ठिकाणांवर सोमवारी छापेमारी केली.

भूपेश बघेल यांचा मुलगा चैतन्य बघेलच्या दुर्ग जिल्ह्यातील भिलाई येथे, चैतन्य बघेलचा निकटवर्ती लक्ष्मी नारायण बन्सल उर्फ पप्पू बन्सल आणि इतर काही जणांच्या विरोधात बेकायदेशीर सावकारी प्रतबिबंधक कायद्याच्या अंतर्गत छापेमारी करण्यात आली, असे सूत्रांनी सांगितले.

चैतन्य भिलाई येथे त्याच्या वडिलांसोबत राहत असल्याने तिथेही छापेमारी करण्यात आली. मद्य घोटाळ्यातील पैसा त्यालाही मिळाल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे. राज्यात १४ ते १५ ठिकाणांवर छापेमारी करण्यात आली आहे. संसदेतील अर्थसंकल्पीय अधिवेशनात विरोधकांनी सरकारला विविध मुद्यांवर घेरले असताना, त्यापासून लक्ष विचलित करण्यासाठी बघेल यांच्यावर छापेमारी करण्यात आली, अशी टीका काँग्रेसने केली. छापेमारीनंतर बघेल यांच्या भिलाई येथील निवासस्थानाबाहेर मोठ्या प्रमाणात काँग्रेसचे नेते व कार्यकर्त्यांची गर्दी उसळली होती. ◂(वृत्तसंस्था)

**२१०० कोटींचे नुकसान**

छत्तीसगड मद्य घोटाळ्यामुळे राज्य सरकारचा महसूल मोठ्या प्रमाणात बुडाला आहे. यामुळे मद्य सिंडिकेटमधील लाभार्थ्यांच्या खिशात २१०० कोटी रुपयांपेक्षा जास्त पैसा गेला असल्याचा दावा ईडीने यापूर्वी केला होता.

# सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स दिवसातून २ वेळा डाउन

**नवी दिल्ली, १० मार्च**



एलन मस्क यांचा सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स (पूर्वी ट्विटर म्हणून ओळखला जाणारा) सोमवारी दोनदा डाउन झाला. यामुळे जगभरातील वापरकर्त्यांना त्रास झाला.ते पहिल्यांदा दुपारी ३:३० च्या सुमारास अर्ध्या तासासाठी डाउन झाले. यानंतर संध्याकाळी ७ वाजल्यापासून ते एक तास बंद राहिले. वापरकर्त्यांनी वेबसाइट, ॲप आणि सर्व्हर कनेक्शनबद्दल तक्रार केली.

दिवसभरात डाउन डिटेक्टर वेबसाइटवर ३,००० हून अधिक तक्रारी नोंदवण्यात आल्या, त्यापैकी १८,००० हून अधिक तक्रारी भारतातून, १८,००० अमेरिकेतून आणि १०,००० हून अधिक तक्रारी यूकेमधून आल्या. ४१% लोकांना ॲप कनेक्शनमध्ये समस्या आहेत. डाउनडिटेक्टरच्या मते, सुमारे ४१% लोकांना ॲपमध्ये समस्या येत आहेत. त्याच वेळी, ५३% लोकांना वेब ॲक्सेस करण्यात समस्या येत आहेत आणि सुमारे ६% लोकांनी सर्व्हर कनेक्शनमध्ये समस्या येत असल्याचे नोंदवले आहे.

**४१% लोकांना ॲप कनेक्शनमध्ये समस्या आहेत.**

डाउनडिटेक्टरच्या मते, सुमारे ४१% लोकांना ॲपमध्ये समस्या येत आहेत. त्याच वेळी, ५३% लोकांना वेब ॲक्सेस करण्यात समस्या येत आहेत आणि सुमारे ६% लोकांनी सर्व्हर कनेक्शनमध्ये समस्या येत असल्याचे नोंदवले आहे.

**एक्सचे ३३ कोटींहून अधिक वापरकर्ते आहेत.**

स्टॅटिस्टाच्या मते, जगभरात एक्सचे सुमारे ३३० दशलक्ष वापरकर्ते आहेत. अमेरिकेत त्याचे ९.५ कोटी वापरकर्ते आहेत आणि भारतात २.७ कोटी वापरकर्ते आहेत. दररोज सुमारे ५० कोटी पोस्ट केल्या जातात. ते जुलै २००६ मध्ये लाँच करण्यात आले.

## उद्योगांनी कर कपातीची मागणी करू नये : गडकरी

◆ **नवी दिल्ली, १० मार्च**

गरिबांसाठी कल्याणकारी योजना राबविण्यासाठी निधीची आवश्यकता आहे.त्यामुळे उद्योगांनी कर कपातीची मागणी करू नये, असे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

येथे एका कार्यक्रमाला संबोधित करताना केंद्रीय मंत्री म्हणाले की, भारतातील लॉजिस्टिक्स खर्च दोन वर्षांत ९ टक्क्यांपर्यंत खाली येईल.

वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) आणि कर कमी करण्याची मागणी करू नका, ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. जर आपण कर कमी केला तर तुम्ही अधिक मागाल, कारण हे मानवी मानसशास्त्र आहे. आम्हाला कर कमी करायचा आहे, परंतु कर आकारणीशिवाय सरकार कल्याणकारी राज्य चालवू शकत नाही. ◂(वृत्तसंस्था)

# ५१,४६३ कोटी रुपयांच्या अतिरिक्त खर्चाला मंजुरी द्या

### केंद्राची संसदेत मागणी

◆ **नवी दिल्ली, १० मार्च**

मार्चमध्ये संपणाऱ्या चालू आर्थिक वर्षात निव्वळ अतिरिक्त ५१,४६२.८६ कोटी रुपये खर्च करण्यासाठी सरकारने सोमवारी संसदेची मंजुरी मागितली. यापैकी मोठा हिस्सा पेन्शन आणि अनुदानित खतांवर खर्च होणार आहे.

सरकारने मागितलेला एकूण अतिरिक्त खर्च ६.७८ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे, यापैकी ६.२७ लाख कोटी रुपये बचत आणि प्राप्तीद्वारे जुळवले जातील. अर्थमंत्री



निर्मला सीतारामन्? यांनी लोकसभेत सादर केलेल्या अनुदानांच्या पुरवणी मागण्यांच्या दुसऱ्या तुकडीनुसार, चालू आर्थिक वर्षात सरकारचा निव्वळ अतिरिक्त खर्च ५१,४६२.८६ कोटी रुपये असेल.

अतिरिक्त खर्च खत विभागाला १४,१०० कोटी रुपये देण्यात येतील, यात युरिया आणि पी ॲण्ड के खतांचा समावेश आहे. सरकारी कर्मचाऱ्यांच्या पेन्शनसाठी १३,४४९ कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे, यात एकीकृत निवृत्तिवेतन योजनेसाठी (यूपीएस) ७,००० कोटी रुपयांचा समावेश आहे. एकूण खर्चात ८,४७६ कोटी रुपये संरक्षण निवृत्तिवेतन आणि दूरसंचार विभागाच्या ५,३२२ कोटी रुपयांचा समावेश आहे. संसाधनातील तूट भरून काढण्यासाठी अतिरिक्त खर्च भागवण्यासाठी कृषी विभागाला २,१८६ कोटी रुपये निधी वाटप करण्यात आला आहे. ◂(वृत्तसंस्था)

# आयफा पुरस्कारात 'लापता लेडीज'ची बाजी

### सर्वोत्कृष्ट चित्रपटांसह पटकावले दहा सन्मान

◆ **जयपूर, १० मार्च**

जयपूरमध्ये आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट अकादमी (आयफा) पुरस्कार सोहळा पार पडला. 'लापता लेडीज या चित्रपटाने सर्वाधिक १० पुरस्कार जिंकले. या चित्रपटासाठी किरण राव आणि आमिर खान यांना सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार मिळाला. 'भूल भुलय्या ३ साठी कार्तिक आर्यनला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा, तर 'लापता लेडीज साठी नितांशी गोयलला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला.

सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शकाचा पुरस्कार राम संपत (लापता लेडीज) या चित्रपटाला देण्यात आला. 'आर्टिकल ३७० चित्रपटातील दुआ या गाण्यासाठी जुबिन नौटियाल यांना सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकाचा पुरस्कार मिळाला. 'भूल भुलय्या ३ चित्रपटातील 'अमी जे तोमार या गाण्यासाठी श्रेया घोषालला सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिकेचा पुरस्कार मिळाला.

जयपूर एक्झिबिशन ॲण्ड कन्व्हेन्शन सेंटर (जेईसीसी) येथे झालेल्या भव्य समारंभाला चित्रपट क्षेत्रातील अनेक सेलिब्रिटी




उपस्थित होते. शाहरुख खान आणि माधुरीने 'घोडे जैसी चाल, हाथी जैसी दुम या गाण्यावर नृत्य केले. कॅटरिना, रेखा, कृती सॅनन यांनीही सादरीकरण केले. शाहिद कपूर स्कूटरवरून स्टेजवर पोहोचला आणि त्याच्या चित्रपटांमधील गाण्यांवर सादरीकरण केले. जेईसीसीच्या स्टेजवर रेखा आणि राकेश रोशन यांनी 'खून भरी मांग चित्रपटातील 'हंसते हंसते, कट जाये रास्ते या गाण्यावर नृत्य केले. रेखा यांनी राकेश रोशन यांना भारतीय चित्रपटातील उत्कृष्ट कामगिरी पुरस्कार प्रदान केला.

अभिनेत्री माधुरी दीक्षितने खलनायक चित्रपटातील प्रसिद्ध गाण्यावर नृत्य केले. याआधी माधुरीने घूमर या चित्रपटातून तिच्या अभिनयाची सुरुवात केली होती. त्यांनी 'ढोलणा आणि 'अप्सरा आली या गाण्यांवरही उत्तम सादरीकरण केले. करीना कपूर खानने 'जीना यंहा, मरना यंहा, 'प्यार हुआ, इकरार हुआ, 'रमय्या वस्तावैया यासारख्या गाण्यांवर रेट्रो लूकमध्ये परफॉर्म केले. ◂(वृत्तसंस्था)

# काँग्रेसचे रवींद्र धंगेकर यांचा शिवसेनेत प्रवेश

**मुंबई, १० मार्च**

पुण्यातील कसबा पेठ विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि काँग्रेस नेते रवींद्र धंगेकर यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षात प्रवेश केला. यावेळी माजी आमदार धंगेकर यांच्यासह त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनीही शिवसेनेत प्रवेश केला.

२०२३ मध्ये कसबा विधानसभेच्या पोटनिवडणुकीत रवींद्र धंगेकर यांनी भाजपाच्या बालेकिल्ल्यात सध्याचे आमदार हेमंत रासने यांचा पराभव केला होता. त्यानंतर त्यांची राज्यभरात चर्चा झाली होती. मात्र, गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत धंगेकर



यांना पराभव स्वीकारावा लागला होता. त्यानंतर त्यांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. आज धंगेकर यांच्या पक्षप्रवेशावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, आता लोकांना कळेल हू इज धंगेकर? अशी मिश्किल टिप्पणी केली. शिंदे यांच्या या टिप्पणीनंतर उपस्थितांमध्ये हशा पिकला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### युद्धभूमी सोडली नाही तर संधी : हार्दिक पांड्या



**दुबई** : हे वर्ष नवीन काही शिकवणीने व आव्हानांनी भरलेले होते. माझ्या मानसिकतेने मला कधीही आव्हानांपासून पळून जाण्यास शिकवले नाही. जर आव्हाने कठीण असतील तर काही ठोस कार्य करा, यावर माझा नेहमीच विश्वास आहे. जर तुम्ही युद्धभूमी सोडली नाही, तर तुम्हाला संधी आहे, असे मत भारताचा अष्टपैलू हार्दिक पांड्याने चॅम्पियन्स चषकांत भारताच्या विजयानंतर व्यक्त केले. जसप्रीत बुमराहच्या अनुपस्थितीत चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये हार्दिक पांड्याला नवीन गोलंदाजीची जबाबदारी स्वीकारावी लागली. त्याच्या नैसर्गिक लढाऊ क्षमतेमुळे त्याला नवीन भूमिकेशी जुळवून घेण्यास मदत झाली, असे तो म्हणाला. मी अमूक कार्य करू शकतो, यावर मला नेहमीच स्वतःवर विश्वास होता. केलेल्या कष्टाचे फळ मिळते. ज्या पद्धतीने तयारी करता, त्याचे प्रतिबिंब खेळात दिसते, असे तो म्हणाला.

### स्पॅनिश पॅरा-बॅडमिंटनमध्ये भारताला ६ सुवर्णपदके

**व्हिटोरिया** : स्पेनमधील व्हिटोरिया येथे झालेल्या स्पॅनिश पॅरा-बॅडमिंटन आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताच्या पॅरा-बॅडमिंटनपटूंनी उत्कृष्ट कामगिरी केली आणि ६ सुवर्ण व एक रौप्य पदक जिंकले. यात सुकांत कदमने आघाडी घेतली. सुकांतने अंतिम सामन्यात सहकारी भारतीय तरुणचा २१-१३, २१-१० असा पराभव केला. उपांत्य फेरीत त्याने भारताच्या नवीन शिवकुमारवर २१-११, २१-१३ असा विजय मिळवला . नितेश कुमारने जपानच्या फुजिहाराविरुद्धच्या सामन्यात २१-१९, २१-१९ असा विजय मिळवत एसएल-३ प्रकारात सुवर्णपदक पटकावले. एसएच-६ प्रकारात नित्याश्रेने पोलंडच्या स्झमिगेलला पराभूत करून अव्वल स्थान पटकावले. पुरुष दुहेरीत, नितेश कुमार व तरुणने भारताच्याच जगदिश दिल्ली व नवीन शिवकुमार य ाजोडीवर २१-१४, २३-२५, २२-२० असे पराभूत केले. मिश्र दुहेरीच्या अंतिम सामन्यात कृष्णा नगर व नित्याश्रे या जोडीने इंग्लंडच्या शेफर्ड व चुंग या जोडीचा २१-१४, २१-११ असा दबदबा निर्माण करत एसएच-६ प्रकारात सुवर्णपदक जिंकले. नितेश कुमारने मनीषा रामदाससोबत जोडी करून एसएल-३ -एसयू-५ प्रकारात भारताच्या पदकतालिकेत आणखी एक सुवर्णपदक मिळवले. त्यांनी स्वीडनच्या रिकाड निल्सन व डेन्मार्कच्या हॅलो सोफी सागोय या जोडीचा २१-१९, २१-१५ असा पराभव केला.

### पीसीबीने सर्व केले, पण संघाकडे लक्ष दिले नाही

**लाहोर** : पाकिस्तान क्रिकेट मंडळाने आयसीसी चॅम्पियन्स चषकाच्या आयोजनासाठी खूप पैसा खर्च केला, स्टेडियम बांधले, परंतु आपला संघ आणि त्याच्या तयारीकडे लक्ष दिले नाही, अशी पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू दानिश कनेरिया याने म्हटले आहे. पाकिस्तान यजमान होता, तरीही ते स्पर्धेतून बाहेर पडणारा पहिला संघ ठरला, तर भारत अपराजित राहिला. मोहम्मद रिझवानच्या नेतृत्वाखालील संघ गट साखळी फेरीत कोणत्याही विजयाशिवाय स्पर्धेतून बाहेर झाला. बांगलादेशविरुद्धचा शेवटचा गट साखळी सामना पावसामुळे रद्द झाल्यामुळे दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण मिळवता आला. पीसीबीने स्पर्धेत चांगला संघ उतरवला नाही. पाकिस्तानचा संघ तिरंगी मालिकेत पराभव झाल्यानंतर ज्या पद्धतीने चॅम्पियन्स चषकांत पोहोचला, तो या स्पर्धेच्या उपांत्य फेरीतही पोहोचू शकेल असा संघ दिसत नव्हता, असेही कनेरिया म्हणाला. स्पर्धेत पाकिस्तानचा संघ खूप वाईट खेळला. संघाच्या कोणत्याही तांत्रिक बाबींबद्दल बोललात तर ते कधीही मान्य करणार नाही व केवळ टीका करतील, म्हणूनच पाकिस्तान संघ मागे पडत आहेत, असे तो म्हणाला.

### मुंबई सिटी एफसीला एका गुणाची आवश्यकता

**बंगळुरू** : इंडियन सुपर लीगमध्ये (आयएसएल) मंगळवारी श्री कांतीरवा स्टेडियमवर बंगळुरू एफसी आणि मुंबई सिटी एफसी यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. ३३ गुणांसह सातव्या स्थानावर असलेल्या मुंबई सिटीला सहाव्या स्थानावर असलेल्या ओडिशा एफसीला (३३) मागे टाकण्यासाठी आणि प्ले-ऑफसाठी पात्र होण्यासाठी केवळ एका गुणाची आवश्यकता आहे. तथापि, मुंबई सिटीला गत चार सामन्यांमध्ये विजय मिळाला नाही, त्यांनी प्रत्येकी दोन सामने बरोबरीत ठेवले व दोनदा पराभव पत्करला. बंगळुरू एफसीने अव्वल सहामध्ये स्थान मिळवले आहे आणि ते सध्या २३ सामन्यांतून ३८ गुणांसह गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहे.आमचा संघ मुंबई सिटीसमोर कडवे आव्हान उभे करणार आहे. मुंबई सिटीविरुद्धचा हा सामना अंतिम सामन्यासारखा खेळणार असून अशा संघांविरुद्ध खेळणे कठीण आहे, पण आम्हाला हा सामना जिंकायचा आहे, असे बंगळुरू एफसीचे मुख्य प्रशिक्षक जेरार्ड झारागोझा म्हणाले. बंगळुरू एफसीने २६.४३ च्या अपेक्षित गोल मूल्यातून ४० गोल केले असून हे लीगमधील तिसरा सर्वोच्च आहे. त्यांच्याकडून सुनील छेत्री (१२) व एडगर मेंडेझने (७) सर्वाधिक गोल केले आहेत.

# सध्याच निवृत्ती नाही : रोहित शर्मा

### अफवा पसरवू नका



◆ **दुबई, १० मार्च**

मी सध्याच एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्त होणार नाही, पुढे जाऊन कृपया अफवा पसरवू नका, असे भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माने आयसीसी चॅम्पियन्स चषक जिंकल्यानंतर सांगितले. त्याच्या वक्तव्यामुळे त्याच्या कारकिर्दीबद्दलच्या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे.

ऑस्ट्रेलिया दौऱ्यापासून रोहितच्या संघातील भविष्याबद्दल तसेच कर्णधारपदाबद्दल अटकळ पसरली होती, परंतु रविवारी न्यूझीलंडविरुद्धच्या अंतिम सामन्यात त्याने ७६ धावांची खेळी केली व त्याला एक नवीन जीवन दिले. भविष्यातील कोणतेही नियोजन नाही. जे काही घडत आहे ते चालूच राहील, असे रोहित भविष्यातील योजनांबद्दल विचारले असता म्हणाला.

गत ३-४ सामन्यांमध्ये मी करत असलेल्यापेक्षा आज मी काहीही वेगळे केले नाही. पॉवर-प्लेमध्ये धावा करणे किती महत्त्वाचे आहे हे मला माहिती आहे. १० षटकांनंतर मैदान पसरते आणि फिरकीपटू येतात तेव्हा ते खूप कठीण होते, असे तो म्हणाला.

दुबईच्या खेळपट्टीच्या स्वरूपामुळे रोहितने फलंदाजीसाठी जलद गतीने खेळण्याचा दृष्टिकोन स्वीकारला. खेळपट्टी आधीच मंद असल्याने ते कठीण होते.

फलंदाज म्हणून संघाच्या विजयात योगदान देणे हा एक अतिशय समाधानकारक अनुभव होता, असे रोहित म्हणाला. मी २०१९ च्या विश्वचषकात खूप योगदान दिले, पण आम्ही जिंकलो नाही, असेही तो म्हणाला.

संघासाठी काहीतरी करणे, योगदान देणे आणि संघाला विजयी स्थितीत ठेवणे खूप महत्वाचे होते, असे तो म्हणाला. यष्टिरक्षक-फलंदाज के. एल. राहुल आपल्या नवीन भूमिकेत सातत्यपूर्ण प्रयत्न करत असल्याचे पाहून व्यवस्थापन आनंदित आहे. राहुलचे योगदान संघासाठी महत्त्वाचे आहे, असे तो म्हणाला.केएल गेल्या अनेक वर्षांपासून संघासाठी खूप आव्हानात्मक काम करत आहे. दबावाच्या परिस्थितीत फलंदाजी कशी करायची याची त्याला उत्तम जाण आहे, असेही तो म्हणाला.

जेव्हा मी बाद झालो तेव्हा संघाची तिसरी विकेट पडली होती व त्यावेळी आम्हाला ५० ते ७० धावांची भागीदारी हवी होती. श्रेयस अय्यरने अक्षर पटेलसोबत तेच केले. जेव्हा तुम्ही परिस्थिती समजून घेता व परिस्थितीशी जुळवून घेता तेव्हा चांगले वाटते, असे तो म्हणाला.

रोहितने चॅम्पियन्स चषकाचा विजय देशाला समर्पित केला.आयसीसी चॅम्पियन्स चषक जिंकल्यामुळे संपूर्ण संघाला खूप आनंद होतो. आम्ही हे आमच्या देशासाठी केले, याचा अभिमन वाटतो, असे तो म्हणाला. ◀(वृत्तसंस्था)

## बक्षीस वितरण समारंभात पाकिस्तानचे प्रतिनिधित्व नसल्याने पीसीबी नाराज

◆ **कराची, १० मार्च**

चॅम्पियन्स चषकाच्या समारोप समारंभासाठी पाकिस्तान क्रिकेट मंडळाच्या (पीसीबी) पदाधिकाऱ्याला व्यासपीठावर आमंत्रित न केल्यामुळे पीसीबीने नाराजी व्यक्त केली.

पीसीबीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुमैर अहमद हे स्पर्धेचे संचालक देखील आहेत व ते कार्यक्रमस्थळी उपस्थित होते, परंतु त्यांना समारंभासाठी आमंत्रित करण्यात आले नव्हते. स्पर्धेच्या हायब्रिड मॉडेलचा भाग म्हणून दुबईमध्ये होणाऱ्या सर्व भारतीय सामन्यांसह पाकिस्तानने २९ वर्षांनंतर आयसीसी स्पर्धेचे आयोजन केले. पीसीबीचे अध्यक्ष मोहसीन नक्वी हे संघीय गृहमंत्री म्हणून पूर्वीच्या कामांमुळे दुबईला गेले नाहीत, परंतु पीसीबीच्या सीईओंना अंतिम आणि समारोपीय सादरीकरणात पाकिस्तानचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पाठवण्यात आले, असे सूत्रांनी सांगितले.

काही कारणास्तव किंवा गैरसमजामुळे पीसीबीच्या पदाधिकाऱ्याला व्यासपीठावर बोलावण्यात आले नाही, असे सूत्राने सांगितले . पारितोषिक वितरण समारंभात आयसीसीचे अध्यक्ष जय शाह, बीसीसीआयचे अध्यक्ष रॉजर बिन्नी व सचिव देवजित सैकिया यांच्या हस्ते खेळाडूंना पदके, ट्रॉफी आणि जॅकेट प्रदान करण्यात आले. कदाचित सीईओ अंतिम समारंभ आयोजित करण्यासाठी जबाबदार असलेल्या आयसीसीच्या लोकांशी योग्यरित्या संवाद साधू शकले नसतील आणि त्यांना वगळण्यात आले असेल, असेही सूत्रांनी म्हटले आहे. त्यामुळे चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमान म्हणून पाकिस्तानचा कोणताही प्रतिनिधी व्यासपीठावर नव्हता.दरम्यान, माजी वेगवान गोलंदाज शोएब अख्तर यानेही स्पर्धेच्या अंतिम सामन्यानंतर झालेल्या सादरीकरण समारंभात पीसीबी पदाधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.पाकिस्तान चॅम्पियन्स ट्रॉफीचे आयोजन करत होता. भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली आहे पण अंतिम सामन्यानंतर पीसीबीचा प्रतिनिधी उपस्थित नव्हता हे माझ्या लक्षात आले, असे शोएब अख्तरने सोशल मीडियावर व्हिडिओमध्ये म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

# तंबाखू, अल्कोहोलशी संबंधित जाहिरातींवर बंदी घाला

**आरोग्य मंत्रालयाचा आयपीएलला सल्ला**

◆ **नवी दिल्ली, १० मार्च**

आरोग्य मंत्रालयाने इंडियन प्रीमियर लीगला २२ मार्चपासून सुरू होणाऱ्या स्पर्धेत सरोगेट जाहिरातींसह सर्व प्रकारच्या तंबाखू आणि अल्कोहोलच्या जाहिरातींवर बंदी घालण्याचे निर्देश दिले आहेत.

भारतातील तरुणांसाठी आदर्श असलेल्या क्रिकेट खेळाडूंनी कोणत्याही प्रकारच्या तंबाखू किंवा अल्कोहोलच्या जाहिरातींशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे जोडले जाऊ नये, असे आरोग्य सेवा महासंचालक अतुल गोयल यांनी आयपीएलचे अध्यक्ष अरुण धुमल यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.




आयपीएलने स्टेडियममध्ये जिथे खेळ आणि संबंधित आयपीएल सामने/कार्यक्रम आयोजित केले जातात तसेच राष्ट्रीय दूरदर्शनवर प्रसारित होणाऱ्या सत्रांमध्ये सरोगेट जाहिरातींसह सर्व प्रकारच्या तंबाखू/अल्कोहोल जाहिरातींवर बंदी घालणारे नियम काटेकोरपणे अंमलात आणावेत. सर्व संलग्न कार्यक्रम व क्रीडा सुविधांमध्ये अल्कोहोल किंवा तंबाखूशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित उत्पादनांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे समर्थन देणाऱ्या खेळाडूंना (समालोचकांसह) प्रोत्साहन देण्यास प्रतिबंध करा, असे गोयल यांनी पत्रात लिहिले आहे. ◀(वृत्तसंस्था)

### आरोग्याला प्रोत्साहन देणे क्रिकेटपटूंचे नैतिक कर्तव्य

सार्वजनिक आरोग्याला प्रोत्साहन देणे हे क्रिकेटपटूंचे नैतिक कर्तव्य आहे.निरोगी, सक्रिय जीवनशैलीला प्रोत्साहन देण्यासाठी क्रिकेट खेळाडू तरुणांसाठी आदर्श आहेत, आयपीएल हे देशातील सर्वात मोठे क्रीडा व्यासपीठ असल्यामुळे सार्वजनिक आरोग्याला प्रोत्साहन देणे आणि सरकारच्या आरोग्य उपक्रमांना पाठिंबा देणे हे सामाजिक आणि नैतिक कर्तव्य आहे, असे गोयल म्हणाले.

### ७० टक्के मृत्यूंना तंबाखू, अल्कोहोल कारणीभूत

आयपीएल सुरू असताना बहुतेक भारतीय लोक टीव्हीसमोर बसलेले असतात, त्यामुळे ही स्पर्धा जाहिरातदारांसाठी प्रिय बनते. भारतात असंसर्गजन्य आजार, हृदयरोग, कर्करोग, दीर्घकालीन फुफ्फुसांचे आजार, मधुमेह, उच्च रक्तदाब इत्यादींचा मोठा भार पडत आहे. जे दरवर्षी ७० टक्के पेक्षा जास्त मृत्यूंना कारणीभूत ठरते. तंबाखू आणि अल्कोहोलचा वापर हे एनसीडीसाठी प्रमुख जोखीम घटक आहेत. जगभरात तंबाखूमुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये आपण दुसऱ्या क्रमांकावर आहोत. दरवर्षी सुमारे १४ लाख मृत्यू होतात, तर दारू हा भारतीयांद्वारे वापरला जाणारा सर्वात सामान्य मानसोपचार करणारा पदार्थ आहे, असे ते म्हणाले.

## आयसीसी स्पर्धांमधील गत पराभवांमधून आम्ही धडा शिकलो : विराट कोहली



◆ **दुबई, १० मार्च**

आयसीसी स्पर्धांमधील गत पराभवातून आम्ही धडा गिरवला. त्यामुळे आम्ही १२ महिन्यांपेक्षा कमी कालावधीत भारताला दुसरे मोठे आयसीसी विजेतेपद जिंकून देता आले, असे भारताचा धडाकेबाज फलंदाज विराट कोहली म्हणाला.

भारताने गत वर्षी जूनमध्ये टी-२० विश्वचषक जिंकला आणि रविवारी त्यांनी तिसऱ्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली. युएईमधील मोहिमेदरम्यान रोहित शर्माच्या संपूर्ण संघाने एकजुटीने प्रयत्न केले व चॅम्पियन्स चषकाला गवसणी घातली.

चॅम्पियन्स ट्रॉफी खेळून बराच काळ लोटला आहे आणि त्याचे स्वरूप खरोखरच चांगले आहे. हे आमचे ध्येय होते. ऑस्ट्रेलियाच्या कठीण दौऱ्यानंतर आम्ही येथे आलो आणि एक मोठी स्पर्धा जिंकली. त्यामुळे संघ म्हणून आमचा आत्मविश्वास पुन्हा एकदा वाढला आहे, असे कोहलीने सांगितले.

संपूर्ण स्पर्धेत वेगवेगळ्या सामन्यांमध्ये वेगवेगळ्या खेळाडूंनी प्रगती केली. मागील स्पर्धांमध्ये असे काही क्षण होते जेव्हा आम्हाला खेळ संपवता आला नाही किंवा महत्त्वाच्या परिस्थितींचा फायदा घेता आला नाही. पण यावेळी, आम्ही त्या अनुभवांमधून शिकलो, असे तो म्हणाला.

रोहित व केएल राहुलच्या अनुभवाने न्यूझीलंड विरुद्धच्या अंतिम सामन्यात भारताला विजय मिळवून दिला.

जेव्हा तुम्ही शिकलेल्या गोष्टी लागू करता आणि कठोर परिश्रम करता तेव्हा तुम्हाला परिस्थिती बदलण्याची संधी मिळते. गत दोन सामन्यांमध्ये केएल राहुल ज्या पद्धतीने कामगिरी करत होता ते त्या अनुभवाचे प्रतीक आहे, असे कोहली म्हणाला.

भारत हा आतापर्यंतच्या संयोजनातील सर्वोत्तम संघ होता. त्यांनी पाच फिरकी गोलंदाज निवडले.

चार आयसीसी जेतेपदे जिंकणे खरोखरच एक आशीर्वाद आहे आणि मी स्वतःला खूप भाग्यवान समजतो की मी इतके दिवस खेळलो आणि हे साध्य केले, असे कोहली म्हणाला. कोहली हा २०११ च्या एकदिवसीय विश्वचषक संघाचा आणि २०१३ च्या चॅम्पियन्स ट्रॉफी विजेत्या संघाचा भाग होता. ◀(वृत्तसंस्था)

# बंगळुरू राष्ट्रीय स्पर्धेत यशवंत इसराणी यांना सुवर्ण

◆ **यवतमाळ, १० मार्च**

वर्ल्ड मास्टर्स ॲथलेटिक्स संघटनेशी संलग्नित मास्टर्स ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या वतीने ४ ते ९ मार्चपर्यंत बंगळुरू येथे श्री कान्तीरवा स्टेडियम आणि स्पोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडिया यांची ४५ वी मास्टर्स ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धा २०२५ पार पडली. स्पर्धेत यशवंत इसराणी यांनी ८० मीटर अडथळ्यांची शर्यत २१.२५ वेळेत पूर्ण करून महाराष्ट्रासाठी पहिले सुवर्णपदक प्राप्त केले.

स्पर्धेत भारतातील ३५ ते ९५ वयोगटांतील २,७०० महिला व पुरुष स्पर्धक सहभागी झाले होते. यवतमाळचे ७० वयोगटांतील गुलाब भोळे यांनी ५ किमी चालणे, लांब उडी तर यशवंतराय इसराणी यांनी ८० मीटर अडथळ्याची शर्यत (हर्डल्स), लांब उडी व उंच उडीत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. यशवंत इसराणी यांना इंडिया मास्टर्स संघटनेचे अध्यक्ष डॉ. धरमवीर धिल्लन, सचिव डेव्हिड प्रेमनाथ, महाराष्ट्र अध्यक्ष चंद्रकांत तराळ, नागपूर मास्टर्स अध्यक्ष हेलन जोसेफ, यवतमाळ मास्टर्स अध्यक्ष गुलाब भोळे यांच्या उपस्थितीत सुवर्णपदक प्रदान करण्यात आले.



पुरस्कारासह उपस्थित ॲथलेटस् मान्यवर

यशवंत इसराणी यांचे यवतमाळचे आमदार बाळासाहेब मांगुळकर, जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड, यवतमाळ मास्टर्स असोसिएशनचे साहेबराव राठोड, कार्याध्यक्ष देवेंद्र चांदेकर, सचिव नरेंद्र भांडारकर, उपाध्यक्ष देवानंद तांडेकर, मधुकर मोरझडे, कोषाध्यक्ष शीला पेडणेकर, बापुराव रामटेके, संजय देशपांडे, शीतल दरेकर यांनी अभिनंदन केले. ◀(तभा वृत्तसेवा)

# भारतीय बॅडमिंटनपटूंसमोर कठीण आव्हान

### ऑल इंग्लंड बॅडमिंटन आजपासून

◆ **बर्मिंगहॅम, १० मार्च**

येथे मंगळवारपासून प्रतिष्ठेच्या ऑल इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. ही स्पर्धा जिंकण्याचे ध्येय असताना दुखापत व वाईट फॉर्ममुळे त्रस्त भारतीय बॅडमिंटनपटूंसमोर सर्वात कठीण आव्हान असणार आहे.

१९८० मध्ये प्रकाश पदुकोणचा ऐतिहासिक विजय आणि २००१ मध्ये पुलेला गोपीचंदचा विजय झाल्यानंतर, कोणत्याही भारतीयाला ऑलिम्पिक व जागतिक अजिंक्यपद स्पर्धेनंतर खेळातील सर्वात प्रतिष्ठित ऑल इंग्लंड जेतेपद पटकावता आलेले नाही.

गत दोन दशकांत भारतीय बॅडमिंटनने नवीन उंची गाठली आहे. पी. व्ही. सिंधू, सायना नेहवाल व किदाम्बी श्रीकांत सारख्या स्टार खेळाडूंनी मोठी पदके जिंकली आहेत. तथापि, जागतिक स्तरावर असंख्य यश मिळवूनही कोणीही ऑल इंग्लंड चॅम्पियनशिप जिंकू शकलेले नाही. २०१५ व २०२२ मध्ये सायना आणि लक्ष्य सेन विजेतेपदाच्या समीप आले, परंतु त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले, तर त्रिशा जॉली व गायत्री गोपीचंदने सलग आवृत्तीत उपांत्य फेरी गाठली. दरवर्षी, भारतीय पथक या ऐतिहासिक जेतेपदावर आपले लक्ष केंद्रित करते, पण तरीही, हा मायावी मुकुट त्यांच्या हातातून निसटत राहतो.



या वर्षी आव्हान आणखी मोठे असेल. भारताचे अव्वल बॅडमिंटनपटू दुखापतींच्या चिंता व वाईट फॉर्मसह अनेक अडचणींसह बर्मिंगममध्ये पोहोचतील. निराशाजनक पॅरिस ऑलिम्पिकनंतर, २०२५ मध्ये भारतीय बॅडमिंटनपटूंना कामगिरी सुधारण्यासाठी संघर्ष करावा लागला.

सिंधूला दुखापतींचा सामना करावा लागला, एच. एस. प्रणॉय आजारातून हळूहळू सावरला, लक्ष्य सेन वाईट फॉर्मशी झुंजला आहे आणि सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी गत महिन्यात वडिलांच्या निधनाच्या दुःखाला तोंड देत आहेत. दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती सिंधूने गत महिन्यात झालेल्या आशिया मिश्र सांघिक अजिंक्यपद स्पर्धेतून माघार घेतली होती. ती दुखापतीतून सावरल्यानंतर परतली आहे.



जानेवारीमध्ये इंडोनेशियन प्रशिक्षक इरवंश्या आदि प्रतामा यांना नियुक्त करणारा २९ वर्षीय खेळाडू पहिल्या फेरीत कोरियाच्या गा युन किमशी सामना करेल. दुसऱ्या फेरीत चीनच्या हान यू विरुद्ध संभाव्य लढत होण्याची शक्यता आहे, तर इंडोनेशियाची ग्रेगोरिया मारिस्का तुनजुंग क्वार्टर फायनलमध्ये तिला आव्हान देण्याची शक्यता आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये चौथ्या स्थानावर असलेल्या लक्ष्यने ऑल इंग्लंडच्या गत आवृत्तीत उपांत्य फेरी गाठली होती, परंतु नवीन हंगामात त्याला पहिल्या फेरीत दोन वेळा बाहेर पडावे लागले आणि दुसऱ्या फेरीतच त्याचे आव्हान संपुष्टात आले. २०२१ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक जिंकणारा २३ वर्षीय खेळाडू जपानच्या कोकी वतानाबेविरुद्ध आपली मोहीम सुरू करेल. विजयामुळे दुसऱ्या फेरीत इंडोनेशियाच्या जोनाथन क्रिस्टीशी त्यांचा सामना होऊ शकतो. प्रणॉय जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावरून घसरला आहे. एका कठीण वर्षानंतर ३० वर्षांचा हा खेळाडू २०२५ मध्ये दुसऱ्या फेरीच्या पुढे अजून प्रगती करू शकलेला नाही. पॅरिस ऑलिम्पिकपूर्वी चिकनगुनियामुळे बाधित झालेला ३२ वर्षीय खेळाडू फ्रान्सच्या टोमा ज्युनियर पोपोव्हविरुद्ध आपली मोहीम सुरू करेल.

पुरुष दुहेरीत आशियाई क्रीडा स्पर्धेचे विजेते सात्त्विकसाईराज आणि चिराग शेट्टीला ७ वे मानांकन मिळाले आहे. हे भारताचे सर्वात सातत्यपूर्ण कामगिरी करणारे खेळाडू आहेत, त्यांनी यावर्षी मलेशिया आणि इंडिया ओपनमध्ये दमदार कामगिरी केली आहे. ही भारतीय जोडी डेन्मार्कच्या डॅनियल लुंडगार्ड आणि मॅड्स वेस्टरगार्डविरुद्ध सलामीची लढत देईल. ◀(वृत्तसंस्था)

# हॉकी इंडियाच्या वार्षिक पुरस्कारांसाठी ८ श्रेणीत ३२ खेळाडूंना नामांकन

## विक्रमी १२ कोटी रुपयांचे रोख पुरस्कार

◆ **नवी दिल्ली, १० मार्च**

हॉकी इंडियाने आपल्या सातव्या वार्षिक पुरस्कार समारंभात विक्रमी १२ कोटी रुपयांचे रोख पारितोषिक प्रदान करण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे. या पुरस्कारासाठी ८ श्रेणींमध्ये ३२ खेळाडूंना नामांकन देण्यात आले आहे.

२०२४ च्या हंगामातील सर्वोत्तम कामगिरी साजरी करण्यासाठी हा कार्यक्रम आगामी शनिवारी येथे आयोजित करण्यात आला आहे.यातील एक प्रमुख आकर्षण म्हणजे वर्षातील सर्वोत्तम खेळाडूसाठीचा प्रतिष्ठित बलबीर सिंग सीनियर पुरस्कार, जो सर्वोत्तम पुरुष आणि महिला खेळाडूंना सन्मानित करेल. युवा खेळाडूंनाही विशेष महत्त्व देण्यात आले आहे, यात आगामी



वर्षातील सर्वोत्तम खेळाडू (पुरुष) साठी जुगराज सिंग पुरस्कार आणि आगामी वर्षातील सर्वोत्तम खेळाडू (महिला) साठी असुंता लाक्रा पुरस्कार यांचा समावेश आहे.याशिवाय, विविध पदांवर वैयक्तिक उत्कृष्टतेला वर्षातील सर्वोत्तम गोलगोलरक्षकासाठी बलजीत सिंग पुरस्कार, वर्षातील सर्वोत्तम बचावपटूसाठी परगत सिंग पुरस्कार, वर्षातील सर्वोत्तम मिडफिल्डरसाठी अजित पाल सिंग पुरस्कार आणि वर्षातील सर्वोत्तम फॉरवर्डसाठी धनराज पिल्ले पुरस्कार अशा पुरस्कारांद्वारे मान्यता दिली जाईल.

या वर्षीचे पुरस्कार १९७५ मध्ये त्याच दिवशी भारतीय पुरुष संघाच्या ऐतिहासिक विश्वचषक विजयाच्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त दिले जातील. हे देशाचे व आजपर्यंतचे पहिले व एकमेव जागतिक विजेतेपद आहे.

या महत्त्वाची भर म्हणजे, २०२५ हे वर्ष भारतीय हॉकीला १०० वर्षे पूर्ण करत आहे, कारण ७ नोव्हेंबर १९२५ रोजी हा देश आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशन शी (एफआयएच) संलग्न झाला.

गत वर्षी आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणाऱ्या पुरुष आणि महिला संघांसह भारताच्या ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या संघाचाही सत्कार करण्यात येणार आहे.

पुरस्कार सोहळ्यात ज्युनियर आशिया कप विजेत्या पुरुष आणि महिला संघांनाही सन्मानित केले जाईल.हॉकी इंडियाचा ७ वा वार्षिक पुरस्कार २०२४ हा भारतीय हॉकीमध्ये असलेल्या असाधारण प्रतिभेचा उत्सव आहे. हे केवळ वैयक्तिक कामगिरीची दखल घेण्याबद्दल नाही, तर २०२४ मध्ये चमकलेल्या भारतीय हॉकीच्या सामूहिक भावनेचा सन्मान करण्याबद्दल आहे, असे भारतीय हॉकी महासंघाचे अध्यक्ष दिलीप तिर्की यांनी एका निवेदनात म्हटले

# महाराष्ट्र महिला कुस्ती संघाला दुसरे स्थान

◆ **जालंधर, १० मार्च**

येथे पार पडलेल्या फेडरेशन चषक वरिष्ठ गट कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत हरयाणाच्या कुस्तीपटुंनी वर्चस्व गाजविले. पुरुषांच्या ग्रीको-रोमन, फ्रीस्टाइल आणि महिलांच्या गटात अव्वल स्थान पटकावले. महिला कुस्ती संघाच्या क्रमवारीत महाराष्ट्राने १४३ गुणांसह दुसरे स्थान पटकावले. महाराष्ट्राच्या सृष्टी भोसलेने ६५ किलो वजन गटात सुवर्णपदक आणि वेदिका ससाना हिने ७२ किलो वजन गटात रौप्यपदक मिळवले.

ग्रीको-रोमनमध्ये पाच सुवर्णपदके आणि महिला गटात एक सुवर्णपदक मिळवून हरयाणाने सांघिक क्रमवारीतही पहिले स्थान मिळवले. ग्रीको-रोमन प्रकारात हरयाणाने पाच सुवर्ण, चार रौप्य आणि एक कांस्यपदक जिंकले. महिला कुस्तीमध्ये हरयाणाच्या कुस्तीगीरांनी पुन्हा एकदा आपले कौशल्य आणि दृढनिश्चय दाखवला आणि २०३ गुणांसह सांघिक क्रमवारीत अव्वल स्थान मिळवले.

फ्रीस्टाईलच्या एकूण सांघिक क्रमवारीत, हरयाणाने २२० गुणांसह आपला गड कायम ठेवला, त्यानंतर दिल्ली दुसऱ्या स्थानावर (१६५), तर उत्तर प्रदेश तिसऱ्या स्थानावर (१०६) राहिला. ◀(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


# लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधीपासून मिळणार

## ▸▸देवेंद्र फडणवीस म्हणाले, जेव्हा घोषणा करू त्याच्या पुढच्या महिन्यांपासून मिळतील

**मुंबई, दि.१० मार्च**

यंदाच्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा सन्माननिधी वाढवण्याबाबत कोणतीही घोषणा झाली नाही. त्यामुळे योजनेच्या पात्र महिलांना १५०० रुपये मिळणार आहेत. पण निवडणुकीआधी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधीपासून मिळणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले आहे. आम्ही अर्थसंकल्पात जी आश्वासने दिली आहेत ती पूर्ण करणार, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणालेत. लाडकी बहीण योजनेचे पैसे कमी केलेले नाहीत. प्रत्येक पात्र महिलेला पैसे मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. योजनेचे पैसे वाढवण्याची गरज पडली तर जुलै, डिसेंबर महिना आहे, असेही फडणवीस म्हणाले.

विधानसभा निवडणुकीवेळी लाडक्या बहिणींचा सन्माननिधी १५०० रुपयांवरून २१०० रुपये करू, असे आश्वासन महायुतीकडून देण्यात आले होते. त्यानंतर विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळाले. महायुतीचे सरकार स्थापन झाल्यापासून लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी मिळणार? असे विचारले जात होते. तर याबाबत अर्थसंकल्पात निर्णय घेऊ असे, सत्ताधाऱ्यांकडून सांगण्यात आले होते. राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर अर्थसंकल्पात २१०० रुपयांबद्दल घोषणा करण्यात येईल, असे सांगितले होते. पण, तशी घोषणा झाली नाही. १५०० रुपयेच मिळणार, हे अर्थसंकल्पानंतर स्पष्ट झाले. अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अर्थमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी एकत्रित पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी लाडक्या बहिणींच्या २१०० रुपयांबाबत प्रतिक्रिया दिली.



लाडकी बहीण योजनेचे पैसे कमी केलेले नाहीत. प्रत्येक पात्र महिलेला पैसे मिळणार आहेत. कुठलीही योजना तयार होते तेव्हा एक गृहितक धरले जाते, तीन कोटी, साडेतीन कोटी. त्या योजनेला अंतिम रुप येते तेव्हा जर ते गृहितक २ कोटी ७० लाख झाले तर तेवढे पैसे वाचतात ना? योजनेचे पैसे वाढवण्याची गरज पडली तर जुलै आहे, डिसेंबर महिना आहे. आवश्यक तेवढी तरतूद आपण यामध्ये ठेवली आहे. असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधीपासून मिळणार? असे विचारले असता, त्यासंदर्भात निश्चितपणे आमचे काम चालले आहे. एक लक्षात घ्या अर्थसंकल्पाचा समतोल राखणेही महत्त्वाचे आहे. घोषणा दिली आहे, तर ती पूर्ण करायची आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. सध्या ट्रेंड्स खूप चांगले चालले आहेत. योजना दीर्घकाळ चालवायची असेल तर आपल्याला त्यासाठी आर्थिक तरतुदीही करणे महत्वाचे असते. समतोल राखत पुढे जायचे आहे, त्यामुळे आम्ही अर्थसंकल्पात जी आश्वासने दिली आहेत ती पूर्ण करणार, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. एप्रिल महिन्यात १५०० रुपयेच मिळणार. आम्ही २१०० रुपये कधी मिळणार ते घोषित करु. जेव्हा घोषित करु त्याच्या पुढच्या महिन्यांपासून २१०० रुपये महिलांना मिळण्यास सुरुवात होईल. असे उत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.




## अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्ट्ये

- राजकोषीय उत्तरदायित्व व वित्तीय व्यवस्थापन कायद्यानुसार राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यातही शासन यशस्वी ठरले आहे. तसेच राज्याची महसुली तूट ही सातत्याने स्थूल राज्य उत्पन्नाच्या १ टक्क्यापेक्षा कमी राहिली आहे. सन २०२५-२६ ची राजकोषीय तूट १ लाख ३६ हजार २३५ कोटी रुपये आहे.
- आर्थिक सुधारणांच्या माध्यमातुन, भांडवली खर्चातील वाढीद्वारे विकासचक्रास चालना देऊन राज्याच्या विकास दरात वाढ करण्याचे उद्दीष्ट साध्य करण्याचे प्रयत्न आहेत. मुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था १४० बिलियन डॉलर वरुन सन २०३० पर्यंत ३०० बिलीयन डॉलर तर सन २०४७ पर्यंत १.५ ट्रिलीयन डॉलर पर्यंत नेण्याचे उद्दीष्ट आहे. मुंबई महानगर प्रदेशात हाती घेण्यात आलेल्या विविध पायाभूत सुविधांची कामे जसे की वाढवण बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, बुलेट ट्रेन, मल्टीमोडल कॉरिडॉर, भुयारी मार्ग, मेट्रो प्रकल्प यामुळे हे क्षेत्र विकासाचे केंद्र ठरणार आहे.
- विकसित भारत- विकसित महाराष्ट्र ही संकल्पना साध्य करण्याकरता मेक इन महाराष्ट्र व्दारे गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण आखण्यात येणार आहे. पुढील पाच वर्षाच्या कालावधीत ४० लाख कोटी रुपयांची गुंतवणुक व ५० लाख रोजगार निर्मिती अपेक्षीत आहे.
- कृषी क्षेत्राच्या गेल्या वर्षीच्या निराशाजनक ३.३% विकास दराच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांना विविध योजना, कार्यक्रमांच्या माध्यमातुन आर्थिक सहाय्य दिल्यामुळे सन २०२४-२५ मध्ये कृषी क्षेत्राचा विकास दर ८.७% पर्यंत सुधारला. या विकास दरात सातत्याने वाढ करण्याकरता शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेती उत्पादनात मूल्य वर्धन, सिंचन सुविधा, विजेची गरज भागविण्यासाठी सौर ऊर्जा इत्यादी पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येतील.
- केंद्र पुरस्कृत योजनांच्या माध्यमातून राज्यास अधिकाधिक केंद्रीय निधी प्राप्त व्हावा म्हणून विशेष प्रयत्न करण्यात येतील.
- वस्तु व सेवा करातुन राज्यास होणाऱ्या उत्पन्नात दरवर्षी सुमारे १२ ते १४ टक्के एवढी वाढ होत आहे.
- महत्वाकांक्षी योजनांना निधीचा सुरळीत पुरवठा होण्याकरता केंद्रीय सहाय्य, आतंरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून सहाय्य , सार्वजनिक मालमत्तेचे मुद्रीकरण, योजनांचे सुसूत्रीकरण तसेच पायाभूत सुविधा गुंतवणूक न्यास सारखे नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत.
- राज्यातील महामार्ग, बंदरे, विमानतळे, जलमार्ग, बस वाहतूक, रेल्वे आणि मेट्रो या सर्व दळणवळण क्षेत्रांसाठी पुरेशी अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आली आहे.
- दर्जेदार ग्रामीण रस्ते तसेच राज्य महामार्ग व जिल्हा रस्त्यांना सर्वाधिक आर्थिक पाठबळ देण्यात येत आहे.
- सर्वांसाठी घरे हे उद्दीष्ट येत्या ५ वर्षात साध्य करण्यासाठी राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. ग्रामीण घरकुलांसाठी १५ हजार कोटी तर शहरी आवास योजनांसाठी ८ हजार १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.
- नव्याने जाहीर केलेल्या योजनांसाठी पुरेशा तरतुदी केलेल्या आहेत. राज्याच्या वार्षिक योजनेत ६२ हजार ५६० कोटीची म्हणजेच सुमारे ३३ टक्के इतकी भरीव वाढ करण्यात आली असून अनुसूचीत जाती घटक योजनेच्या तरतुदीत ४२ टक्के, आदिवासी घटक योजनेच्या तरतुदीत ४० टक्के वाढ करण्यात आली आहे.
- राज्यात सध्या राबवण्यात येत असलेल्या योजनांचे मुल्यमापन करुन त्यांचे सुसूत्रीकरण तसेच साधन संपत्तीच्या स्त्रोतांचा अभ्यास करुन त्यामध्ये वाढ करण्याचे उपाय सुचवण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या शिफारशी विचारात घेऊन योजनांची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहेत.
- थेट लाभार्थी हस्तांतरण (डीबीटी) सर्व वैयक्तिक लाभार्थी योजनांची अंमलबजावणी गतिमान, कार्यक्षम आणि पारदर्शक करण्यासाठी डीबीटी पध्दत राबविण्यात येत आहे. दिनांक १ एप्रिल २०२५ पासून अशा वैयक्तिक लाभार्थी योजनांचा लाभ केवळ डीबीटी द्वारे देण्यात येईल.
- राज्याच्या सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून पाठबळ देण्यात येत आहे अर्थसंकल्पात विविध स्मारके, तीर्थक्षेत्र विकास, पर्यटनस्थळ विकसित करण्याच्या विविध प्रकल्पांना भरीव तरतुद करण्यात आली आहे.
- राज्यातील जलपर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत.
- क्रीडा क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी आणि खेळाडूंना पाठिंबा देण्यासाठी धोरणे आणि अर्थसंकल्पीय तरतुदी करण्यात आल्या आहेत.
- राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना तसेच सार्वजनिक वितरण प्रणालीत स्मार्ट पीडीएस आणि ब्लॉक चेन तंत्रज्ञानाद्वारे अधिक पारदर्शकता आणण्यात येणार आहे.
- आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या पार्श्वभूमीवर सहकार क्षेत्रातील महाराष्ट्राचे नेतृत्व अधोरेखित करण्यासाठी विविध महोत्सव व कार्यक्रम आयोजित करण्यात येतील.
- राज्याचे सार्वजनिक आरोग्य धोरण आखण्यात येवून प्रत्येक व्यक्तीला ५ किलोमीटरच्या परिघात दर्जेदार प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असून मुलींचा व्यावसायीक शिक्षणात सहभाग वाढविण्याकरीता शिक्षण व परिक्षा शुल्काची १०० टक्के प्रति पूर्ती करण्यात येणार आहे.
- कायदेशीर खटले जलदगतीने निकाली काढण्यासाठी राज्यातील न्यायालयांच्या पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्यात येणार आहे.

# ५ हजारांहून अधिक लोकसंख्येची गावे एकमेकांना जोडणार

**मुंबई, दि.१० मार्च**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पात अमृतकाल राज्य रस्ते विकास आराखडा २०२५ ते २०४७ चा प्रस्ताव ठेवला आहे. या प्रस्तावांतर्गत राज्यभरातील पर्यटन केंद्र, तीर्थक्षेत्र, गडकिल्ले, राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, ५ हजार पेक्षा जास्त लोकसंख्येच्या वसाहती आणि सर्व जिल्हा मुख्यालये व तालुका मुख्यालयांना जोडण्यासाठी रस्त्यांचा समावेश करण्यात येणार आहे.

अर्थमंत्री अजित पवार अर्थसंकल्प सादर करताना म्हणाले की, सरकारने पूर्वनिर्धारित निकषांवर आधारित राज्याचा दीर्घकालीन व सर्वसमावेशक 'अमृतकाल राज्य रस्ते विकास आराखडा २०२५ ते २०४७' तयार करण्याचे प्रस्तावित केले आहे. या आराखड्यामध्ये पर्यटन केंद्र, तीर्थक्षेत्र, धार्मिक स्थळे, गडकिल्ले, राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, ५ हजार पेक्षा जास्त लोकसंख्येच्या वसाहती आणि सर्व जिल्हा मुख्यालये व तालुका मुख्यालये जोडण्याकरता रस्त्यांचा समावेश करण्यात येणार आहे.

### आशियाई विकास बँक प्रकल्प टप्पा-१ पूर्ण

आशियाई विकास बँक प्रकल्प टप्पा-१ पूर्ण झाला आहे. टप्पा- २ मधील ३ हजार ९३९ कोटी रुपये किंमतीची ४६८ किलोमीटर रस्ते सुधारणांची कामे हाती घेण्यात आली असून त्यापैकी ३५० किलोमीटर लांबीची कामे पूर्ण झाली आहेत. टप्पा-३ अंतर्गत ७५५ किलोमीटर रस्ते लांबीची ६ हजार ५८९ कोटी रुपये किंमतीची २३ कामे हाती घेण्यात आली आहेत.



# महाराष्ट्रात ५ वर्षांत ७१ लाख रोजगार

## ▸▸नव्या औद्योगिक धोरणातून ५० लाख रोजगार तयार होणार

**मुंबई, दि.१० मार्च**

आगामी काळात महाराष्ट्रात ७१ लाख ७ हजार ५०० इतकी रोजगार निर्मिती होईल, असा आशावाद सोमवारी अर्थमंत्री अजित पवार यांनी आपल्या अर्थसंकल्पातून व्यक्त केला. दावोस गुंतवणुकीतून सुमारे १६ लाख, महाराष्ट्राचे महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक २०२५ मधून ५० लाख, तर लॉजिस्टिक धोरणातून ५ लाख आणि गडचिरोली जिल्ह्यातल्या स्टील हबमधून ७ हजार ५०० रोजगार निर्मिती होईल, असे पवार म्हणाले.

अजित पवार म्हणाले, गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती औद्योगिक विकासात राज्य सदैव अग्रेसर असून थेट विदेशी गुंतवणूकीच्या बाबतीतही देशात अव्वल आहे. जानेवारी, २०२५ मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये राज्य शासनाव्दारे एकूण ६३ कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. त्याव्दारे येत्या काळात १५ लाख ७२ हजार ६५४ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. त्यातून सुमारे १६ लाख रोजगार निर्मिती होईल, असा अंदाज आहे.

### राज्य प्रगतीच्या शिखरावर जाईल

महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मंत्रालयीन विभाग तसेच क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा सात कलमी कृती आराखडा तयार करण्यात आला. या कृती आराखड्यात संकेतस्थळांचा विकास, सुलभ जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे निवारण, कार्यालयातील सोयीसुविधा, गुंतवणुकीचा प्रसार, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी आदींचा समावेश करण्यात आला आहे. या कार्यक्रमामुळे




प्रशासन कार्यक्षम, पारदर्शक, गतिशील, लोकाभिमुख होऊन राज्य प्रगतीच्या शिखरावर जाईल, याची खात्री आम्हाला आहे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन त्रयस्थ संस्थांकडून करवून घेऊन उत्कृष्ट काम करणाऱ्या कार्यालयांचा गौरव करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम निरंतर ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण २०२५ लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. त्या धोरणाच्या ५ वर्षाच्या कालावधीत ४० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक व ५० लाख रोजगार निर्मितीचे उद्दीष्ट असेल. नवीन औद्योगिक धोरणाबरोबरच अवकाश व संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण, इलेक्ट्रॉनिक्स धोरण, जेम्स न्ड ज्वेलरी धोरण, सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम धोरण, चक्रीय अर्थव्यवस्थेसाठी स्वतंत्र क्षेत्रीय धोरण जाहीर करण्यात येणार आहेत. सन २०२३-२४ मध्ये एकूण ५ लाख ५६ हजार ३७९ कोटी रुपयांची व सन २०२४-२५ मध्ये नोव्हेंबर, २०२४ पर्यंत ३ लाख ५८ हजार ४३९ कोटी रुपयांची उत्पादने निर्यात करण्यात आली आहेत. राज्याचे लॉजिस्टिक धोरण-२०२४ जाहीर करण्यात आले असून त्याद्वारे १० हजार एकराहून अधिक क्षेत्रावर समर्पित लॉजिस्टिक पायाभूत सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. प्रकल्पांना देऊ केलेल्या विशेष प्रोत्साहन व सुविधांमुळे सुमारे ५ लाख प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती होणार आहे. एकेकाळी नक्षलग्रस्त म्हणून ओळखला जाणारा गडचिरोली जिल्हा आता स्टील हब म्हणून उदयास येत आहे. दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये गडचिरोली जिल्ह्याकरिता २१ हजार ८३० कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे सामंजस्य करार करण्यात आले. त्यातून ७ हजार ५०० रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे. गडचिरोली जिल्ह्यातील दळणवळणासाठी खनिकर्म महामार्गांचे जाळे विकसित केले जात असून त्याकरिता पहिल्या टप्प्यात सुमारे ५०० कोटी रुपये किंमतीची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

# महाराष्ट्र सागरी दळणवळणातील महाशक्ती होणार

## ● वाढवण बंदराला तिन्ही मार्गाने जोडणार

**मुंबई, दि.१० मार्च**

जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरण आणि महाराष्ट्र सागरी मंडळ हे संयुक्तरित्या पालघर जिल्ह्यात वाढवण बंदर विकसित करत आहेत. या प्रकल्पाचा एकूण खर्च ७६ हजार २२० कोटी रुपये असून त्यात राज्य शासनाचा सहभाग २६ टक्के आहे. वाढवण बंदरामुळे सुमारे ३०० दशलक्ष मेट्रीक टन वार्षिक मालहाताळणी क्षमता निर्माण होणार आहे, अशी माहिती अर्थमंत्री अजित पवार यांनी दिली आहे.




अर्थमंत्री अजित पवार म्हणाले की, जवाहरलाल नेहरु बंदराच्या सध्याच्या क्षमतेपेक्षा ती तिप्पट असणार आहे. सन २०३० पर्यंत नव्या बंदरातून मालवाहतूक सुरु होणे अपेक्षित आहे. या बंदराचा समावेश कंटेनर हाताळणी करणाऱ्या जगातील पहिल्या १० बंदरांमध्ये होणार असल्याने महाराष्ट्र राज्य भविष्यात सागरी दळणवळणातील महाशक्ती म्हणून उदयास येईल. वाढवण बंदराजवळ मुंबईसाठी तिसरे विमानतळ प्रस्तावित असून मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे स्थानकही या बंदराजवळ असणार आहे. हे बंदर समृध्दी महामार्गालाही जोडण्यात येणार आहे. अजित पवार म्हणाले की, हवामान बदल आणि समुद्राच्या पातळीत होत असलेल्या वाढीमुळे निर्माण होणाऱ्या नैसर्गिक आपत्तींपासून बचाव करण्यासाठी महाराष्ट्रातील किनारी जिल्ह्यांमध्ये ८ हजार ४०० कोटी रुपये किंमतीचा बाह्यसहाय्यित प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरण आणि महाराष्ट्र सागरी मंडळ हे संयुक्तरित्या पालघर जिल्ह्यात वाढवण बंदर विकसित करित आहेत. या प्रकल्पाचा एकूण खर्च ७६ हजार २२० कोटी रुपये असून त्यात राज्य शासनाचा सहभाग २६ टक्के आहे. वाढवण बंदरामुळे सुमारे ३०० दशलक्ष मेट्रीक टन वार्षिक मालहाताळणी क्षमता निर्माण होणार आहे. जवाहरलाल नेहरु बंदराच्या सध्याच्या क्षमतेपेक्षा ती तिप्पट असणार आहे. सन २०३० पर्यंत नव्या बंदरातून मालवाहतूक सुरु होणे अपेक्षित आहे. या बंदराचा समावेश कंटेनर हाताळणी करणाऱ्या जगातील पहिल्या १० बंदरांमध्ये होणार असल्याने महाराष्ट्र राज्य भविष्यात सागरी दळणवळणातील महाशक्ती म्हणून उदयास येईल. अजित पवार म्हणाले की, महाराष्ट्र शाश्वत पर्यावरणपूरक किनारा संरक्षण व व्यवस्थापन या ४५० कोटी रुपये किंमतीच्या प्रकल्पांतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवबाग येथे १५८ कोटी रुपये किंमतीच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे समुद्रकिनारी वास्तव्यास असलेल्या नागरीकांच्या जीविताचे व मालमत्तेचे रक्षण होईल. वाढवण बंदराजवळ मुंबईसाठी तिसरे विमानतळ प्रस्तावित असून मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे स्थानकही या बंदराजवळ असणार आहे. हे बंदर समृध्दी महामार्गालाही जोडण्यात येणार आहे. पालघर जिल्ह्यात मौजे मुरबे येथे बंदर निर्मितीच्या ४ हजार २५९ कोटी रुपये किंमतीच्या प्रकल्पाला खाजगी क्षेत्राच्या सहभागाने मंजूरी देण्यात आली आहे.

# ३ ऑक्टोबर 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिन'

**मुंबई, दि.१० मार्च**

महाराष्ट्राचा अर्थसंकल्प आज विधिमंडळात सादर करण्यात आला. ३ ऑक्टोबर हा दिवस 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिन'म्हणून साजरा केला जाणार अशी घोषणा अर्थमंत्री अजित पवार यांनी यावेळी केली. केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल अजित पवारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभारही मानले. शिवाय मराठी भाषेच्या संवर्धनासाठी उल्लेखनीय कामगिरीसाठी पुरस्कार सुरू करणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

काव्य पंक्तीतून अर्थमंत्री अजित पवार यांनी मराठी भाषेचा गौरव करीत माय मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवून दिल्याबद्दल पंतप्रधानांचे आभार मानले आहेत.आपल्या माय मराठीस केंद्रीय मंत्रिमंडळाच्या दिनांक ३ ऑक्टोबर, २०२४ रोजी झालेल्या बैठकीत अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल राज्यातील जनतेच्या आणि जगभरातील मराठी भाषिकांच्या वतीने मी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी महोदयांचे मन:पूर्वक आभार मानतो, असे अजित पवार म्हणाले. यापुढे दरवर्षी ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा सन्मान दिन, तर ३ ते ९ ऑक्टोबर दरम्यान अभिजात मराठी भाषा सप्ताह' साजरा करण्यात येईल, अशी घोषणा पवार यांनी केली.

# दळणवळण व पायाभूत सुविधावर सरकारचा भर

- लाडक्या बहिणींना अजून वर्षभरतरी १५०० रूपयेच!
- ४५.८९१ हजार कोटी तुटीचा राज्याचा अर्थसंकल्प जाहीर
- महागड्या वाहन खरेदीच्या करात वाढ

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. १० मार्च :**

विधानसभा निवडणुकीत च्या जाहीरनाम्यात मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेतून दरमहा २१०० देण्याचे आश्वासन देणाऱ्या महायुती सरकारने २०२५-२६ हा आर्थिक वर्षांमध्ये मात्र त्याची अंमलबजावणी केलेली नाही .सोमवारी सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात लाडकी भाई योजनेअंतर्गत दरमहा पंधराशे रुपये देण्याचे सरकारने आश्वासित केले असून त्यासाठी ३६ हजार कोटीची प्रस्तावित तरतूद केली आहे. कोणतीही नवीन योजना लागू न करता पायाभूत सुविधा व दळणवळण व्यवस्था अधिक रक्कम करण्यावर भर देताना४५ हजार ८९१ कोटी तुटीचा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत सादर सोमवारी सादर केला.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचा संकल्प केला आहे. त्यांच्या संकल्पपूर्तीला बळ देणारा हा अर्थसंकल्प असल्याचे सांगून 'महाराष्ट्र आता थांबणार नाही. विकास आता लांबणार नाही' असा दावा केला. शेती, शेतीपुरक क्षेत्रं, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, पायाभूत सुविधा, सामाजिक विकास अशा अनेक क्षेत्रांसाठी भरीव तरतूद असलेला, 'विकसित भारत-विकसित महाराष्ट्रा'चे स्वप्न प्रत्यक्षात आणणारा हा अर्थसंकल्प आहे. यातून देशांतर्गत, विदेशी गुंतवणूक, रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील. विधानसभा निवडणुकीत राज्यातील मतदारांनी व्यक्त केलेला विश्वास सार्थ



ठरवण्यात अर्थसंकल्प यशस्वी होईल, असा विश्वास पवार यांनी त्यांचा अकरावा अर्थसंकल्प सादर करताना व्यक्त केला.

### विधान परिषदेत अर्थ राज्यमंत्री जयस्वालांनी अर्थसंकल्प केला सादर

राज्यात गुंतवणुकीला पोषक वातावरण असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, औद्योगिक विकासात राज्य सदैव अग्रेसर असून थेट विदेशी गुंतवणूकीच्या बाबतीतही देशात अव्वल आहे. जानेवारीमध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये राज्य शासनाव्दारे एकूण ६३ कंपन्यांसोबत सामंजस्य करार झाले. त यातून येत्या काळात १५ लाख ७२ हजार ६५४ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. त्यातून सुमारे १६ लाख रोजगार निर्मिती होईल, असा अंदाज आहे. वस्तू व सेवा कर कायदा लागू होण्यापूर्वी राज्यकर विभागातर्फे राबविण्यात आलेल्या विविध कायद्यांनुसार सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडे असलेली थकबाकीची तडजोड करण्याबाबतची अभय योजना उपमुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात जाहीर केली. सदर अभय योजनेचे नाव महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यानी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ असे असून या अभय योजनेचा कालावधी प्रस्तावित कायदा लागू झाल्याच्या दिनांकापासून ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत असेल.

### शंभूराजेंच्या समाधीस्थळी भव्य स्मारक उभारणार

छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी ज्या ठिकाणी आहुती दिली त्यांच्या स्मृती कायम स्वरूपी जपण्यासाठी कोकणातील संगमेश्वर येथे भव्य स्मारक उभारण्यात येणार आहे. तसेच बलिदान स्थळ असलेल्या मौजे तुळापूर व समाधीस्थळ मौजे वाढू बुद्रुक येथील स्मारकाचे काम प्रगतीपथावर असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

## अग्रलेख...

# विकास आता लांबणार नाही

प्रचंड बहुमत देऊन राज्यातील जनतेने सोपविलेल्या सत्तेचे सोने करायचे असेल तर काय करावे याचे नेमके भान असलेला राज्याचा सन २०२५-२६ या आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सोमवारी वित्तमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत मांडला, तेव्हा अपेक्षेप्रमाणे विरोधकांनी विरस झाल्याचा सूर लावलाच होता. पण जनतेच्या अपेक्षांची पूर्तता आणि राज्याचे सर्वांगीण हित या बाबींना सर्वोच्च प्राधान्य असले, म्हणजे किमान समान कार्यक्रमाबाबत सत्तेच्या सर्व सहभागी पक्षांमध्ये कसे अतूट ऐक्य असते, हे दाखवून देताना राज्यातील कोणत्याही योजनांना कोणतीही कात्री न लावता आणि गरीब, महिला, मध्यमवर्गीय, शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या खिशात हातदेखील न घालता नव्या भविष्याचे एक सुंदर चित्र उभे करण्याचे कौशल्य देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने दाखविले आणि हेच चित्र मोठ्या विश्वासाने विधानसभेत मांडून अजित पवार यांनी ऐक्याच्या भावनेचे आगळे दर्शनही घडविले. राज्याचे आणि जनतेचे हित हे समान उद्दिष्ट समोर ठेवूनच जेव्हा काही राजकीय पक्ष एकत्र येतात, तेव्हा त्या पक्षांच्या स्वतःच्या राजकीय धारणा आणि विचारसरणींचा कोणताही अडसर या उद्दिष्टाच्या आड येत नाहीत, हे दाखवून देणारा आणि जनतेच्या अपेक्षांचे भान असल्याची ग्वाही देणारा अर्थपूर्ण अर्थसंकल्प असे महाराष्ट्राच्या नव्या वर्षाकरिता सादर झालेल्या अर्थसंकल्पाचे वर्णन करता येईल. विशेष म्हणजे, अर्थसंकल्पाच्या पूर्वसंध्येस विरोधकांनी सरकारला तंबी देण्याच्या आविर्भावात काही सूचना केल्या होत्या. त्यामध्ये राज्याच्या हिताचे भान असेलही, पण त्याचा सूर मात्र, सरकारला कोंडीत पकडण्याचाच होता, हे नंतरच्या विरोधकांच्या पवित्र्यावरून पुरेसे स्पष्ट झाले. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीआधी महायुतीने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याच्या मुद्यावरून सरकारवर कुरघोडी करण्याकरिता विरोधकांनी आपली वैधानिक हत्यारे अगोदरपासूनच परजून ठेवली होती, हे अधिवेशनाच्या अगदी पहिल्या दिवसापासूनच स्पष्ट दिसू लागले होते. ज्यांनी निवडणुकीआधी महायुतीच्या लाडकी बहीण योजनेची खिल्ली उडविली होती, या योजनेमुळे सरकारी तिजोरीचा बोजा असह्य होणार असल्याने राज्य आर्थिक संकटात सापडेल असे भाकीत वर्तवत या योजनेबाबत लाभार्थी व सामान्य जनतेच्या मनातही संभ्रम माजविण्याचा प्रयत्न? चालविला होता, त्याच योजनेतील लाभार्थींच्या मासिक लाभात वाढ करण्याकरिता सरकारवर दबाव आणण्याचा विरोधकांचा पवित्रा होता. गेल्या आठवड्यात या मुद्यावरून विरोधकांनी राज्याच्या मंत्री अदिती तटकरे यांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्नदेखील केला होता. सोमवारी अर्थसंकल्प सादर करताना महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींचे कान हीच घोषणा ऐकण्यासाठी विधिमंडळाकडे लागून राहावेत, यासाठीची ही नियोजनबद्ध आखणीच होती. त्यामुळे, या योजनेच्या लाभाची रक्कम वाढवून एकविसशे रुपये एवढी करण्याबाबत राज्य सरकार कोणती भूमिका घेणार याबाबतची उत्सुकता निर्माण होणे साहजिकही होते. अजित पवार यांनी मोठ्या खुबीने हा मुद्दा हाताळल्याने विरोधकांचा विरस झाला आहे. राज्यात सध्या राबविण्यात येत असलेल्या योजनांचे मूल्यमापन करून त्यांचे सुसूत्रीकरण करणे आणि साधनसंपत्तीच्या स्रोतांचा अभ्यास करून त्यामध्ये वाढ करण्याच्या उपाययोजना सुचविणे यासाठी नेमण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीच्या शिफारशी विचारात घेऊन योजनांची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात येणार असल्याची त्यांची ग्वाही या योजनांच्या विद्यमान लाभार्थींना सुखावणारी ठरणार आहेच, पण महत्त्वाकांक्षी योजनांना निधीचा शाश्वत पुरवठा व्हावा यासाठी केंद्र सरकारकडून तसेच आंतरराष्ट्रीय वित्तीय स्रोतांकडून साह्य मिळविणे, सार्वजनिक मालमत्तेचे मुद्रीकरण, अशा काही नव्या अभिनव उपायायोजनाही सरकारने आखल्याने, योजनेच्या स्थैर्याबाबत संभ्रम माजविण्याचे विरोधकांचे मनसुबे फसल्यागत झाले आहेत.

केवळ लाडकी बहीण योजना हाच महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याच्या वाटचालीचा एकमेव मार्ग नाही, तर शेती आणि शेतकरी हा आर्थिक विकासाच्या वाटचालीचा मोठा भागीदार आहे, हे गतसालीच्या एकूण आर्थिक पाहणीवरूनच स्पष्ट झाले आहे. गेल्या दोन वर्षांत राज्याच्या कृषी क्षेत्राच्या कामगिरीत लक्षणीय वाढ झाली आहे. या तुलनेत उद्योग, सेवाक्षेत्रांच्या विकासदराने अपेक्षित पल्ला गाठला नाही हेही स्पष्ट झाल्यामुळे, यंदाच्या अर्थसंकल्पात या क्षेत्रांना उभारी देण्यासाठी काही ठोस उपाययोजना होणे अपेक्षितच होते. शेती, शेतीपूरक क्षेत्रे, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, पायाभूत सुविधा, सामाजिक विकास अशा सर्वांगीण विकासाच्या वाटचालीस पोषक अशी भरीव तरतूद करून राज्याच्या आर्थिक उन्नतीचा दूरगामी आराखडा फडणवीस सरकारच्या नजरेसमोर तयार आहे, हेही या निमित्ताने स्पष्ट झाले. सन २०४७ मध्ये, स्वातंत्र्याच्या शतक महोत्सवी वर्षात आर्थिक उन्नतीच्या शिखरावर पोहोचून प्रगत राष्ट्रांच्या मालिकेत भारताचा तिरंगा अभिमानाने फडकत असेल, तेव्हा या कर्तबगारीवर महाराष्ट्राच्या या महत्त्वाकांक्षी वाटचालीची मोहर उमटलेली असेल, याची जाणीव आपल्या भाषणातून अर्थमंत्री पवार यांनी उघड केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पपूर्तीला आणि पर्यायाने महाराष्ट्राच्या विकासाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'महाराष्ट्र आता थांबणार नाही' या विश्वासाला बळ देणारा अर्थसंकल्प सादर करून अजित पवार यांनी राज्याच्या विकासाचे एक आश्वासक चित्र रंगविले आहे.

कालपरवापर्यंत, अर्थसंकल्प समजून घेणे सर्वसामान्यांस सोपे वाटत नसे. माध्यमांनी रंगविलेल्या त्या चित्रातून, केवळ रुपया कसा येणार आणि कसा जाणार एवढ्या आलेखातून अर्थसंकल्पाचा अर्थ शोधण्याच्या क्षमता मर्यादित राहिल्या होत्या. काही वेळा राजकीय नेत्यांनाही हाच संभ्रम पडत होता. राजकीय प्रतिक्रियांच्या भाषेत बोलावयाचे झाले, तर विरोधकांनी अर्थसंकल्पवर टीका करावी आणि सत्ताधाऱ्यांनी स्तुतिसुमने उधळावीत एवढाच उपचार अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर राजकारणाच्या तंबूत पार पाडला जात असे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी तर, अर्थसंकल्पाची उकल करण्यातील आपल्या मर्यादांची स्पष्ट कबुलीदेखील दिली होती. बहुधा त्यामुळेच, अर्थसंकल्प कसा समजून घ्यावा याबाबतचे अभ्यासपूर्ण विवेचन असणारे पुस्तकच देवेंद्र फडणवीस यांनी लिहिले असावे आणि उद्धव ठाकरेच नव्हे, तर विरोधकांतील आणि सत्ताधाऱ्यांतील अनेकांना या पुस्तकामुळे अर्थसंकल्पाच्या आवाक्याचे आणि मर्यादांचेही नेमके भान आले असावे. आगामी वर्षांत महसुली जमा आणि महसुली खर्चातील तफावतीमुळे ४५ हजार ८९२ कोटींची महसुली तूट येईल, असा अंदाज आहे. मात्र, ही तूट कायद्याच्या चौकटीस मान्य असल्यामुळे, राज्याचा आर्थिक डोलारा डळमळीत होणार नाही याची काळजी घेण्याचे भानही सरकारने दाखविले आहे. मोटार वाहन कराच्या नव्या आकारणीतून राज्याच्या तिजोरीत सुमारे ११०० कोटींची भर पडण्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षभरात राज्यात विजेवर चालणाऱ्या वाहनांच्या संख्येत जवळपास अडीच लाख वाहनांची भर पडली आहे. एका बाजूला हे चित्र असताना, राज्यातील उद्योगधंदे, विकास प्रकल्प आणि वाढत्या गुंतवणुकीमुळे निर्माण होणाऱ्या संधींमुळे रोजगारात वाढ होऊनही जवळपास ७० लाख रोजगारक्षम व्यक्ती बेरोजगार असल्याचे गेल्या वर्षीच्या पाहणीतून उघड झाले होते. या दोन्ही वास्तवांची सांगड घालताना अभावग्रस्ततेच्या शक्यता संपविण्याचा सरकारचा निर्धारही स्पष्ट झाला आहे. येत्या पाच वर्षांत राज्यात ४० लाख कोटींची गुंतवणूक आणि ५० लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवून विकास आता लांबणार नाही, ही नवी ग्वाही राज्याला दिली आहे. फडणवीस सरकारच्या या संकल्पास जनतेच्या विश्वासाचे पाठबळ लाभले आहे. म्हणूनच, राज्याच्या हितासाठी विरोधकांनीही विकासाच्या या वाटचालीत सहभागी व्हायला हवे. अर्थसंकल्पाने त्यांना हीच संधी देऊ केली आहे.

---

## आंतरराष्ट्रीय

**वसंत गणेश काणे**

# ट्रम्प यांचे स्वप्न बृहन् अमेरिकेचे

**लेखांक ३ रा**

'मेक अमेरिका ग्रेट अगेन' (मागा) प्रमाणे 'मेक इंडिया ग्रेट अगेन' (मीगा) हा भारताचा ध्यास आहे, ही ट्रम्प आणि मोदी यांच्या चर्चेतली उभयपक्षी रोखठोक भूमिका बरेच काही सांगून जाते. यांच्या सहकार्यातून 'मेगा' म्हणजे काहीतरी विशाल/भव्य-दिव्य घडून येईल. मागा+मीगा=मेगा. अमेरिका व भारत यांची मिळून एक विशाल भागीदारी असावी, अशी टिप्पणी मोदींनी चर्चेचा समारोप करताना केली होती.

गेली अनेक वर्षे शिक्षणासाठी किंवा/आणि नोकरीसाठी अमेरिका हे जगातल्या विद्यार्थ्यांचे पसंतीचे ठिकाण राहिले आहे. अनेक भारतीय विद्यार्थ्यांचेही हेच स्वप्न असते. अमेरिकेतील शिक्षणाच्या संधी, तेथील शिक्षणाचा स्तर आणि नंतर आवडीच्या क्षेत्रात नोकरीची उपलब्धता यांचे विद्यार्थ्यांना विशेष आकर्षण असते. पण आज ट्रम्प यांनी स्वीकारलेल्या धोरणांमुळे अनेक विद्यार्थ्यांची आर्थिक अडचण होते आहे. तपासणी करणारे अधिकारी विद्यार्थ्यांना ते पैसे मिळण्यासाठी करीत असलेल्या कामाबद्दलची कागदपत्रे दाखवण्यास सांगतात. एफ-१ व्हिसाधारक आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना कॅम्पसमध्ये पैसे कमावण्यासाठी आठवड्यातून जास्तीत जास्त २० तास काम करण्याचीच कायदेशीर परवानगी आहे. या बंधनाला 'वर्क टाईम कॅप' असे म्हणतात. परंतु यातून मिळणारी रक्कम विद्यार्थ्यांचा रोजचा खर्च चालवण्यासाठी आणि शिक्षणासाठी घेतलेले कर्ज फेडण्यासाठी पुरेशी नसते. म्हणून हे विद्यार्थी उपाहारगृहे, पेट्रोल पंप आणि दुकानांमध्येही नोकरी करतात. अशी कमाई करणे ही विद्यार्थ्यांची गरज असली, तरी तो अमेरिकेत पैसे मिळविण्याचा अनधिकृत मार्ग ठरतो. तपासणीत हे उघडकीस आले तर हद्दपारी होऊ शकते, या भीतीने अमेरिकेतील परदेशी विद्यार्थी जगत हादरून गेले आहे. ही परिस्थिती दिवसेंदिवस अधिकाधिक तणावपूर्ण होत चालली आहे. अनधिकृत काम करणे सोडून द्यावे तर खर्चाचे काय?

ट्रम्प यांचा 'अमेरिका फर्स्ट' हा अजेंडा प्रभावीरीतीने राबविला जातो आहे. 'नोकऱ्यांचे बाबतीत स्थानिकांना प्राधान्य' या धोरणामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकऱ्या मिळणे कठीण होणार आहे आणि ज्यांना यापूर्वी मिळाल्या आहेत त्यांच्या नोकऱ्या केव्हा जातील, याचाही नेम राहिलेला नाही. पूर्वी



अमेरिकन मालक व्हिसाचे प्रायोजकत्व स्वीकारीत. शिक्षण पूर्ण झाल्यावर नोकरी देऊ, अशी भूमिका घेत असत. त्यामुळे व्हिसा मिळणे काहीसे सोपे झाले होते. आता स्थानिकांना प्राधान्य देण्याच्या धोरणामुळे नोकऱ्या कमी होणार आहेत. याचा परिणाम व्हिसा मिळण्यास अडचणी निर्माण होण्यात होणार आहे.

टेस्लाचे सीईओ ॲलन मस्क आणि रिपब्लिकन पक्षाचे एक प्रभावी नेते विवेक रामास्वामी यांसारख्या ट्रम्पच्या सल्लागारांनी उच्च-कौशल्य धारण करणाऱ्यांना स्थलांतर करण्यास हरकत नसावी, अशी भूमिका घेतली होती. परंतु, ट्रम्प यांची एच-१बी बाबतची भूमिका धरसोडीची आहे. एच-१बी व्हिसाच्या आधारे पदवीधर असलेल्या कुशल परदेशी कामगारांना अमेरिकेमध्ये तात्पुरते काम करण्यास परवानगी मिळते. दर तीन वर्षांनी त्याचे नूतनीकरणही केले जाऊ शकते. पुढे कायमस्वरूपी निवासासाठी आणि ग्रीन कार्डसाठी हे पहिले पाऊल मानले जाते. ही सोय भविष्यात खूप कमी लोकांना उपलब्ध होणार आहे. म्हणून विद्यार्थी जगतात आता उच्च शिक्षणासाठी पर्याय म्हणून ब्रिटन, जर्मनी, आयर्लंड, इटली आणि फ्रान्स यांसारख्या युरोपीय देशांचा विचार करायला सुरुवात होते आहे, असे दिसते. पण स्थानिकांच्या रेट्यापुढे त्यांचीही धोरणे भविष्यात बदलणारच नाहीत, याचा काय भरवसा? देशातच उत्तम नोकरीच्या आणि शिक्षणाच्या संधी उपलब्ध असणे, हाच या सर्वांवरचा खात्रीलायक उपाय आहे. 'बेकायदा स्थलांतरितांना मायदेशी पाठविण्याचा अमेरिकेच्या इतिहासातील सर्वांत मोठा कार्यक्रम' डोनाल्ड ट्रम्प यांनी हाती घेतला आहे. गेल्या काही काळात युरोप-अमेरिकेसह अनेक देशांमध्ये बेकायदा स्थलांतरित नागरिकांचा प्रश्न उग्र रूप धारण करीत आहे. या स्थलांतरितांच्या विरोधात त्या त्या देशांतील नागरिकांच्या भावना तीव्र होत आहेत. साहजिकच हा मुद्दा निवडणुकीत लोकप्रिय ठरला आणि नागरिकांच्या असंतोषावर स्वार होणारे राजकारणी त्या त्या देशात सत्तेवर आले.

अमेरिकेतील सर्वाधिक बेकायदा स्थलांतरित हे लॅटिन अमेरिकी देशांमधील आहेत. त्यामध्ये मेक्सिको, ग्वाटेमाला आणि होंडुरास हे देश आघाडीवर आहेत. एका अहवालानुसार तेथे सव्वासात लाख भारतीयही अमेरिकेत अवैधरीत्या राहत असल्याचे सांगितले जाते. सध्या बेकायदेशीररीत्या राहणाऱ्या सुमारे १८ हजार भारतीयांची ओळख ट्रम्प प्रशासनाला पटली आहे. त्यापैकी शेकडो जणांना लष्करी विमानाने परत पाठविण्यात आले. त्यामधील काही जणांनी बेकायदेशीर रीतीने सीमा ओलांडून अमेरिकेत प्रवेश केला होता, तर काही जण नियमांचे उल्लंघन करून किंवा पुरेशा कागदपत्रांविना अमेरिकेत राहत होते, असे निदर्शनास आले आहे. व्हिसाची मुदत संपल्यावरही तेथेच वास्तव्य करणारे नागरिकही त्यात आहेत. 'ग्रीन कार्ड'चे नूतनीकरण न केल्यानेही काही जण बेकायदा नागरिकांच्या यादीत आले आहेत. काही जणांनी अमेरिकी पती-पत्नीशी घटस्फोट घेतल्याने त्यांना नागरिकत्वाचे कायदेशीर संरक्षण राहिलेले नाही. अशा सर्वांना ट्रम्प प्रशासनाने 'घुसखोर' ठरविले असून सर्व संबंधित देशांच्या प्रमुखांशी चर्चा करून पाठवणीचा कार्यक्रम आखला आहे. पण सध्यातरी हा कार्यक्रम भारतीयांपुरताच मर्यादित दिसतो आहे. 'मित्र' देशाकडून यापेक्षा अधिक समजूतदारपणाची अपेक्षा असते.

भारतीयांच्या या परत पाठवणीच्या मोहिमेला सहकार्य करण्याची भूमिका घेण्याविना भारतापुढे सध्या तरी पर्याय दिसत नाही. भारत उपद्रवी स्थलांतरितांमुळे बेजार असला, तरी अमेरिकेत स्थलांतर करणारे भारतीय असे उपद्रवी नाहीत. ते त्या देशाच्या संपन्नतेत मोलाची भर घालत आहेत. इतर देशांतील बेकायदा स्थलांतरितांमधील उपद्रवी, अतिरेकी आणि दहशतवादी जगातील सर्वच देशांना त्रासदायक ठरत आहेत. ठिकठिकाणी धार्मिक व आर्थिक स्वरूपाचे प्रश्न निर्माण करीत आहेत. आसाममध्ये तर घुसखोरच शिरजोर झाले आहेत की काय, असे वाटू लागते. जागतिक अर्थकारण आणि नोकरी-व्यवसायांतील संधी यांचे बदलते चित्र पाहता सर्वच देशांना उपद्रवी स्थलांतरितांच्या प्रश्नाला आता सामोरे जावेच लागणार आहे. गरजूंना आश्रय देताना त्यांच्या सोबतीने बेमालूमपणे येणाऱ्या उपद्रवी, अतिरेकी, दहशतवादींमुळे नवे प्रश्न निर्माण होणार नाहीत, याची काळजी सगळ्यांनाच घ्यावी लागेल.

९४२२८०४४३०

---

## वेध

**नितीन शिरसाट**

# अमली पदार्थांच्या तस्करीने युवकांचे आरोग्य धोक्यात

होळी, रंगपंचमी हा पारंपरिक सण दरवर्षी मोठ्या संख्येत आबालवृद्धांपासून तरुण-तरुणी हर्षोल्हासात साजरा करतात. या दिवशी आदिवासी समाजातील महिला महाराष्ट्र, मध्यप्रदेश, राजस्थान यासह इतर प्रातांत पतीला लाठीमार करून वर्षभरात झालेल्या चुकांचा पत्नी हक्काने समाचार घेत असल्याची परंपरा आजही कायम आहे. या सणाला मद्य, गांजा, अफू, भांग अशा अमली पदार्थांची मोठ्या प्रमाणात विक्री केली जाते. पोलिसांच्या सतर्कतेमुळे शेती पिकात होणाऱ्या गांजा व अफूच्या शेतीवर धाड टाकून कारवाई केली जाते. गेल्या एक महिन्यापूर्वी बुलढाणा तालुक्यातील धाडनजीक स्थानिक गुन्हे शाखेने आंध्र प्रदेशातून येणारा ९२ लाख रुपयांचा गांजा पकडला होता. त्यानंतर हत्ता-तांबोळा परिसरात एका शेतकऱ्याने दुर्गम भागातील आपल्या तीन एकर शेतात तुरीच्या शेतात गांजाची शेती केल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. पोलिस निरीक्षक अशोक लांडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी कारवाई करीत एक कोटी ४० लाख २७ हजार रुपयांचा गांजा जप्त केला आहे. अमली पदार्थ प्रतिबंधाविरोधातील ही अलिकडील काळात मोठी कारवाई आहे. आतापर्यंत जिल्हा पोलिस अधीक्षक विश्व पानसरे यांच्या पथकाने गेल्या चार महिन्यात १७ कोटी ८४ लाख १६ हजार रुपयांचा अफू व गांजा शेती करणाऱ्यांवर कारवाई केली आहे.

मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र राज्याच्या सीमेवर सातपुडा पर्वताच्या रांगा व घनदाट जंगल आहे. याच भौगोलिक परिस्थितीचा फायदा घेत अवैध शस्त्रांसह अमली पदार्थांच्या तस्करीचा प्रकार दोन्ही राज्यांच्या सीमेवर सतत सुरू असतो. विशेषतः मध्य प्रदेशात या प्रकारांकडे फारसे लक्ष दिले जात नसल्याची झळ लगतच्या महाराष्ट्रातील जळगावसह धुळे जिल्ह्याला बसतो. जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यात खासकरून सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या गावांमध्ये राजरोसपणे गांजाची शेती करण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे शासनाकडून उपजीविकेसाठी मिळालेल्या वनपट्ट्यांवरही गांजाची शेती केली जात आहे. शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसाय करता यावा या हेतूने अफू आणि गांजाची शेती करण्याची परवानगी मिळावी यासाठी पुणे जिल्ह्यातील काँग्रेसच्या एका नेत्याने पत्राद्वारे थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी केल्याने खळबळ उडाली आहे. ग्रामपंचायतीच्या अवाजवी कर आकारणीमुळे हतबल झालेल्या काँग्रेसच्या नेत्याकडे ही मागणी केल्याने सगळेच अवाक्? झाले आहेत. काँग्रेसचे पुणे जिल्हा सरचिटणीस नंदकुमार चौधरी यांनी ही मागणी पत्राद्वारे केली आहे. त्यांनी २००७ पासून शासनाच्या चुकीच्या निर्णयामुळे बळी जात असलेल्या शेतकऱ्यांच्या यादीत त्यांचा समावेश आहे. कुक्कुटपालन आणि गाई-म्हशीपालन हा व्यवसाय शेतीपूरक मानला गेला आहे. ज्याप्रमाणे शेती निसर्गावर अवलंबून असते. तसेच शेतकऱ्याच्या कोणत्याही पिकाला शासन हमीभाव देत नाही. कुक्कुटपालन व्यवसायदेखील हा या लहरी निसर्गावर आणि करार करणाऱ्या कंपन्यावर अवलंबून आहे. शासनाने करार पद्धतीने कार्यरत असणाऱ्या कंपन्यावर नियंत्रण ठेवलेले दिसून येत नाही. म्हणून सर्रास कुक्कुटपालन शेतकऱ्यांची वर्षानुवर्षे पिळवणूक करत आलेले आहेत, अशी शेतकऱ्यांची शेतीपूरक व्यवसायातून होणाऱ्या पिळवणुकीची व्यथा त्यांनी पत्राद्वारे मांडली आहे. कोरोना काळापासून तसेच पक्ष्यांवरील आजाराने कुक्कुटपालन व्यवसाय अत्यंत अडचणीत सापडला असून, या व्यवसायाला शासन कोणत्याही प्रकारची मदत करीत नसल्यामुळे व्यवसाय करणे कठीण झाले आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी शेडमध्ये अफू व गांजा हे पीक घेण्यासाठी परवानगी द्यावी, अमली पदार्थांशी संबंधित कायद्याचे एकत्रीकरण आणि सुधारणा करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने तरतूद करावी अशी मागणी त्यांनी रेटून धरली आहे. धुळे जिल्ह्यात मध्यप्रदेशच्या सीमेलगत शिरपूर तालुक्यातील आंबा शिवरात वनजमिनीवर गांजाच्या शेतीवर गुन्हे शाखेच्या पथकाने ८ मार्च रोजी छापा टाकला. या छाप्यात २ कोटी २० लाखांची गांजा झाडं ताब्यात घेण्यात आली. पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलिस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय सुनील गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलिस निरीक्षक श्रीराम पवार आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे. या प्रकरणी पुढील तपास मनोज कचरे करत आहेत शिरपूर येथील कैलास पावराने गांजाची आधुनिक पद्धतीने लागवड केली. गांजाच्या पिकासाठी संपूर्ण शेतात ठिबकची व्यवस्था होती. तसेच दोन पिकांच्या मधोमध गांजाची लागवड केली होती. जेणेकरून गांजाकडे लक्ष जाणार नाही. परंतु पोलिसांनी यामध्ये कारवाई करत गांजा नष्ट केला आहे. अमली पदार्थांच्या सवयीमुळे युवक व्यवसाधीनतेकडे वळू लागला आहे. त्यामध्ये मध्यम तसेच उच्च श्रेणीतील कुटुंबाला मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे अनेकांची कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत.

९८८१७१७८२८

---

## विश्लेषण


**- चन्द्रशेखर टिळक**

# अर्थसंकेत आणि अर्थसंकल्प

आपल्या महाराष्ट्र राज्यासाठीचा आर्थिक वर्ष २०२५ - २६ या सालासाठीचा अर्थसंकल्प आपल्या राज्याचे अर्थमंत्री माननीय श्री. अजितदादा पवार यांनी आपल्या राज्याच्या विधानसभेला सोमवार, १० मार्च २०२५ रोजी सादर केला. ते भाषण ऐकत असताना मनात आलेले काही विचार असे या लेखाचे स्वरूप आहे. अशा नोंदी करायला सुरुवात करण्याआधीच मला हे स्पष्ट करू देत की हे लेखन म्हणजे या अर्थसंकल्पवरची टीका किंवा टिप्पणी नाही. या अर्थसंकल्पाचे हे समर्थनही नाही आणि विरोधही नाही. तर एकंदरीतच अर्थसंकल्प या महत्त्वपूर्ण घटने बाबतच मनातली प्रतिमा आणि प्रतिबिंब यांच्या दरम्यानचे तरंग आहेत. हा परिच्छेद म्हणजे या लेखाचा Disclaimer Clause आहे असे म्हणले तरी निश्चितच चालेल.

का कोण जाणे... पण हे भाषण ऐकत असताना , नंतर त्याबाबतची काही मोजकी कागदपत्रे पाहात असताना मला राहून राहून कौटिल्य प्रणित अर्थशास्त्र , विदुरनीती, कणकनीती यातले काही संदर्भ आठवत होते. या तिन्ही ठिकाणी सरकारी अर्थकारण या विषयाबाबत काही अर्थ संकेत दिले आहेत. त्या अर्थ संकेतांची मला विशेषत्वाने आठवण येत आहे. या तिन्ही ठिकाणी अर्थमंत्री आणि अर्थसंकल्प हे दोन्ही शब्द नाहीत याची मला पूर्ण जाणीव आहे. पण एकंदरीतच सरकारी अर्थकारण आणि त्याबाबतचे सरकारी अर्थ - प्रशासन याबाबतचे उल्लेख त्यात नक्कीच आहेत. त्याबाबतचा तिथे असणारा एक उल्लेख म्हणजे सरकारी अर्थ प्रशासनाची धुरा सांभाळणारी व्यक्ती राजाच्या मर्जीतील असावी. त्या व्यक्तीवर राजाचा पूर्ण विश्वास असावा. आता लोकशाही राज्य - व्यवस्थेत काही राजा नसतो.

निदान नसावा. पण राजा हा शब्द ध्वन्यार्थाने न घेता तो जर



भावार्थाने घेतला ( आणि तो तसाच घेतला पाहिजे ) तर त्यावेळचा राजा म्हणजे आजच्या लोकशाही परिभाषेत देशाचा पंतप्रधान किंवा राज्याचा मुख्यमंत्री. अशा परिस्थितीत या निकषांचा विचार करायचा झाला तर आपल्या राज्याचे अर्थमंत्री माननीय श्री. अजितदादा पवार यांच्यावर आपले मुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचा पूर्ण विश्वास आहे. काहींच्या मते तर माननीय देवाभाऊ यांचा स्वतःच्या पक्षातील मंडळींवर विश्वास नाही इतका माननीय अजितदादा यांच्यावर विश्वास आहे. अशा विश्वासाचा संदर्भ पुढे नेत कौटिल्य अर्थशास्त्र असे सांगते की राजाचा अर्थ - प्रमुखावर पूर्ण विश्वास असला की राजा संबंधित अर्थप्रमुखाला पूर्ण वाव देतो. त्यातून अर्थ प्रशासनात सुसूत्रता येते. अनावश्यक राजकीय हस्तक्षेप टाळला जातो. त्यातून अर्थकारण सुविहीत होते. हे दोन संदर्भ एकत्र घेत कौटिल्य अर्थशास्त्र आणि विदुर नीती असे सांगते की या दोन गोष्टींचा फायदा आणखीन जोमदारपणे मिळायला हवे असतील तर अर्थप्रमुख अनुभवी असावेत. माननीय अजितदादा विधी मंडळाचे सभासद म्हणून निश्चितच ज्येष्ठ आणि अनुभवी सभासद आहेत. त्याशिवाय निदान ५ वेळा ते आपल्या राज्याचे उपमुख्यमंत्री राहीले आहेत. माननीय अजितदादा अर्थमंत्री म्हणूनही अनुभवी आहेत. १० मार्च २०२५ रोजी त्यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा आपल्या राज्यासाठी सादर केलेला ११ वा अर्थसंकल्प आहे. त्याबाबतीत माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे, माननीय श्री. जयंत पाटील यांच्यासारखी अर्थमंत्री पदाची प्रदीर्घ कारकिर्द माननीय श्री. अजितदादा यांनाही लाभली आहे. हे तीन संदर्भ एकत्रपणे पुढे नेत कौटिल्य अर्थशास्त्र असे सांगते की अर्थप्रमुख एकंदरीतच प्रशासनातील स्वतःच्या स्थानाविषयी निश्चिंत असावेत. तसे ते असले पाहिजेत. तरच ते प्रभावीपणे काम करू शकतात.

आता आपल्या राज्याच्या गेल्या काही वर्षातील राजकारणाचा विचार केला तर माननीय श्री. अजितदादा पवार यांच्या इतका स्वतःच्या पदाविषयी स्थिर आणि निश्चिंत दुसरा कोणीही राजकारणी आपल्या महाराष्ट्राच्या राजकारणात आजच्या घडीला नसेल. आपल्या राज्याचा मुख्यमंत्री कोणीही असू दे, आपले उपमुख्यमंत्री, आपले अर्थमंत्री, आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय श्री. अजितदादा पवार असणार हे निश्चीत आहे. हे ४ अर्थसंकेत अशासाठी महत्त्वाचे आहेत की या संकेतांची परिपूर्ती होते किंवा झाली की अर्थ प्रमुख दीर्घकालीन नियोजन करण्यास मानसिक दृष्ट्या सजग आणि प्रशासकीय दृष्ट्या सक्षम असतो. आता या साऱ्याचे प्रभावी प्रतिबिंब आपल्या राज्याच्या यंदाच्या अर्थसंकल्पात पडले आहे की नाही हे ज्याचे त्याने ठरवलेले बरे ! कारण आपल्या देशात आणि राज्यात लोकशाही आहे.

---

### 'आप'चा थयथयाट

'भाजपच्या नेत्यांनी महिलांच्या तोंडाला पाने पुसली : आतिशी' ही बातमी वाचली. दिल्ली विधानसभेत सत्तावीस वर्षांनंतर भाजपने प्रचंड बहुमत मिळवून आम आदमी पक्षाकडून सत्ता हिसकावून घेतल्यापासून आम आदमी पक्षाच्या नेत्यांचे मानसिक स्वास्थ्य हरवले आहे. महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याचे भाजपने आश्वासन दिले होते. त्यादृष्टीने पक्षाने तयारीही सुरू केली आहे. योजनेला मंत्रिमंडळाची मंजुरी, त्यासाठी बजेटमध्ये तरतूदही करण्यात आली आहे. गरजवंतांसाठी अटी, शर्ती ठरवण्यासाठी त्रिसदस्यीय समितीचे गठन करण्यात आले आहे. या योजनेचा गैरफायदा कोणीही घेऊ नये यासाठी काही कडक नियम करणे आवश्यक आहेच. त्या प्रक्रियेला काही कालावधी लागणारच. आम आदमी पक्षाच्या नेत्यांनी अगदी शब्दांत पकडून भाजपला खिंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. आता मदत मिळाली तरी ती आम आदमी पक्षामुळेच मिळाली असा अपप्रचार करण्याचा प्रयत्न ते करत आहेत.

वास्तविक येत्या पाच वर्षांत भाजप सरकार दिल्लीचा चेहरामोहरा असा बदलून टाकेल की इथून पुढे आम आदमी पक्षाला सरकारच काय पण दोन अंकी आमदार मिळणेही दुरापास्त होणार आहे हे आम आदमी पक्षाला ठावूक आहे. त्यासाठी ते भाजप सरकारच्या कामांचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करणार हे उघड आहे. पण आम आदमी पक्षाच्या नेत्यांची सर्व नाटके जनता उत्तम प्रकारे जाणून आहे आणि म्हणून त्यांच्या थयथयाटाचा काहीही उपयोग होणार नाही.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### वाचाळवीरांना आवरा

मागील काही दिवसांपासून महाराष्ट्रात वाचाळवीरांचे मोठे पेव फुटले आहे. हे वाचाळवीर फक्त राजकारणातीलच आहेत असे नाही तर राजकारणाबाहेरचेही आहेत. रोज कोणीतरी उठतंय आणि काहीतरी वादग्रस्त विधानं करून चर्चेत राहतो. कोणी महापुरुषांची बदनामी होईल अशी विधाने करतोय, तर कोणी मराठी भाषेचा अपमान होईल अशी वक्तव्य करतोय. बरं बोलून झाल्यावर प्रकरण अंगाशी येत आहे असे दिसू लागताच माझ्या वक्तव्यांचा विपर्यास केला गेला किंवा मी असे बोलोलोच नाही अशी सारवासारव करतात. प्रकरण खूपच अंगलट आलं की मग दिलगिरी व्यक्त करून किंवा माफी मागून माघार घेतात. प्रश्न असा पडतो की जर माघार घ्यायचीच असेल तर वाचाळवीरांकडून वादग्रस्त विधाने का केली जातात. आपल्या वादग्रस्त विधानांनी समाजाच्या भावना दुखावल्या जातात हे माहीत असूनही जाणीवपूर्वक वादग्रस्त विधाने करून सामाजिक वातावरण दूषित करून अराजकता माजवणाऱ्या या वाचाळवीरांना आवरण्याची वेळ आली आहे. वादग्रस्त विधाने करून सामाजिक वातावरण दूषित करणाऱ्या या वाचाळवीरांना कायद्याचा बडगा दाखवावा लागेल. भारतीय राज्यघटनेने अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिलंय पण अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. जर अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा वापर इतरांचा भावना दुखावण्यासाठी आणि महापुरुषांच्या बदनामीसाठी होत असेल तर त्याला लगाम घालावाच लागेल. वादग्रस्त विधाने करून सामाजिक वातावरण दूषित करणाऱ्या वाचाळवीरांना रोखण्यासाठी कायद्यात सुधारणा करावी लागेल.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

## वाचक पत्रे

### लोकसभेच्या जागांचा तिढा कसा सोडविणार?

स्वातंत्र्यानंतर देशाची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. १९४७ च्या वेळी केवळ ३५ कोटी लोकसंख्या असलेला भारत आज १४० कोटी पार कडून जगात प्रथम क्रमांकावर आहे. उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, छत्तीसगड, बिहार राजस्थान या राज्यांची लोकसंख्या देशाच्या सरासरी १७ टक्के वाढीपेक्षा अधिक आहे. त्यामानाने दक्षिणेकडील पाच राज्यांत लोकसंख्या वाढीचा वेग कमी आहे. लोकप्रतिनिधी कायद्यानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात लोकप्रतिनिधींची संख्या निश्चित होत असते. निधीचे वाटप सुद्धा त्यानुसार होत असते.

सध्याची लोकसभेची संख्या ५४३ एवढी आहे. १९७१ च्या जनगणनेनुसार १९७८ व २००८ अशा दोन वेळा मतदारसंघाची पुनर्रचना करण्यात आली होती. आता २०२६ मध्ये होणाऱ्या जनगणनेनंतर लोकसंख्येच्या आधारे लोकसभेच्या जागांची पुनर्रचना करण्याचा सरकारचा मानस आहे. यात सर्वांत नुकसान दक्षिणेकडील राज्यांचे होणार आहे. आता तामिळनाडूच्या सरकारने लोकसंख्या व विकासाच्या बाबतीत चांगली प्रगती केली आहे. असे असून जर लोकसंख्येच्या प्रमाणात लोकसभेच्या जागांचे वाटप झाले तर तो एक महत्त्वाचा मुद्दा बनू शकतो. आज जगात जपान, चीन आदी देश लोकसंख्या वाढ होऊ दे अशी याचना वेगवेगळ्या मार्गाने करत आहेत. काही वर्षात भारतावर सुद्धा ही वेळ येणार आहे. यावर केंद्र सरकारने एखादी समिती नेमून सर्वमान्य तोडगा काढावयास हवा.

**शांताराम वाघ**/९६२३४५२५५३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### आणखी एका बांग्लादेशीला १३ मार्चपर्यंत पोलिस कोठडी

**सोलापूर, दि. १० मार्च -**

एमआयडीसी पोलिस ठाण्यात हद्दीत १३ व्या बांग्लादेशी नागरिकास रविवारी रात्री पोलिसांनी ताब्यात घेतले, त्यास सोमवारी न्यायालयात हजर केले असता, त्यास १३ मार्चपर्यंत पोलिस कोठडी मिळाली आहे. अनेसूर मोहम्मद अब्दुल कलाम शेख (वय ३३ रा. बांग्लादेश,सध्या रा. जगदंबा रेडीमेड ड्रेसेस शेजारी,एमआयडीसी सोलापूर) असे अटकेत असलेल्या व्यक्तीचे नाव आहे. तो व्यक्ती मागील १२ वर्षापासून देशातील विविध भागात राहिला आहे. त्याचा जन्मदाखला हा बांग्लादेशातील असल्याची माहिती समोर आली आहे. आतापर्यंत एकुण १३ बांग्लोदशी व एक एजंट अशी १४ जण अटकेत आहेत. अटकेतील आरोपींची चौकशी केली जात आहे. प्रथम पकडलेल्या १२ जणांना मंगळवारपर्यंत पोलिस कोठडी मिळाली होती. त्यांची उद्या मंगळवार दि ११ रोजी मुदत संपत असून उद्या त्या बारा जणांना पुन्हा न्यायालयात हजर केले जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान पोलिसांनी श्री जगदंबा महिला रेडीमेड ड्रेसेस विविध उत्पादन सहकारी औद्योगिक संस्था मर्यादीत सोलापूर, अंध व अपंग कार्यरत असणाऱ्या औद्योगिक संस्थेच्या कागदपत्रांची मागणी केली आहे. पोलिस निरीक्षक विजय खोमणे पुढील तपास करीत आहेत.



### अक्कलकोटमध्ये गणित विषयाचा पेपर पोहोचविण्यास विलंब; रिपाईचे निवेदन

**सोलापूर, दि. १० मार्च,**

दहावीचा गणित भाग २ चा पेपर दुपारी एकला संपलेला असताना अक्कलकोट पंचायत समितीच्या कस्टडीला रात्री पावणेनऊला पोहोचविला गेला असून यात गडबड झाल्याचा संशय रिपाइंचे आठवले गटाचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी व्यक्त केली आहे. यामुळे शिक्षण विभागाचा सावळागोंधळ चव्हाटयावर आला आहे. अक्कलकोटला रात्री पावणेनऊ वाजता गणिताचा पेपर कस्टडीला आणल्याचे प्रकरण गाजत असताना मडीखांबे यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे केली आहे. यावेळी ` जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, गोरखनाथ धाडेमनी, आदींची उपस्थिती होती शुक्रवार ७ मार्च रोजी दहावीचा गणिताचा पेपर होता. सकाळी ११ ते दुपारी १ असा पेपरचा कालावधी होता. पेपर संपल्यानंतर दोन ते अडीच तासात पेपर कस्टडीमध्ये पोहोचवणे अपेक्षित असताना अक्कलकोट पंचायत समितीच्या कस्टडीत रात्री पावणेनऊ वाजता रिक्षातून कोणतीही सुरक्षा नसताना दहावीचे पेपर आणण्यात आले आहेत. या पेपरसोबत शिक्षण विभागातील कोणतीही जबाबदार व्यक्ती नव्हती.

**वेगवेगळ्या घटनांमध्ये शहरात**

# तिघांची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० मार्च -**

शहरात वेगवेगळ्या घटनांमध्ये तिघांनी गळफास घेऊन आत्महत्या केली.



विजयकुमार नारायण भोसले (वय ४९, रा. अंबिका नगर, बाळे, सोलापूर) यांनी अज्ञात कारणावरून गळफास घेऊन आत्महत्या केली. १० मार्च रोजी सकाळी दहाच्या सुमारास विजयकुमार भोसले यांनी राहत्या घरी अज्ञात कारणावरून घराच्या छताच्या लोखंडी अँगलला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्यानंतर फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे सहायक फौजदार जाधव यांनी भोसले यांस खाली उतरवरून बेशुध्दावस्थे शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. प्रतीक माने यांना भोसले यांना मृत घोषित केले.

दुसऱ्या घटनेत अभिषेक विजय यनगंदुल (वय ४५, रा. शिवलिंग नगर, सुनिल नगर, सोलापूर) यांनी घरी ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. १० मार्च रोजी दुपारी १२ च्या सुमारा अभिषेक यनगंदुल यांना राहत्या घरी अज्ञात कारणावरून लोखंडी हुकला ओढणीच्या सहययाने गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्यानंतर एमआयडीसी पोलिस ठाण्याकडील पोलिस हवालदार डोके यांनी यनगंदुल यांस खाली उतरवून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. प्रतीक माने यांनी यनगंदुल यांस मृत घोषित केले.

तिसऱ्या घटनेत भवानी पेठेतील वैद्यवाडी येथील मंगलाबाई (वय ५५) या महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केली. १० मार्च रोजी दुपारी एकच्या सुमारास मंगलाबाई यांनी राहत्या घरी अज्ञात कारणावरून लाकडी वाशाला कापडी फेट्याने गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्यानंतर जोडभावी पेठ पोलिस ठाण्यातील हवालदार दुधाळे यांनी मंगलाबाई यांस खाली उतरवून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. पूजा लवटे यांनी मंगलाबाईल मृत घोषित केले. या तिन्ही घटनांची नोंद सिव्हील पोलिस चौकीत करण्यात आली आहे.

## मोदी मुस्लीम कब्रस्तान गेटसमोर फटाके उडविणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

मोदी मुस्लीम कब्रस्तान गेटसमोर फटाके उडविणाऱ्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिस हवालदार प्रविण गडेराव यांना दिलेल्या फिर्यादीवरुन विद्याशरण लक्ष्मीशरा अवस्थी (वय २९), ओंकार शिवानंद जिनेकरी, वैभव महादेव हिंगमिरे, समर्थ उर्फ सॅम गायकवाड (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९



मार्च रोजी रात्री दहाच्या सुमारास व्हिआयपी रोडवरील मोदी मुस्लीम कब्रस्तान गेटसमोर विद्याशरण अवस्थी व त्याचे साथीदार हे रात्री दहानंतर फटाके उडविताना मिळून आले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक माडे पुढील तपास करीत आहेत.

## जिल्हा परिषद कर्मचारी युनियनचे विविध मागण्यांसाठी घंटानाद आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च ,**



राज्यात जिल्हा परिषद अंतर्गत काम करणा-या कर्मचा-यांच्या दिर्घ कालावधीपासून जुनी पेन्शन ,वेतनत्रुटी व पदोन्नतीमधील स्तर कमी करणे आदी प्रलंबित मागण्याबाबत शासन पातळीवर दुर्लक्ष व उदासिनता होत असल्याने शासनाचे लक्ष वेधणेकरीता जिल्हा परिषद सोलापूर येथे जिल्हा परिषद कर्मचारी युनियन सोलापूरच्या वतीने दुपारी प्रलंबित् मागण्याच्या आग्रहासाठी सोलापूर जिल्हा परिषद पुनम गेटसमोर घंटानाद आंदोलन करण्यात आले . घंटानाद आंदोलनातील प्रलंबित मागण्याचे निवेदन जिल्हाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले. यावेळी विभागीय संघटक शत्रुघ्नसिंह माने , जिल्हाध्यक्ष तजमुल मुतवल्ली , सचिव विलास मसलकर , निर्मला राठोड , बसवराज दिंडरे , स्वाती स्वामी, संतोष शिंदे, मृणालिनी शिंदे , विशाल घोगरे, राकेश सोड्डे, सोनाली कदम, सविता काळे, रोहीत घुले, अंबिका वाघमोडे , महेश पंतगे, रहिम मुल्ला, महेश केंद्र, नवनाथ वास्ते, रणजित घोडके ,नागेश कोमारी, उमाकांट ढेकळे , अभिजीत कांबळे , आरती माढेकर , दयानंद परिचारक, रफ़िक शेख, प्रभाकर डईजोडे विशाल उंबरे , श्रीमती सविता मिसाळ, ज्योती लामकाने , अश्विनी सातपुते, फर्जाना शेख, पोगुल, श्रीशैल देशमुख, योगेश हब्बू, शिवा नागूर, पेठकर, डाळजी, श्रीमती प्रथम शेट्टी, रामकृष्ण पाटील ,तानाजी अवताडे, शिवानंद म्हमाने ,श्रीधर कलशेट्टी, मनोज राठोड, अभिमन्यू कांबळे, दत्ता घोडके, माळी, भोसले, पोगुलवड, रांजणे, ऋतुजा शिंदे, गायकवाड, हरिष राऊत, संजय पाटील, एस एम पेद्दे, सचिन पवार, शहानवाज शेख, दिपक चव्हाण, विजय् लिंगराज, शरद वाघमारे , सलिम शेख, ओमप्रकाश कोकणे, गायकवाड, पांचाळ, शिवाजी राठोड, चंद्रकांत कोळी, रोहन भोसले, संदीप घोडके, प्रसाद काशीद, मल्लिनाथ स्वामी, चिन्मय घाडगे, भीमाशंकर वाले, हारून नदाफ, प्रफुल रणदिवे, गणपती कांबळे, सूर्यकांत साळूंके, सौरभ डोंगरे, सचिन कारडे, श्रीकांत धोत्रे, गुरु रेवे, आदी उपस्थित होते.

## फॉरेन लिकर लायसन्सचे आमिष दाखवून फसविले

**सोलापूरच्या पैलवानाची दीड कोटी रूपयांची फसवणूक करणाऱ्या बाप-लेकाविरुध्द गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० मार्च -**

फॉरेन लिकर लायसन्स मिळवून देण्याचे आमिष दाखवून सोलापूरच्या पैलवानाची व त्याच्या नातेवाईकाची १ कोटी ५५ लाख ३२ हजार ५०० रुपयांची फसवणुक करणाऱ्या अहमदनगरच्या बाप-लेकाविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे.

याबाबत युवराज कोंडीबा सरवदे (वय ३८, रा. घर नं. १३/ब, रविवार पेठ, जोशी गल्ली, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मोहन शिवाजी तावरे आणि शाम मोहन तावरे (रा. पिसोरा बु, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

युवराज सरवदे आणि मोहन तावरे यांची गेल्या दहा वर्षापासून ओळख आहे. या ओळखीतून सरवदे व तावरे यांनी किरकोळ व्यवहार झालेले आहेत. या दरम्यान सरवदे यासं कर्ज हवे असल्याने तावदे बाप-लेकाने सरवदे यास एफएल-१ (फॉरेन लिकर लायसन्स) चे लिकर व्यवसायाकरीता आणि एफएल २, सील २ (वाईन शॉप) चे सरेंडर लायसन्स मुंबई येथील मंत्रालयातून नुतनीकरण करून घेऊन त्या लायसन्सची विक्रि केल्यास ८ ते १० कोटी रूपये मिळतील असे सांगितले. त्यामुळे सरवदे व त्यांचा नातेवाई हरिष वाघमारे यांनी तावरे बाप-लेकास वेळोवेळी १ कोटी ५५ लाख ३२ हजार ५०० रुपये दिले. हे पैसे तावरे बाप-लेकाने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी वापरून सरवदे यांस लायसन्स न देता दोघांची फसवणुक केली. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला असून पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे पुढील तपास करीत आहेत.



## शहरातून दोन महिला तीन मुलांसह बेपत्ता











**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० मार्च -**

सोलापूर शहरातून दोन महिला त्यांच्या तीन मुलांसह बेपत्ता झाल्या आहेत. याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

प्राजक्ता संजय तोडकर (वय २५, रा. त्रिमुर्ती नगर, तुळजापूर रोड, शेळगी, सोलापूर) या महिलेसोबत एक सहा वर्षाचा व एक २ वर्षाची मुलगी बेपत्ता झाली आहे. तर मोनिका सचिन सिरसट (वय २५, रा. न्यु बुधवार पेठ, वीर फकीरा चौक, सोलापूर) या महिलेसोबत दोन वर्षाची मुलगी बेपत्ता झाली आहे. प्राजक्ता तोडकर ही महिला तिच्या दोन्ही मुलांसह २८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता राहत्या घरातून कोणास काहीएक न सांगता निघून गेली आहे. तिच्या नातेवाईकांनी तिचा सर्वत्र शोध घेतला असता ती मिळून आली नाही. म्हणून संजय रामचंद्र तोडकर (वय ३५, रा. त्रिमुर्ती नगर, शेळगी, सोलापूर) यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात बेपत्ता झाल्याबाबत माहिती दिली आहे. तर मोनिका सिरसट या त्यांच्या दोन वर्षाच्या मुलीसह १४ फेब्रुवारी रोजी घरातून कोणास काहीएक न सांगता निघून गेल्या आहेत. त्यामुळे सचिन भगत सिरसट (वय ३५, रा.न्यु बुधवार पेठ, वीर फकीरा चौक, सोलापूर) यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात बेपत्ता झाल्याबाबत माहिती दिली आहे. या महिलां व मुलांबाबत कोणासही काहीही माहिती मिळाल्यास जोडभावी पेठ पोलिस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

Classifieds

**भाड्याने देणे**

**युनिक हॉस्पिटलजवळ सलग २ गाळे ऑफिस, कुरिअर, डॉक्टर, वकील, थेरपीसेंटर, एजन्सी, गोडाऊन वगैरेसाठी भाड्याने देणे. विष्णू पंपटवार-९८८१२४३६९०**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

**नळदुर्ग नगरपरिषद नळदुर्ग**
**नगर परिषद कार्यालय, नळदुर्ग**
ता. तुळजापूर, जि. धाराशिव पिनकोड - ४१३६०२
दुरध्वनी -०२४७१-२४६०१४/२४६०२५

जा.क्र./न.प.न/१७८६/२०२५-२६ दिनांक - ०७/०३/२०२५

**निविदा सुचना**

मोकाट जनावरे पकडणे, वराह पकडणे व कुत्रे निर्बीजीकरण करणे व नगर परिषद मालकीचे भंगार विक्री करणे या कामाची निविदा नळदुर्ग नगर परिषदेकडून मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित किंमत रु. ३५.१८ कोटी असून या कामासंबंधीच्या सविस्तर तपशील कार्यालयात दिनांक १०/०३/२०२५ ते १७/०३/२०२५ या उपलब्ध आहे.

**स्वाक्षरीत/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, नळदुर्ग**

अुत्तम सेवा — **मंगळवार दि. ११ मार्च २०२५** — **नोकरीच्या शोधात**

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **पुणे महानगरपालिका, पुणे** | | | |
| १ | परिचारीका (५४ पदे) | दहावी व नर्सिंग (ANM) कोर्स उत्तीर्ण | ६० पर्यंत | १९/०३/२५ |
| २ | स्टाफ नर्स (२५ पदे) | बारावी व नर्सिंग (GNM/B.Sc) कोर्स उत्तीर्ण | ६० पर्यंत | |
| २) | **भारतीय नौदल** | | | |
| | टोपास (०५ पदे) | दहावी व पोहण्याचे ज्ञान असावे | २५ पर्यंत | ०१/०४/२५ |
| ३) | **आसाम रायफल** | | | |
| १ | सफाई कर्मचारी (७० पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २३ पर्यंत | २२/०३/२५ |
| २ | फार्मासिस्ट (०८ पदे) | बारावी व पदवी/पदविका (फार्मसी) | २५ पर्यंत | |
| ३ | एक्स-रे असिटंट (१० पदे) | बारावी व (रेडिओलॉजी) डिप्लोमा | २३ पर्यंत | |
| ४ | रेडिओ मेकॅ. (१७ पदे) | दहावी व डिप्लोमा (रेडिओ/टेली/इलेक्ट्रॉ/इले/कॉम्प्यु/मेकॅ) उत्तीर्ण | २५ पर्यंत | |
| ५ | व्हेईकल मेकॅ (२० पदे) | दहावी व ITI/डिप्लोमा उत्तीर्ण | २३ पर्यंत | |
| ६ | इले. मेकॅ. व्हेईकल (१७ पदे) | दहावी व ITI (मोटार मेकॅ.) | २३ पर्यंत | |
| ७ | प्लंबर (१३ पदे) | दहावी व ITI (प्लंबर) उत्तीर्ण | २३ पर्यंत | |
| ४) | **केंद्रीय सशस्त्र पोलीस दल** | | | |
| | असिस्टंट कमांडंट (३५७ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | २५ पर्यंत | २५/०३/२५ |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्‌ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्‌ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ५) | **भारतीय विमानतथ प्राधिकरण, AAI** | | | |
| | कनिष्ठ सहाय्यक (१६८ पदे) | बारावी व वाहन परवाना आवश्यक | ३० पर्यंत | २४/०३/२५ |
| ६) | **डेडीकेटेड फ्रेट कोरीडोर कॉ. ऑफ इंडिया लि.** | | | |
| १ | बहुउद्देशीय कर्मचारी (४६४ पदे) | दहावी व ITI (६०%) गुणांसह | ३३ पर्यंत | २२/०३/२५ |
| २ | एक्झिक्युटिव (१७५ पदे) | डिप्लोमा ६०% (सिव्हील इले/इलेक्ट्रॉ/कॉम्प्यु/आय.टी/टेली/इन्स्ट्रू/वॉटर/ट्रान्स्पोर्ट) उत्तीर्ण | ३० पर्यंत | |
| ७) | **केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, CISF** | | | |
| १ | सफाईवाला (१५२ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २३ पर्यंत | ०३/०४/२५ |
| २ | ट्रेड्समन (१००९ पदे) | दहावी व ITI उत्तीर्ण असावे | २३ पर्यंत | |

**सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.**
**२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)**
**३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.**

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा — १) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१. — www.uttamseva.org

महावितरण — **ई-निविदा सुचना क्र. २२/२०२४-२५**

महावितरण तसेच शासन ई-नोंदणीकृत व अनुभवी स्थापत्य कंत्राटदाराकडुन कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग महावितरण, बारामती अंतर्गत सोलापूर सं व सु मंडल कार्यक्षेत्रातील विविध कामे करण्यासाठी खालील प्रमाणे ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| निविदा क्र. | कामाचे स्वरूप | निविदा रक्कम रूपये |
|---|---|---|
| टि-०७५/२०२४-२५ | महावितरण सं.व सु. उपविभाग सांगोला व हतिद ता.सांगोला जि.सोलापूर अंतर्गत दैनंदिन स्थापत्य दुरूस्तीची कामे करणेबाबत.(कालावधी ६ महिने) | रू.९.९९ लाख |
| टि-०७६/२०२४-२५ | महावितरण सं.व सु. उपविभाग मंगळवेढा ता. मंगळवेढा जि.सोलापूर अंतर्गत दैनंदिन स्थापत्य दुरूस्तीची कामे करणेबाबत.(कालावधी ६ महिने) | रू.९.९९ लाख |
| टि-०७७/२०२४-२५ | महावितरण सं.व सु. उपविभाग पंढरपूर शहर ता.पंढरपूर, पंढरपूर ग्रामीण १ व २ ता.पंढरपूर जि.सोलापूर अंतर्गत दैनंदिन स्थापत्य दुरूस्तीची कामे करणेबाबत.(कालावधी ६ महिने) | रू.९.९९ लाख |
| टि-०७८/२०२४-२५ | महावितरण सं.व सु. उपविभाग बार्शी शहर व बार्शी ग्रामिण ता.बार्शी, जि.सोलापूर अंतर्गत दैनंदिन स्थापत्य दुरूस्तीची कामे करणेबाबत.(कालावधी ६ महिने) | रू.९.३८ लाख |
| टि-०७९/२०२४-२५ | महावितरण सं.व सु. उपविभाग टेंभुर्णी, कुर्डूवाडी व माढा,ता.माढा, जि.सोलापूर अंतर्गत दैनंदिन स्थापत्य दुरूस्तीची कामे करणेबाबत.(कालावधी ६ महिने) | रू.९.३८ लाख |
| टि-०८०/२०२४-२५ | महावितरण सं.व सु. उपविभाग नातेपुते व माळशिरस ता.माळशिरस जि.सोलापूर अंतर्गत दैनंदिन स्थापत्य दुरूस्तीची कामे करणेबाबत.(कालावधी ६ महिने) | रू.९.३८ लाख |
| टि-०८१/२०२४-२५ | महावितरण सं.व सु. उपविभाग जेऊर व करमाळा ता.करमाळा, जि.सोलापूर येथील दैनंदिन स्थापत्य दुरूस्तीची कामे करणेबाबत.(कालावधी ६ महिने) | रू.९.३८ लाख |
| टि-०८२/२०२४-२५ | महावितरण सं.व सु. उपविभाग अकलूज व वेळापूर ता.माळशिरस जि.सोलापूर अंतर्गत दैनंदिन स्थापत्य दुरूस्तीची कामे करणेबाबत.(कालावधी ६ महिने) | रू.९.३८ लाख |
| टि-०८३/२०२४-२५ | महावितरण सं.व सु. उपविभाग अ व ब जि.सोलापूर अंतर्गत दैनंदिन स्थापत्य दुरूस्तीची कामे करणेबाबत. (कालावधी ६ महिने) | रू.९.९३ लाख |
| टि-०८४/२०२४-२५ | महावितरण सं.व सु. उपविभाग क, ड आणि इ जि.सोलापूर अंतर्गत दैनंदिन स्थापत्य दुरूस्तीची कामे करणेबाबत.(कालावधी ६ महिने) | रू.९.९३ लाख |
| टि-०८५/२०२४-२५ | महावितरण सं.व सु. उपविभाग मोहोळ ता.मोहोळ व अक्कलकोट ता.अक्कलकोट जि.सोलापूर अंतर्गत दैनंदिन स्थापत्य दुरूस्तीची कामे करणेबाबत. (कालावधी ६ महिने) | रू.९.९७ लाख |
| टि-०८६/२०२४-२५ | महावितरण सं.व सु. उपविभाग ग्रामिण १ व ग्रामिण २ जि.सोलापूर अंतर्गत दैनंदिन स्थापत्य दुरूस्तीची कामे करणेबाबत.(कालावधी ६ महिने) | रू.९.९७ लाख |

ई-निविदा विक्रीचा कालावधी दि. ११.०३.२०२५ ते दि. १७.०३.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत असून ई निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दि. १७.०३.२०२५ रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यंत आहे. ई-निविदा, बयाणा रक्कम ऑनलाईन भरून सर्व तपशिलासह व विहीत नमुन्यात सादर करावी. सविस्तर निविदा महावितरणच्या https://etender.mahadiscom.in/eatApp या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संपर्क : कार्यकारी अभियंता (स्था), बारामती. मो.७८७५७६८५५५. निविदेची मुदतवाढ झाल्यास वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाणार नाही. संबंधितानी वेबसाईटला भेट देऊन लक्ष दयावे.मागविलेल्या निविदा कोणत्याही स्तरावर कोणतेही कारण न देता रदद् करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरी दारानी राखुन ठेवलेले आहेत.

जनसंपर्क अधिकारी बारामती परिमंडळ बारामती २१५/२०२४-२५

**कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग, बारामती**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# अर्थसंकल्प विशेष

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## राज्याच्या अर्थसंकल्पाविषयी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रतिक्रिया

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी राज्याचा अर्थसंकल्प आज विधानसभेत सादर केला. या अर्थसंकल्पाचा विविध क्षेत्रांवर कसा व काय परिणाम होणार याबाबत शहर व जिल्ह्यातील तज्ञांसह मान्यवरांनी दै. 'तरूण भारत'कडे आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

### सर्वसमावेशक अर्थसंकल्प



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेबांच्या मार्गदर्शनात राष्ट्रनिर्मितीसह विकसीत महाराष्ट्राच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी आज विधानसभेत सादर केला. हा अर्थसंकल्प महाराष्ट्राच्या विकासाला बळकटी देणारा आहे. राज्यातील सर्व घटकांच्या अपेक्षांना न्याय देणाऱ्या या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून राज्याच्या विकासाला निश्चितपणे अधिक वेग मिळणार आहे. विकासाची ग्वाही देणारा हा सर्वसमावेशक महाअर्थसंकल्प सादर केल्याबद्दल महायुती सरकारचे आभार.

**- राम सातपुते**
**माजी आमदार, माळशिरस विधानसभा, राष्ट्रीय उपाध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा**

### रोजगार निर्मितीला चालना देणार अर्थसंकल्प



रोजगार निर्मितीला चालना देईल. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात राज्यात ५० लाख तरुणांना रोजगार उपलब्ध होतील. याशिवाय बदलत्या कामगारविषयक स्थितीचा विचार करता राज्य सरकार नवीन कामगार विषयक नियमावली बनवणार आहे ही चांगली बाब आहे. राज्यातील अपूर्ण सिंचन योजनांसाठी सरकार ५००० कोटी रूपये उपलब्ध करून देणार आहे. राज्यातील लाडक्या बहिणांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्याच्या दृष्टीने तरतूद केली आहे.

**- प्रा. डॉ. संतोष कदम,**
**संतोष भीमराव पाटील महाविद्यालय मंद्रूप**

### स्वयंरोजगार वाढवणारा अर्थसंकल्प



शेती पूरक क्षेत्र उद्योग व्यापार शिक्षण आरोग्य पर्यटन पायाभूत सुविधा सामाजिक विकास अशा अनेक क्षेत्रासाठी भरीव तरतूद असल्याला अर्थसंकल्प राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थ व नियोजन मंत्री अजितदादा पवार यांनी विधानसभेत मांडला अजित दादांनी सादर केलेला अर्थसंकल्प महाराष्ट्राचे स्वप्न प्रत्यक्षात आणणारा अर्थसंकल्प असल्याने यातून देशांतर्गत व विदेशी गुंतवणूक वाढणार असून रोजगार स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील

**- बाजीराव काटकर,**
**भाजपा जिल्हा उपाध्यक्ष**

### निराशा करणारा अर्थसंकल्प



शहरी भागासाठी बऱ्याच गोष्टीची तरतूद नाही. बळीराजाला कोणतीही ठोस नाही. लाडकी बहिणी योजनेसाठी २१०० रूपयांबाबत कोणतीही तरतूद नाही. किराणा मालाचे तसेच तेलाचे भाव मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. या विषयी अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद झालेली नाही. प्रत्येक घरावर विद्युत सोलर बसवण्याची घोषणा फक्त सर्वसामान्यांना फायदेशीर वाटणारी असून बाकी अर्थसंकल्प हा सर्वसामान्यांची निराशा करणारा आहे.

**- सोमनाथ चवरे, उद्योजक माढा**

### आर्थिक विकासाला चालना देणार



महाराष्ट्राच्या २०२५ च्या अर्थसंकल्पात शेतकरी, उद्योजक व महिलांचा विकास याकरिता महत्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. यामध्ये राज्यातील सुमारे १०००० महिलांना मायक्रोसॉफ्टकडून एआयचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. पुणे, नागपूर व मुंबई येथे मेट्रोचे जाळे वाढविण्यावर भर दिला आहे. शेतकरी बांधवांसाठी आधुनिक शेतीसाठी एआय तंत्रज्ञान वापराच्या धोरणासाठी ५०० कोटींची तरतूद केली आहे. त्याबरोबरच मुख्यमंत्री बळीराजा योजनेत ४५ लाख कृषी पंपांना मोफत वीज तसेच हक्काचे बाजारपेठेसाठी एक तालुका एक बाजारपेठ ही योजना देखील राबविण्यात येणार आहे. हे बदल आर्थिक विकासाला चालना देण्याचे काम करणारे आहेत.

**- निलेश रसाळ, सी.ए. (बार्शी)**

### कृषी उद्योगावर भर



विकसित भारत- विकसित महाराष्ट्र संकल्पना अंतर्गत मेक इन महाराष्ट्र व्दारे महाराष्ट्राचे नवीन औद्योगीक धोरण आखण्यात येणाार आहे. पुढील पाच वर्षाच्या कालावधीत ४० लाख कोटींची गुंतवणूक व ५० लाख रोजगार निर्मिती अपेक्षीत आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेती उत्पादनात मूल्यवर्धन, सिचंन सुविधा, वीजेची गरज भागविण्यासाठी सौर ऊर्जा इत्यादी पायाभूत सोयीसुविधा तसेच राज्यातील महामार्ग, बंदरे, विमानतळे, जलमार्ग, बस वाहतूक, रेल्वे आणि मेट्रो या सर्व दळणवळण क्षेत्रांसाठी पुरेशी अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आली आहे. यातून देशांतर्गत, विदेशी गुंतवणूक, रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील. शेतकरी कर्जात सवलत देण्याचा विचार केला गेला नसला तरी इतर उद्योगांसोबतच आपण कृषी क्षेत्रातही विकासाची अपेक्षा करू शकतो.

**- ज्योती राऊत (सीए)**

### विकासाकडे नेणारा अर्थसंकल्प



राज्याचा अर्थसंकल्प विकसित महाराष्ट्र डोळ्यासमोर ठेवून मांडला आहे. यामध्ये शेतकऱ्यांना दिवसा वीज मोफत देण्याचे धोरण त्यांना ऊर्जा देणारे आहे. वस्त्रोद्योगालाही चालना देण्यासाठी राज्यभरात जागतिक केंद्र उभारण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. याशिवाय महिलांच्या बचत गटाच्या साधनांना वाव मिळावा म्हणून जिल्ह्याच्या ठिकाणी उत्पादन केंद्र ही काढण्यात येणार आहे हा महिलांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय आहे. येत्या पाच वर्षांत महाराष्ट्रात वीजेचे दर कमी होतील अशी घोषणा केली आहे. याचा फायदा सर्वसामान्य नागरिकांना होणार आहे. एकंदरीत सर्व घटकांना या अर्थसंकल्पातून न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे आणि विशेष म्हणजे लोकाभिमुख आणि पारदर्शक कारभार कसा होईल याचे नियोजनही या अर्थसंकल्पातून केले आहे, अशी प्रतिक्रिया आमदार सुभाष देशमुख यांनी दिली.

**- आ. सुभाष देशमुख**

### महिला सक्षमीकरणावर भर



महाराष्ट्राला औद्योगिक, सामाजिक, सांस्कृतिक, कृषी आणि आर्थिक विकासाकडे नेणारा अर्थसंकल्प. महिला सक्षमीकरणावर भर, लाडकी बहीण योजना ३६ हजार कोटींची तरतूद यावरून ग्पष्ट होते की महिलांसाठी महत्वाची तरतुद आहे. अर्थसंकल्प हे तुटींचा असून तुट तीन टक्केपेक्षा कमी आणि महसुली तूट एक टक्केपेक्षा कमी आहे. कर्ज ३९ हजार कोटींचे असले तरी राज्याच्या उत्पन्नाच्या आवाक्यात आहे. राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या १८ टक्के बाहेरील कर्ज आहेत. कृषी, औद्योगिक, ग्रामीण व शहरी विकासाचा समन्वय साधणारा अर्थसंकल्प. राज्यातील पर्यटन विकासासाठी ३हजार कोटीची तरतुद. थोर महापुरूष छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर, कांतीज्योती सावित्रीबाई फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर तिर्थक्षेत्रांच्या विकासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध. एक टक्के करवाढीमुळे मुद्रांक शुल्क व वाहन महागणार. शेतीसाठी ४५ लाख कृषीपंप मोफत. शेतक-यांसाठी दिवसा वीज देण्यासाठी खास योजना. कोकणातील संगमेश्वर याठीकाणी विकासासाठी विशेष निधी उपलब्ध. कुंभमेळा नमामि गोदावरी योजना.

**- श्री. श्रीकांत मोरे**
**अर्थतज्ञ तथा चेअरमन मनोरमा बँक**


### घोषणांनी ठासून भरलेला अर्थसंकल्प



महाराष्ट्र थांबणार नाही, विकास लांबणार नाही असे महणून अर्थमंत्री अजित पवार यांनी आकर्षक घोषणांनी ठासून भरलेला संकल्प मांडला. दळणवळण, ऊर्जा, इनोवेशन, कार्बन क्रेडिट ला महत्व देणारा हा अर्थसंकल्प असून पूर्णपणे सत्यात उतरेल का नाही याची शंका निर्माण करणारा आहे. ग्रामीण व शहरी संकुल यासाठी २३ हजार कोटी, गडचिरोली येथे स्टील हब, नवी मुंबई येथे इनोवेशन सिटी, वाढवण बंदराजवळ ३ रे विमानतळ, अहमदाबाद-मुंबई बुलेट ट्रेन, सातारा येथे सौर ग्राम, औद्योगिक वीज दरात कपात, डीझेल बसेसचे सीएनजी-एलएनजी मध्ये रुपांतर, ३० लाखापेक्षा जास्त किमतीच्या वाहनांवर सहा टक्के कर, सीएनजी, एलपीजी वाहन करात एक टक्के वाढ, पूरक दस्ताच्या मुद्रांक शुल्कात शंभर रूपयांवरून पाचशे एवढी वाढ करण्यात आली.

**- सी ए अश्विनी दोशी, सोलापूर.**

### जनसामान्यांची, शेतकऱ्यांची दिशाभूल



लाडक्या बहिणीना २१०० रुपये, शेतकऱ्यांची कर्जमाफी नाही. महागाई कमीसाठी उपाययोजना नाहीत. मोटर रजिस्ट्रेशनची वाढ ी सामान्यांच्या खिशाला कात्री आहे. अरबी समुद्रातील शिवस्मारकाचा विसर पडला. तरुणांसाठी नोकरीच्या निव्वळ घोषणा पण वस्तुस्थितीचा विचार नाही. नेहमीप्रमाणे निव्वळ घोषणाच.

**- सुशील बंदपट्टे, काँग्रेस नेते**

### अतिशय चांगला अर्थसंकल्प



दुर्लक्षित घटकांना न्याय देण्याचे काम अर्थसंकल्पात आहे छत्रपती संभाजी महाराजाच्या बलिदानाच्या ठिकाणी त्यांच्या स्फूर्तीस्थानाच्या ठिकाणी बजेटमध्ये तरतूद केली ही चांगली गोष्ट आहे. विजेचे दर कमी होणार आहेत त्याचा फायदा शेतकरी वीज ग्राहकांना होणार आहे. अर्थसंकल्पामध्ये एकंदरीत सर्वांना गृहीत धरून सर्वांना उपयुक्त असे बजेट सादर केले आहे.

**- सुरेश पालवे, मांडवे ता. माळशिरस**
**माजी जिल्हा नियोजन समिती सदस्य**

### मध्यमवर्गाला दिलासा



महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात कोणतीही नवीन करवाढ केली नाही त्यामुळे मध्यम वर्गाला दिलासा मिळेल अशी अपेक्षा आहे. पायाभूत सुविधा आणि उद्योग क्षेत्रातील तरतूदीमुळे राज्याच्या विकासाला चालना मिळण्याची अपक्षा आहे. परंतु आरोग्य विभाग दुर्लक्षित राहू नये अशी सरकारने काळजी घ्यावी. घोषित केलेल्या सर्व योजनांची काटेकोर पणाने अंमलबजावणी व्हावी हिच अपक्षा.

**- डॉ. इशान भोसेकर, सांगोला**

संपादन - श्याम जोशी (उपसंपादक)

### माढा, पंढरपूर व सोलापूरसाठी निराशाजनक



पुरोगामी विचारसरणीची छाप पण माढा, पंढरपूर व सोलापूरसाठी काय? जिल्ह्यासाठी एकाही मोठ्या प्रकल्पाची घोषणा नाही. शेतकरी कर्जमाफी विषयीची फसवणूक, लाडक्या बहिणींची फसवणूक या बरोबरच सोलापूर विमानतळ, पंढरपूर विठ्ठल मंदिर समिती, सीना-माढा उपसा सिंचन प्रकल्प, ग्रामीण भागातील रस्ते, डीपी आणि वीजपुरवठा यासंदर्भात तकलादू धोरण, महापुरुषांच्या स्मारकांसाठी निधी नसणे, अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तसेच अहिल्यादेवी होळकर स्मारकासाठी कोणतीही तरतूद नाही. फक्त जुन्या रस्त्यांची डागडुजी, नवीन रस्त्यांना निधी नाही हे अत्यंत खेदजनक. राज्य सरकारने सादर केलेला ४८,हजार कोटींच्या तुटीचा अर्थसंकल्प.

**- आ. अभिजीत पाटील**

### चौफेर विकासाची पायाभरणी करणारा अर्थसंकल्प



महाराष्ट्राच्या चौफेर विकासाची पायाभरणी करणारा हा अर्थसंकल्प आहे. महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींना देण्यात येणाऱ्या पुढील हप्त्यांसाठी या अर्थसंकल्पात ३६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद महिला वर्गासाठी आश्वासक आहे. महाराष्ट्राच्या आगामी नवीन औद्योगिक धोरणामुळे महाराष्ट्रात ४० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक व त्याद्वारे ५० लाख रोजगार निर्मिती होणार आहे. महाराष्ट्रातील २४ लाख महिलांना लखपती दीदी करण्याचे उद्दिष्ट, महाराष्ट्र टेक्निकल टेक्स्टाईल मिशनची स्थापना, नवीन गृहनिर्माण धोरण, प्रधानमंत्री शहरी आवास योजनेत सुविधा, पंतप्रधान सूर्यघर वीज योजनेतून सौर ऊर्जा संच खरेदीसाठी अनुदान अशा वैशिष्ट्यांसह हा अर्थसंकल्प महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला मोठा हातभार लावणारा अर्थसंकल्प ठरला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पामुळे महाराष्ट्र आता थांबणार नाही, विकास आता लांबणार नाही हेच स्पष्ट होते.

**- देवेंद्र कोठे, आमदार, शहर मध्य**

### अर्थसंकल्प सर्वसामान्यांसाठी



२०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी राज्य सज्ज आहे. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकडून १० हजार महिलांना कौशल्य व कृत्रिम बुध्दिमत्ता विषयाचे प्रशिक्षण. नवीन पिढीला रोजगाराच्या संधी. मुंबईत २५० एकरावर इनोव्हेशन सिटी. शेतीपुरक क्षेत्रं, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, पायाभूत सुविधा, सामाजिक विकास अशा अनेक क्षेत्रांसाठी भरीव तरतूद असलेला, विकसित भारत-विकसित महाराष्ट्राचे स्वप्न प्रत्यक्षात आणणारा हा अर्थसंकल्प आहे. यातून देशांतर्गत, विदेशी गुंतवणूक, रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील.

**- किसन जाधव,**
**प्रदेश उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**

### व्यापाऱ्यांची पुन्हा निराशा



लाडक्या बहिणींना हप्ता वाढवून देण्यासाठी शासन कटीबध्द असल्याची खात्री वाटते. महापुरुषांच्या स्मारकांसाठीच्या निधीची तरतूद योग्यच आहे. शेतकऱ्यांना हमी भावासाठी ठोस उपाय करणे गरजेचे होते. व्यापाऱ्यांना जीएसटी किंवा करात सवलत अपेक्षीत होती मात्र ती या बजेटमध्ये नाही. येत्या काळात तरी व्यापाऱ्यांना करात सवलत द्यावी. कारण व्यापाऱ्यांना शासनाकडून कोणत्याच सवलती नाहीत.

**- उमेश टोमके, रेडिमेड कपड्यांचे व्यापारी, पंढरपूर**

### शाश्वत विकासाची गती साधणारा अर्थसंकल्प!

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी सादर केलेली अर्थसंकल्प महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचा मार्ग प्रशस्त करणारा आहे. या अर्थसंकल्पात राज्यातील शेतकरी, कष्टकरी, वंचित, शोषित, मध्यमवर्गीय आणि उद्योजक यांसारख्या विविध घटकांना समोर ठेऊन या घटकांच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत. तसेच नवमहाराष्ट्राच्या नवनिर्मितीसाठी महत्वपूर्ण नवनवीन तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा, रस्त्यांचे जाळे, विज्ञान आणि संशोधन या क्षेत्रावर भर दिल्याने मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात महायुती सरकारचा राज्याच्या सर्वांगीण विकासाप्रती असलेला दृष्टीकोन दिसून येतो.

**- माजी आमदार सुजितसिंह ठाकूर**

### शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीस मदत



देशाचे आणि राज्याचे हित बघून निर्णय घेतले. खास करून शेतकऱ्यांसाठी ए आय तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पात तरतूद केली कदाचित हा देशातला पहिला उपक्रम असावा यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीस मदत होईल.

**- माजी आमदार राजन पाटील (अनगरकर)**

### सर्वसमावेशक अर्थसंकल्प



अर्थसंकल्प हा सर्वसमावेशक आहे सकारत्मक दृष्टिकोनातून पहिलातर औद्योगिक क्षेत्राला चालना देणारा बंदरे विभाग, परिवहन, नगर विकास, ग्रामविकास, जलयुक्त शिवार, नदी जोड प्रकल्प अशा सर्व गोष्टींना भरघोस निधी देऊन खऱ्या अर्थाने हा अर्थसंकल्प महाराष्ट्राला समृद्ध करणारा आहे.

**- डॉ. सागर कांबळे, उच्चशिक्षित तरुण**

### उद्योगवाढीवर भर, विणकरांसाठी अर्बन हट केंद्र होणार



विकास, रोजगारनिर्मिती, गुंतवणूक, उद्योग वाढ यावर भर देणारा अर्थसंकल्प. शेतकऱ्यांना मोफत विज देणार, लाडकी बहिण योजना सुरु राहणार, सोलापुर शहरातील हातमाग विणकरांना प्रोत्साहन आणि सुविधा देण्यासाठी नागपुर येथे अर्बन हाट केंद्राची स्थापना होणार. येत्या पाच वर्षात वीज खरेदी खर्चामध्ये १ लाख १३ हजार कोटी रुपयांची बचत होणार त्यामुळे औद्योगिक वीज दर इतर राज्यांच्या तुलनेत कमी होतील. राज्य प्रगतीच्या शिखरावर जाईल, याची खात्री आहे.

**- आ. विजय सि. देशमुख**
**आमदार सोलापूर शहर उत्तर विधानसभा**


### निराशाजनक अर्थसंकल्प



शेतकरी, गरीब, मध्यमवर्गीयांसाठी व बेरोजगार यांच्यासाठी विशेष योजना नाहीत, केवळ आकड्यांचा खेळ असून सरकार जाहिरातींमध्ये अडकले आहे. सामान्य नागरिकाचा ठोस निर्णय नाही. शेतकऱ्यांसाठी कोणतीही तरतूद नाही. रोजगारनिर्मितीबाबत ठोस निर्णय नाही. सोलापूर विमानतळ, कृष्णा भीमा स्थिरीकरण, सोलापूरचे टेक्सटाईल पार्क याबाबत सोलापूरकरांचा भ्रमनिरास केला आहे. सर्वसामान्यांच्या तोंडाला पानें पुसण्याचा प्रकार आहे.

**- प्रा. काकासाहेब कुलकर्णी**
**महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे प्रदेश प्रवक्ते**

### उद्योग व शेती वाढविण्याकरीता प्रयत्न



केंद्र शासनाच्या योजनेस अनुसरुन मांडलेला राज्याच्या सर्वांगिण विकासासाठी व औद्योगिक व शेतीसाठी एआय टेक्नॉलॉजीचा वापर करुन राज्यातील उद्योग व शेती वाढविण्याकरीता प्रयत्न केलेला अर्थसंकल्प याचे आंम्ही स्वागत करतो.

**- राजू राठी, अध्यक्ष, सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर**

### शक्तीपीठ महामार्गामुळे दळणवळण व व्यापार वाढेल



मुबई, पुणे, नागपूर या मेट्रो शहरांना भरीव मदत परंतु प्रत्यक्षात सोलापूर जिल्हाला काहीच मदत नाही. सरकारने रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न केले पाहिजे. शेतकऱ्यासाठी व सौरऊर्जासाठी पण भरीव मदत देण्यात आली आहे. त्यामुळे यापुढील काळात एम.एस.सी.बीवर पडणारा लोड नक्की कमी होईल. त्याच पद्धतीने शक्तिपीठमार्ग मुळे सोलापूर पुन्हा नकाशावर येईल आणि दळणवळण व व्यापार वाढेल.

**- अश्विन डोईजोड, उद्योजक**

### नाविण्यपूर्ण अर्थसंकल्प



जवळपास दिड कोटी घरांना मोफत वीजपुरवठा, नवे गृहनिर्माण धोरण, तीर्थक्षेत्रे व गडकिल्ले जिल्हा व तालुक्यांना मुख्य रस्त्यांनी जोडणे हे स्वागतार्ह आहे. आग्रा ईथे शिवरायांचे स्मारक आणि पानिपत ईथे शौर्य स्मारक हे महाराष्ट्रातील नागरिकांसाठी अभिमानास्पद आहे. शेतीसाठी मोफत वीज पुरवठा, दिवसा वीज, एआय तंत्रज्ञानासाठी ५०० कोटी निधी, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेसाठी ३५१ कोटी निधी हे शेतकऱ्यांना फायदेशीर आहे. मुंबईत ८ आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्र उभारण्याची घोषणा हे विकासाचे पर्व दर्शविते.

**- प्रीतम सावळे,**
**उच्च पदस्थ कृषी अधिकारी खासगी, माढा.**

### समाजाच्या सर्व घटकांना न्याय देणारा



राज्यातील देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारचा अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवार यांनी आज सादर केला असून हा अर्थसंकल्प समाजाच्या सर्व घटकांना न्याय देणारा असा आहे असे मत भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष तथा प्रदेश कार्यकारिणी सदस्य शंकरराव वाघमारे यांनी व्यक्त केले. गरिबांना दिली जाणारी घरकुलच्या रकमेत ५० हजार रुपये ची वाढ करत त्यांना सोलर लाईट देणे यासह अनेक कल्याणकारी योजना राबवित राज्यातील सर्व विभागाचा समतोल राखत विशेषत महिला तरुण यांच्या सह सर्वांना न्याय देणारा अर्थ संकल्प आहे.

**- शंकरराव वाघमारे**
भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष तथा प्रदेश उपाध्यक्ष

### खोटा आणि भूलथापा देणारा अर्थसंकल्प



निवडणुकीवेळी दिलेली आश्वासने भूलथापा होते हे सिद्ध झाले, शेतकऱ्यांची कर्जमाफी नाही, युवकांच्या रोजगार वाढीसाठी काही नाही, महागाई कमी करण्यासाठी कुठलीही तरतूद नाही. लाडक्या बहिणींना २१०० न देता फसविले, सोलापूरसाठी अर्थसंकल्पात एक रुपयाचा उल्लेख नाही, काढा कर्ज, करा खर्च, भरा व्याज हे असेच चालू आहे महाराष्ट्राला कर्जात लोटण्याचे काम सुरू आहे.

**- चेतन नरोटे, काँग्रसचे शहराध्यक्ष**

### राज्याचा सर्वांगीण विकास होईल

आजचा अर्थसंकल्प जनतेच्या हिताचा घेतला असून शेतकरी, सर्वसामान्य जनता, विशेष करून आदिवासी समाजासाठी २१ हजार ४९५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे सर्वत्र आनंदाचे वातावरण असून हा अर्थसंकल्पमुळे राज्याचा सर्वांगीण विकास होईल.

**- अनिल चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### ब्रह्माकुमारी पाठशाळेत महिला दिन उत्साहात

**बार्शी, दि. १० मार्च-**

मी साधारण नारी नसून मीच शिव शक्ति आहे, मीच मीच दुर्गा आहे, मीच काली आहे, मीच सरस्वती आहे, मीच जगदंबा आहे, मीच लक्ष्मी आहे, अशी स्वत:च्या श्रेष्ठत्वाची स्मृती नारीने ठेवल्यास नारीमधील शक्ति जागृत होतील, असे उदगार ब्रहमाकुमारी संगीतादीदी यांनी काढले. त्या येथे जावळी प्लॉटमधील ब्रहमाकुमारी पाठशाळेत महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. या कार्यक्रमास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सिंधूताई देशमुख, आकाशवाणी धाराशिव निवेदिका शीतल कुलकर्णी, भाजपा पंचायत राज व ग्रामविकास विभाग बार्शी शहराध्यक्ष शिल्पा कांबळे, बचत गट सदस्य स्वाती खोस, आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त भाग्यश्री घोडके, लायन्स क्लब अध्यक्षा वर्षा गुंदेचा, संपादक डिजीटल मीडिया प्रतिज्ञा गायकवाड या मान्यवर महिला प्रमुख अतिथी रुपाने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलाद्वारे झाला. परी कुलकर्णी हिचे स्वागतनृत्य नयन मनोहर होते. रुपाली माळी यांनी एकपात्री अभिनयाद्वारे परिवर्तन ही नाटिका सादर केली. अनिता नष्टे यांनी महिला सम्मानार्थ घोषवाक्य सादर केली. मान्यवर अतिथी व पत्रकार धीरज शेळके, सचिन अपसिंगकर यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. बी. के. डॉ शुंभागी शिंदे यांनी अतिथींचा परिचय करुन दिला. जयश्री जंगम यांनी आभार प्रदर्शन केले. वनिता हलगणे यानी सूत्रसंचालन केले.

### शामबाई पुजारी यांचे निधन

**सोलापूर, दि. १० मार्च-**



शामबाई गुंडप्पा पुजारी (वय ७२) यांचे आज सोमवार दुपारी ४ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले असून त्यांना पाश्चात तीन मुले, दोन मुली व नातवंडे असा परिवार असून त्यांची अंत्ययात्रा दिनांक ११ मार्च रोजी सकाळी ११ वाजता घोंगडे वस्ती येथिल राहत्या घरापासून ते रूपाभवानी स्मशान भूमी येथे निघणार आहे. धनगर समाजाचे जेष्ठ नागरिक बापू कंटीकर यांचे सासू होत.

### जनाबाई नागणे यांचे निधन

**मंगळवेढा, दि. १० मार्च-**



जनाबाई नारायण नागणे यांचे दि.९ मार्च रोजी सायंकाळी ६.१५ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८१ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात सहा मुली, एक मुलगा, नातवंडे, परंतुडे असा मोठा परिवार आहे रात्री ९.०० वाजता मंगळवेढा येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. श्री संत दामाजी कारखान्याचे माजी संचालक रामकृष्ण नागणे यांच्या त्या वहिनी होत.

## जिवाची हौस करण्यासाठी मुंबईला निघालेल्या 'त्या' तिघींना मुस्कान-पोलीस पथकाने घेतले ताब्यात

### तीन तासात मुस्कान पथकाला शोध घेण्यात आले यश

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१० मार्च-**

मंगळवेढा शहरात एका शैक्षणिक संस्थेत एकाच वर्गात शिकणाऱ्या १२ वर्षे वयोगटातील अल्पवयीन तिघी मैत्रिणी घरात कुणाला काहीही न सांगता चक्क जिवाची हौस करण्यासाठी मुंबईला निघाल्या होत्या. पोलीसांच्या मुस्कान पथकाने वेगाने तपासाची चक्रे फिरवून अखेर पंढरपूर बसस्थानकावरुन त्या तिघींना ताब्यात घेवून मंगळवेढा पोलीस स्टेशनला हजर केले.

या घटनेची हकीकत अशी, मंगळवेढा शहरातील १२ वर्षे वयोगटातील तिघी मैत्रिणी बसस्थानकाच्या पाठीमागे असलेल्या एका शैक्षणिक संस्थेत इयत्ता सातवी वर्गात शिकत होत्या. गुरुवार दि. ६ रोजी दिवसभर शाळा करुन शाळा सुटल्यानंतर त्या घरी गेल्या. घरात कोणालाही काही न सांगता तिघीजणी मिळून अचानक घरातून गायब झाल्याने तिन्ही कुटूंबातील पालकांना एकच धक्का बसला. वर्गात असतानाच या तिघींनी मुंबईला जावून जिवाची हौस करण्याचा प्लॅन रचला होता. त्याप्रमाणे त्या सायंकाळी ७ वाजता मंगळवेढा बसस्थानक गाठून पंढरपूरकडे मार्गस्थ झाल्या.

सायंकाळी ७ वाजता पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे व पोलीस कर्मचारी आदल्यादिवशी गांजा पकडल्याने त्या कारवाईत व्यस्त असतानाच तिघी मुलींचे आई, वडील पोलीस ठाण्यात




दाखल झाले. त्यांनी आमच्या तिन्ही मुली अचानक गायब झाल्या असून त्यांचा तात्काळ शोध घ्या असा आक्रोश केला. ठाणे अंमलदारने ही घटना पोलीस निरीक्षक बोरीगिड्डे यांना कथन केली.

ही घटना ऐकताच पोलीस अधिकाऱ्यानाही घामच फुटला. पोलीस निरीक्षकांनी तात्काळ उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड यांना ही घटना सांगून शहर बीटच्या पोलीसांना बोलावून घेतले. स्टँड परिसर व प्रशालच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज चेक करण्याचे फर्मान काढले. यामध्ये तपासाला दिशा मिळाल्याने पोलीस निरिक्षक बोरीगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक बनकर, विजय पिसे, पोलीस हवालदार वंदना अहिरे, पोलीस हवालदार सुनिता चवरे, श्रीमंत पवार, पोलीस नाईक कृष्णा जाधव आदींचे मुस्कान पोलीस पथक पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाले. रात्री साडेनऊ वाजता हे पथक पंढरपूर बसस्थानकावर पोहोचल्यानंतर त्या तिघी मुली मुंबईला जाण्यासाठी बसची वाट पाहत बसस्थानकावर बसल्याचे निदर्शनास येताच मुस्कान पथकाचा जीव भांड्यात पडला. यावेळी पोलीसांनी त्या तिघीकडे अधिक चौकशी केली असता आम्ही मुंबईला फिरावयास निघालो आहोत असे सांगितले. आपल्याकडे फिरण्यासाठी किती पैसे आहेत? असे विचारले असता केवळ ६० रुपये असल्याचे त्या तिघींनी सांगताच मुस्कान पथकही कोड्यात पडले. एवढ्या पैशात तुम्ही मुंबईला जाणार का? व जिवाची हौस करणार का? असा प्रश्न करताच त्यांची बोलती बंद झाली. तत्काळ या मुस्कान पथकाने त्यांना ताब्यात घेवून पोलीस स्टेशनला हजर केले. दरम्यान आई, वडिलांना बोलावून त्या तिघी मुलींचे पोलीस अधिकाऱ्यांनी समुपदेशन करुन त्यांच्या ताब्यात दिले.



## धुळ्याचे हेमंत चौधरींकडून अन्नछत्र मंडळास चपाती मेकर मशीन भेट

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० मार्च -**

धुळे येथील स्वामीभक्त हेमंत चौधरी यांच्याकडून ताशी एक हजार चपाती तयार करणारी मशीन श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळास भेट दिली आहे. त्याबद्दल मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोल भोसले यांच्या नेतृत्वाखाली प्रभावीपणे सुरु असलेल्या कार्यावर प्रेरित होऊन ही मशीन भेट दिली आहे. दरम्यान मशीनचे पूजन न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोल भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. न्यासाच्या वतीने श्री. चौधरी यांचा श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ॲड. संतोष खोबरे, मनोज निकम, मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, सौरभ मोरे, नामा भोसले, अतिश पवार, गोटू माने, निखील पाटील, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, बाळासाहेब घाडगे, बाळासाहेब पोळ, प्रवीण घाडगे, संभाजीराव पवार, सागर पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, गोविंदराव शिंदे, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, धनंजय निंबाळकर, मुन्ना कोल्हे, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस.के. स्वामी, शिव स्वामी, प्रकाश लोंढे, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, विशाल घाडगे, रोहित कदम, संभाजीराव पवार, रमेश अरबाळे, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण पस्थित होते.

## व्यवसायिकांचा पदचारी मार्गावर कब्जा

### नगरपालिकेची बघ्याची भूमिका, नागरिकांतून संताप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० मार्च -**

सोलापूर मार्गावरील तारामाता उद्यानाजवळ तसेच विजय कामगार चौक भागातील फुटपाथवर व्यापाऱ्यांनी चक्क व्यवसाय थाटल्याने पादचारी मार्ग गायब झाल्याचे चित्र आहे. नगरपालिकेचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकातून संताप व्यक्त होत आहे.

> **वृद्ध महिला पुरुष स्वामी भक्त लहान मुले पदचारी यात्री याना चालत जाण्यासाठी पदचारी मार्ग आहे मात्र व्यापारी चक्क दुकाने थाटली आहेत नपाचे मात्र अर्थपुर्ण दुर्लक्ष आहे.**

दिवसोदिवस अक्कलकोट तीर्थक्षेत्री मोठया प्रमाणात भाविक भक्त येत आहेत. वाहनांची संख्या वाढली आहे. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होत आहे. वाहतुकीस अडथळे असणारी अतिक्रमणे तात्काळ दुर करणे आवश्यक आहे . नगरपालिकेने नागरिकाना येण्या जाण्यासाठी सोलापुर रस्ता ते . तारामाता उद्यान पर्यंत व विजय कामगार चौक ते कांदा बाजार रस्ता पर्यंत पादचारी मार्ग नागरिकाना जाण्या येण्यासाठी निर्माण केला आहे मात्र हया पादचारी मार्गावर चक्क व्यवसायकांनी विविध प्रकारचे व्यवसाय थाटले आहेत . विजय कामगार चौक ते कांदा बाजार रस्ता दोन्ही बाजुने पादचारी मार्गावर व्यवसायिकांनी व्यापार थाटून रहदारीस अडथळा निर्माण केला आहे पादचारी मार्गच व्यवसायिकांनी गिळंकृत केल्याचे दिसुन येते. मात्र या बाबीकडे अक्षम्य दुर्लक्ष व पक्षपाती धोरण राबविल्याचा आरोप नागरिकातून व्यक्त होत आहे . पादचारी मार्गावरील सर्व अडथळे त्वरीत काढवित . नागरिकाना वृद्धांना बालकानां रहदारीसाठी पादचारी मार्ग त्वरीत खुला करावा अशी मागणी नागरिकातुन स्वामी भक्ता मधुन व्यक्त केली जात आहे.

## धर्मोपदेशकास लोखंडी गजाने मारहाण; सहा आरोपींना पोलीस कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१० मार्च-**



या मठाचा मीच पुजारी व मालक असून तु बाहेरहून आलेला आहे. तुझा येथे काहीही संबंध नाही असे म्हणत धर्मोपदेशक राचोटीश्वर शिवाचार्य स्वामीजी (वय ६४) यांना लोखंडी गजाने शरीरावर विविध ठिकाणी मारुन गंभीर जखमी केल्याप्रकरणी राजू कोरे, मंजुनाथ कोरे, भिमू कोरे, प्रमोद कोरे, संतोष कोरे, सिध्दू कोरे या सहा जणांस पोलीसांनी अटक करुन मंगळवेढा न्यायाधिश व्ही.के.पाटील यांच्यासमोर उभे केले असता या सर्व आरोपींना सहा दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

या घटनेची हककीत अशी, यातील फिर्यादी राचोटीश्वर स्वामीजी हे सिध्दनकेरी येथील तोफकट्टी संस्थान मठात गेल्या ३६ वर्षापासून राहण्यास आहेत. या संस्थानमध्ये ते धर्मोपदेशनाचे काम करतात. दि. ३ मार्च रोजी रात्री ९ वाजता फिर्यादीस वरील आरोपींनी सी.सी.टी.व्हीची तोडफोड करत मठाचा मीच पुजारी व मालक आहे. तु बाहेरहून आला असून तुझा येथे काहीही संबंध नाही. तु बाहेर ये असे म्हणत खोलीतून बाहेर ओढत आणून फिर्यादीस वरील आरोपींनी लोखंडी गजाने पाठीवर, उजव्या खांद्यावर, दोन्ही मांड्यावर, नडगिरीवर मारुन गंभीर जखमी केले होते. याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक व्ही.व्ही.लातुरकर यांनी केला. या आरोपींना ५ मार्च रोजी अटक करुन त्यांना न्यायालयात उभे केले.

यावेळी सुरुवातीला दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. त्यानंतर तीन दिवसाची पोलीस कोठडीत वाढ केली. दि.१० रोजी पुन्हा न्यायालयात उभे केल्यावर एक दिवसाच्या पोलीस कोठडीत वाढ करण्यात आली. असे एकूण सहा दिवसाची सहा आरोपींना पोलीस कोठडी सुनावली. दरम्यान सरकार पक्षाच्यावतीने ॲड.क्षिरसागर यांनी युक्तीवाद केला. यामध्ये सी.सी. टी.व्ही.फुटेज जप्त करणे, गुन्ह्याचा सखोल तपास करणे आदी कामासाठी पोलीस कोठडीची मागणी केल्यानंतर न्यायालयाने ती मान्य करुन पोलीस कोठडी सुनावली. फिर्यादीच्यावतीने ॲड.शिवानंद पाटील यांनी तर आरोपीच्यावतीने ॲड.एम.बी.गायकवाड यांनी काम पाहिले.

## क्रीडा

# सोलापुरच्या महिलांचा धुळे संघावर दणदणीत विजय

### भक्ती पवारचे दमदार नाबाद शतकासह २ बळी, साक्षी लामकानेचे ४ बळी प्रतीक्षा नंदर्गीचेही नाबाद अर्धशतक

### महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन वरिष्ठ महिला गट निमंत्रित क्रिकेट स्पर्धा



साक्षी लामकाने



प्रतिक्षा नांदर्गी



भक्ती पवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

सांगली येथील चिंतामणराव कॉलेजच्या मैदानावर झालेल्या शेवटच्या साखळी सामन्यात सोलापूरच्या महिला संघाने धुळे जिल्हा संघावर २०२ धावांनी मात करत दणदणीत विजय प्राप्त केला.

या विजयात अष्टपैलू खेळाचे प्रदर्शन करताना भक्ती पवार हिने नाबाद शतक झळकावीत व गोलंदाजी मध्ये देखील २ बळी घेतले. धुळे संघाचे ७ खेळाडू शून्य धावावर बाद झाले.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर सोलापूरच्या महिला संघाचे पहिले २ खेळाडू केवळ ४१ धावांवर (१० षटकात) माघारी परतले होते. यात कर्णधार साक्षी वाघमोडे (८) स्नेहा शिंदे (२०) यांच्यासोबत सलामीवीर भक्ती फवारणी संयमी फलंदाजी करत तिसऱ्या विकेटसाठी गौरी पाटील (३५) सोबत १०२ धावांची भागीदारी तर चौथ्या विकेटसाठी प्रतीक्षा नादरगी (नाबाद ५६) सोबत नाबाद ११२ धावांची भागीदारी करताना नाबाद १२५ धावा (१५५ चेंडू, ९ चौकार) झळकाविल्या.

निर्धारित ५० षटकात ३ बाद २५५ धावा करत सोलापूरने धुळे संघासमोर २५६ धावांचे आव्हान ठेवले. धुळे संघाकडून गौरी अहिरे (३६/२ बळी) व नेहा चव्हाण हिने १ बळी घेतला.

परंतु धुळे संघाची सुरुवात अत्यंत निराशा जनक ठरली, पहिल्याच षटकात २ व तिसऱ्या षटकात १ असे केवळ ८ धावांवरती ३ गडी बाद करत सोलापूरच्या महिलांनी सामन्यावर पकड मिळविली. त्यानंतर आलेल्या प्रेरणा काळे (१३) व कर्णधार निकिता मोरे (२०) या खेळाडूंनी थोडाफार प्रतिकार करायचा प्रयत्न केला. पण साक्षी लामकाने व भक्ती पवार यांनी त्यांना बाद करत सामना सोलापूरच्या बाजूने झुकविला व त्यानंतर आलेले सलग ४ खेळाडू शून्यावरती बाद करत साक्षी लामकाने (२१/४ बळी), भक्ती पवार (५/२ बळी), प्रतीक्षा नादरगी (१२/२ बळी), आयुष्या भोसले १ बळी यांनी जबरदस्त गोलंदाजीचे प्रदर्शन करत २१.५ षटकात धुळे संघाला केवळ ५३ धावांवर गुंडाळले.

वरिष्ठ महिलांच्या एफ गटात परभणी व धुळे विरुद्ध असे २ विजय मिळवत सोलापूरचा संघ तिसऱ्या स्थानी राहिला.

सोलापूर महिला संघाचे सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे चेअरमन रणजितसिंह मोहिते पाटील, सेक्रेटरी धैर्यशिल पाटील, चंद्रकांत रेंबर्सू व संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या या संघास निवड समिती चेअरमन किरण मणियार, स्नेहल जाधव, सारिका कुरनुरकर ,मानसी जाधव, यांचे मार्गदर्शन लाभले.



## जिल्हा महिला खो खो संघाचे सराव शिबीर सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

शेवगाव (अहिल्यानगर) येथे १३ ते १६ मार्च दरम्यान होणाऱ्या राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेसाठी जिल्हा खो खो संघाचे सराव शिबिर जुळे सोलापूर येथील वसुंधरा कला महाविद्यालय येथे सुरु झाले.

किरण स्पोर्ट्स क्लबच्या वतीने सुरू असलेल्या या सराव शिबिराचे उद्घाटन निवृत्त तालुका क्रीडा अधिकारी व आंतरराष्ट्रीय खो खो खेळाडू सत्येन जाधव यांचे हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी सोलापूर खो खो असोसिएशनचे खजिनदार श्रीरंग बनसोडे, स्वामी विवेकानंद प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयचे प्राचार्य अंबादास पांढरे आदी उपस्थित होते. या शिबिरास किरण स्पोर्ट्स क्लबचे सचिव मोहन रजपूत हे मार्गदर्शन करीत आहेत



## आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक भिवंडकर ६ खेळाडूंना प्रशिक्षण देणार

**सोलापूर, दि. १० मार्च-**

आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक जंगदीप भिवंडकर यांनी सोलापुर जिल्हयातील ६ खेळाडूंनी निवडून मार्च २०२६ पर्यंत दर शनिवारी व रविवारी येथे येऊन तंत्रशुद्ध प्रशिक्षण देणार आहेत. राजवर्धन तिवारी, वेदांत खलडे (बार्शी), शिवानी सानप, वेदांकिता पाटील, विनोद मगजी व श्रीकांत असावा (सोलापूर) हे निवड झालेले सहा खेळाडू आहेत.

सोलापुरात त्यांचे दोन दिवसाचे प्रशिक्षण शिबिर झाले. त्यातून त्यांनी या सहा खेळाडूंची निवड केली. त्यांनी खेळाडूंना काही टिप्स दिल्या व फिटनेसचे महत्व विषद केले. गेम खेळताना चुका कसे होतात ते खेळाडूंच्या लक्ष्यात आणून दिल्या. सराव कसा व कोणत्या पद्धतीने करावा व समोरच्या खेळाडूंची मानसिकता व त्याच्या स्ट्रोकची क्षमता आणि स्पिनकडे लक्ष्यपूर्वक बघून तो ब्लॉक कसे करावे व जेव्हा १० ऑल स्कोर होतो त्या वेळीची खेळाडूंची काय मानसिकता होती आणि तो कसे काळजी पूर्वक खेळतो तसेच सुरवाती पासूनच खेळाले पाहिजे ते टिप्स सर्व खेळाडूंना दिल्या.

तत्पूर्वी संघटनेचे अध्यक्ष डॉ राजीव प्रधान यांनी श्री भिवंडकर यांचा सत्कार केला. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी डॉ. भास्कर पाटील, बार्शीचे प्रशिक्षक गणेश स्वामी, झेड. एम. पुणेकर, ऑबरी अलमेडा यांनी परिश्रम घेतले.

## सोलापूर कुस्ती स्पर्धा १५व१६ मार्चला अकलूजला

**अकलूज, दि. १० मार्च-**

सोलापूर जिल्हा निवड चाचणी कुस्ती स्पर्धा १५ व १६ मार्चला अकलूज येथील धवल श्रीराम मंदिर धनश्री नगर येथे होईल. कर्जत येथे २६ ते ३० मार्च या कालावधीत होणाऱ्या ६६ वी वरिष्ठ राज्य अजिंक्यपद महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी जिल्हा संघ यातून निवडण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. धवलसिह प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र जनसेवा संघटनेच्या वतीने याचे आयोजन केले आहे. सर्व गटातील वजने १५ मार्च रोजी स्पर्धा स्थळी सकाळी ८ ते ११ या वेळेत घेतल्या जातील. वजन गट वरिष्ठ गादी-माती ५७, ६१, ६५, ७०, ७४, ७९, ८६, ९२,९७ व ८६ ते १२५ किलो महाराष्ट्र केसरी या गटात होईल. जन्मतारीख २००५ व २००६ असेल तर मेडीकल व पालकांचे संमत्तीपत्र आणावे. स्पर्धेत पैलवानांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा तालीम संघाचे उपाध्यक्ष पै.सर्जेराव चवरे यांनी केले आहे.

# उजनीच्या पाण्याचा अतिवापर; शेतकऱ्यांची चिंता

- वाढलेल्या अती गाळामुळे पाणीसाठा कमीच
- आजतागायत अवघे ४५ टक्केच शिल्लक पाणी
- जिल्हा प्रशासनाने जून-जुलैपर्यंतचे नियोजन करण्याची गरज



**तभा वृत्तसेवा | अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

उजनी धरणातील पाण्याचा अतीवापर होत असल्याने येणाऱ्या कडाक्याच्या उन्हाळ्यात पाणी सर्वांना पुरेल का? याची चिंता आताच जाणकार जलतज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे. पाण्याचा वापर सर्वांनी काटकसरीने करावा, अशा सुचनाच सर्वजण करतात मात्र त्या सुचनांचा अंमल कोणीही करताना सध्यातरी दिसून येत नाही. त्यातच मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन आहे, गाळ साठल्याने पाणी कमी आहे. या सर्व गोष्टींचा अंदाज बांधून आतापासूनच जिल्हा प्रशासनाने या पाण्याचे योग्य नियोजन केले तरच सर्वांना आगामी पावसाळ्यापर्यंत पाणी पुरेल, अशी अपेक्षा शहर-जिल्ह्यातील जाणकार नागरिकांनी दै. तरूण भारतशी संवाद साधताना दिली.

उजनी धरणातून दुसऱ्या आवर्तनाचे ६ मार्चपासून शेतीसाठी पाणी सोडण्यात आले असून, २५ मेपर्यंत कालव्याचे पाणी सुरू राहणार आहे. साधारणतः १६ टीएमसी पाणी (सलग दोन आवर्तने) त्यासाठी लागणार आहे. याचा फायदा जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांना होत आहे. सध्या उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून, शेतीपिकांना पाण्याची गरज आहे. जिल्ह्यातील दीड लाख हेक्टरला उजनी धरणाचे पाणी थेट मिळते. दरम्यान, मागील तीन वर्षांत यंदा पहिल्यांदाच शेतीसाठी तीन आवर्तने, त्यातही ऐन उन्हाळ्यात सलग दोन आवर्तने सोडण्याचा महत्त्वाचा निर्णय कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, कालव्यातून सुरवातीला ७०० क्युसेकने सोडलेले पाणी सध्या २१०० क्युसेकने सोडण्यात आले आहे. दरम्यान, सोलापूर शहर आणि इतर काही पाणीपुरवठा योजनांसाठी जवळपास १८ टीएमसी पाणी सोडले जाते. त्यातच जवळपास १५ टीएमसी पाण्याचे उन्हाळ्यापर्यंत बाष्पीभवन होते. या धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साठल्याने नेमका पाण्याचा अंदाज येत नसल्याचे जाणकार नागरिकांतून सांगण्यात येते. पाण्याचा वापर वारेमाप होवू लागला तर ऐन पावसाळ्याच्या तोंडावर शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही आणि उन्हाळी हंगामात घेतलेल्या पिकांचीही वाट लागते. सोलापूर शहरातही अनेक नळांना पाणी मोकळे जाते; त्याकडेही मनपा प्रशासनाने वाया जाणाऱ्या पाण्याकडेही लक्ष घालण्याची गरज आहे.

### उजनी धरणातील पाणीसाठा

एकूण पाणी- ८८.२३ टीएमसी, उपयुक्त पाणीसाठा-२४.५७ टीएमसी, पाण्याची टक्केवारी- ४५.८७ टक्के, कालव्यातून सोडलेले पाणी- २१०० क्युसेक इतके आहे. २०२३-२४ साली सोलापूरसह पुणे जिल्ह्यात कमी पाऊस झाल्याने अवघा ६६.६६ टक्के पाणीसाठा झाला होता. यामुळे पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने झाला होता. यावर्षी सरासरीच्या दीडपट पाऊस झाल्याने यंदा १०० टक्केच्या पुढे पाणीसाठा झाला होता. मात्र यंदा पाण्याची कोणत्याही आवर्तनात काटकसर झाल्याचे दिसून येत नाही. या धरणातील पाण्याचा वापर आपल्या जिल्ह्यातच नाहीतर पुणे, अहमदनगर, धाराशिव जिल्ह्यातही होत असल्याने पाण्याचा वापर सर्वांनीच काटकसरीने करावा तरच पावसाळ्यापर्यंत पाणी पुरेल, असा सल्लाही काही जाणकार शेतकरी बांधवांकडून देण्यात येत आहे.

### जलवाहिनी योजना कार्यान्वित होत नसल्यानेही पाण्याचा अपव्यय

सोलापूर जिल्ह्याला पाणीपुरवठा करण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या बंद समांतर जलवाहिनी योजनेचे काम रखडल्याचा परिणाम उजनी धरणातील पाणीसाठ्यावर होण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर पाणी नियोजनाचे कसे होणार? ही चिंता सर्वांनाच लागली आहे. इतकेच नाहीतर ही जलवाहिनी लवकर चालू झाल्यास मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय टळेल, अशीही माहिती चर्चिली जात आहे.

> उजनीतून बेसुमार पाणीउपसा झालेला नाही. ऑक्टोबरपासून शहरासाठी पिण्याच्या पाण्याची दोन आवर्तने सोडली जात आहेत. त्यातून १० ते १२ टीएमसी पाणी सोलापूरला देण्यात आले आहे. प्रतिवर्षी नागरिकांना पिण्याचे पाणी सोडावेच लागते. दुष्काळी स्थिती असेल तर २२ ते २४ टीएमसी इतकेही पाणी नदीत सोडावे लागते. धरणातील चलसाठ्यातील पाणी कमी झाले आहे. जलवाहिनीच्या कामाचे नियोजन वेळेत पूर्ण झाल्यास पुन्हा पाणी कमी सोडावे लागेल.
>
> **- आर. पी. मोरे, कार्यकारी अभियंता, उजनी धरण व्यवस्थापन विभाग**

### गाळ काढण्याच्या २ वेळा निघाल्या निविदा!

३ ऑगस्ट २०१८ रोजी उजनीतील गाळ काढण्याचा शासन निर्णय झाला होता. यासाठी २ वेळा जाहीर निविदाही काढण्यात आल्या. मात्र काही तांत्रिक कारणाने या निविदा रद्द कराव्या लागल्या होत्या. यानंतर प्रारूप निविदा शासन दरबारी संबंधित विभागाकडून सादर केली आहे मात्र शासनाच्या संबंधित विभागाकडून यासाठी कसलीच हालचाल दिसून येत नाही. यासाठी जिल्ह्यातील राजकीय नेत्यांनी आता आवाज उठविण्याची गरज आहे. त्यांनी या निविदांचा पाठपुरावा केलातर अजून १४ टीएमसी पाणीसाठा वाढणार आहे.

## संक्षिप्त वृत्त



### कुंभारवेस येथे महिलांच्या हस्ते पाणपोईचे उद्घाटन

**सोलापूर, दि.९ मार्च-**

आस्था फाऊंडेशन संचलित आस्था रोटी बँकेतर्फे जागतिक महिलादिनानिमित्ताने कुंभारवेस येथे पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. येथे व्यापारी, हमाल तसेच ग्रामीण भागातून येणारे लोक तसेच मंगळवार बाजारला जाणारे लोक येतात. या गजबजलेल्या परिसरात नेहमीच खरेदी विक्रीचे व्यवहार होतात, अशा भुसार गल्लीत थोडक्यात कुंभारवेस येथे यंदाच्या उन्हाळ्यात कुणीही पाण्यावाचून अलिप्त राहू नये. यासाठी इथे पाणपोईची सोय केलेली आहे. जिथे रोजच्या रोज स्वच्छ व फिल्टर जारचे थंड पाणी सर्वांनाच सुखावेल व तहानलेल्याची तृषा कमी करेल. यासाठी एका ज्येष्ठांनी आपल्या पतीच्या स्मरणार्थ येणाऱ्या काही काळापुरते पाणपोई पाण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा बोझा उचलून निनावी केलेल्या हया दानाचे आस्थाच्या वतीने रितसर जनसामान्यांच्या सेवेत अर्पण केले. यावेळी प्रमुख पाहुणे रविकांत तंबाके, राजू हौशेट्टी, संजय पाटील, बाळू भुमकर, तसेच कुंभार वेस येथील व्यापारी दयानंद आडके, आनंद तगी, अरुण आडके, आयुब पठाण, अरुण पठाण, जमादार, आकाश भुमकर, संजय गुळगी यांची उपस्थिती होती. अप्रत्यक्षपणे देणगीदारांच्या देणगीतून आस्थाचे अध्यक्ष विजय छंचुरे, पुष्कर पुकाळे, छाया गंगणे, कांचन हिरेमठ, निलिमा हिरेमठ, मंगल पांढरे, स्नेहा मेहता, नीता अकुडे, संगीता छंचुरे, लक्ष्मी कुलकर्णी, सुवर्णा पाटील, सर्व आस्था रोटी बँक टीमने उपक्रम राबवला.



### आरोग्य कृती समितिकडून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा सत्कार

**सोलापूर, दि. १० मार्च,**

जिल्हा परिषद आरोग्य विभागातील ६३ कर्मचाऱ्यांना नियमित पदोन्नती दिल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचा आरोग्य विभाग कृति समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. पदोन्नती देण्यात आलेल्यामध्ये ३ आरोग्य पर्यवेक्षक, ४१आरोग्य सहायिका, २२ आरोग्यसेवक यांचा समावेश आहे. पदोन्नती दिल्याबददल आरोग्य विभाग कृती समितीच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आरोग्य विभाग कृति समितीचे राज्याध्यक्ष संजय उपरे, राज्य सरचिटणीस चंद्रकांत पवार, राज्य कार्याध्यक्ष समीर शेख, कोषाध्यक्ष विष्णू सानेपागुल, काशिनाथ बिराजदार, पांडुरंग कोळी, संजय पाटील शिवाजी येडगे, सुरेखा जवळकर, रोहीणी सुगंधी, उमेश पाटील, तुळसा चौगुले, इप्तेकार चाऊस, प्रिया भिसे, विजया राऊत, परविन मुलाणी, संतोष बटे , द्रौपदी राठोड, अल्ताफ विजापूरे, राजू राठोड, अंबादास मिठापल्ली, लक्ष्मीकांत माने आदी उपस्थित होते.




### प्रेरणा फाऊंडेशनच्यावतीने आदर्श महिलांचा सत्कार

**सोलापूर, दि. १० मार्च -**

महिला दिनानिमित्त प्रेरणा सोशल फाउंडेशन संचलित मॉन्टेसरी टीचर ट्रेनिंग यांच्या वतीने आदर्श महिलांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आरटीओ इन्स्पेक्टर प्रतीक्षा नारायणकर, माजी नगरसेविका सुनीताताई रोटे, ॲड. अर्चना कुमठेकर उपस्थित होते. याप्रसंगी फाऊंडशेनच्यावतीने आदर्श महिला म्हणून डॉक्टर, ॲडव्होकेट, पोलीस, लघुउद्योजिका, समाजसेविका, ग्रामपंचायत अधिकारी, माजी सैनिक पत्नी अशा अनेक क्षेत्रातील महिलांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात महिला सक्षमीकरण, लघुउद्योग, महिला हक्क व अधिकार यावर उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्षा कविता कोडवान व सचिव धर्मा कोडवान यांनी केले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालक अनिता धुते यांनी केले. यावेळी शोभा धुळेराव, सुरेखा काळे, आशा सातपुते, सुनिता दळवी, मनोज देवोकर,शिवाजी कोडवान, राजू काळे, निखिल दळवी उपस्थित होते.

### बार्शीत आज मोफत नेत्रतपासणी व बीपी, शुगर तपासणी शिबीर

**सोलापूर, दि. १० मार्च -**

जागतिक महिला दिनानिमित राजाभाऊ राऊत मित्रमंडळ, माळे गल्ली, सावळे गल्ली, ब्राम्हण गल्ली व डॉ. शेटे नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्रतपासणी व बीपी, शुगर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ड. महेश जगताप यांनी दिली. मंगळवार दि. ११ मार्च रोजी दु. ४ ते ७ यावेळेत हनुमान मंदीर, माळे गल्ली येथे हे शिबीर होणार असून अंकिता राऊत, मृणाल राऊत यांच्या हस्ते शिबिराचे उदघाटन होणार आहे. नेत्ररोग तज्ञ डॉ. गजानन शेटे, डॉ. राजश्री शेटे, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. दीपक जगताप, डॉ. संपदा केसकर, डॉ. सुबोध केसकर हे या शिबिरात रुग्णांची तपासणी करणार आहेत.




## योग्य आहार हेच उत्तम औषध : डॉ.सोनाली घोंगडे

- ए. जी. पाटील अभियांत्रिकीत महिला दिनानिमित्त मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

पंचतत्व आणि बनलेल्या आपल्या शरीरास घरातील असलेले पदार्थ वापरून आजारी पडूच नये याची काळजी कशी घ्यावी. सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत आपली दिनचर्या कशी असावी व कोणत्या प्रकारचा आहार आपण घ्यावा व स्वस्थ शरीर स्वस्थ मन हे कसे राखावे, असे मार्गदर्शन डॉ. सोनाली घोंगडे यांनी विद्यार्थ्यांना केले.

ए.जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात संगिनी अंतर्गत महिलादिनाच्या निमित्ताने मुलींसाठी आहार हेच औषध या विषयावर डॉ. घोंगडे बोलत होत्या. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार, सिव्हिल इंजिनिअरिंगचे विभाग प्रमुख प्रा. टी. डी. मसलेकर व संगिनी समन्वयक प्रा. के. आर. मामडयाल हे उपस्थित होते. आरोग्याचे रक्षण ही काळाची गरज आहे आणि प्रत्येक विद्यार्थिनींनी ही सबला व्हावी या दृष्टीने अशा तज्ञांचे मार्गदर्शन आवश्यक आहे असे मत संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील, ट्रस्टी शिवानंद पाटील व कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले यांनी व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रा. पी. बी. साबळे हिने केले. तज्ञांची ओळख प्रा. एस. एस. मेटगार यांनी करून दिली प्रा.आर. एन. पंतोजी यांनी आभार मानले.

## स्वत:चे व्यक्तिमत्व विकसित करा : पोलीस आयुक्त

- सिद्धेश्वर वुमन्स पॉलिटेक्निकमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण; स्नेहल धप्पाधुळे आदर्श विद्यार्थिनी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

विद्यार्थ्यांनी त्यांची वैयक्तिक ओळख विकसित करताना आणि स्वतःचे व्यक्तिमत्व निर्माण करताना त्यांच्या पहिल्या नावावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. कारण ते वैयक्तिकरित्या त्यांचे व्यक्तिमत्व दर्शवते तसेच तुमचे व्यक्तिमत्व विकसित करा, आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र व्हा मोबाईल फोनवर वेळ वाया घालवणे टाळा- सोशल मीडियावर जास्त वेळ घालवल्याने तुमचे ध्येयांपासून लक्ष विचलित होतेच, शिवाय तुमच्या मानसिक आरोग्यावर आणि तुमच्या दिसण्यावरही परिणाम होतो असे प्रतिपादन शहर पोलिस आयुक्त एम. राज कुमार यांनी व्यक्त केले.



श्री सिद्धेश्वर वुमन्स पॉलिटेक्निक मध्ये वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी धर्मराज काडादी होते. प्राचार्य गजानन धरणे यांनी महाविद्यालयाच्या १५ वर्षाच्या दैदीप्यमान कामगिरीचा लेखाजोखा वार्षिक अहवालातून मांडला. यावेळी त्यांच्या आयुक्तांच्या पत्नी रम्या कुमार, श्री सिध्देश्वर देवस्थानचे उपाध्यक्ष सिध्देश्वर बमणी, विश्वस्त गुरुराज माळगे, मल्लिनाथ मसरे, जी. एन. कुमठेकर , गिरीश गोरनळ्ळी, काशिनाथ ढोले , विश्वनाथ लब्बा, नीलकंठप्पा कोनापुरे, प्रकाश विराजदार, रतन रिक्के, पशुपतीनाथ माशाळ, प्राचार्य गजानन धरणे, प्राचार्य टी. ए. चव्हाण, डॉ. नीता आळंगे, श्रेयस आळंद आदी उपस्थित होते. आदर्श विद्यार्थिनी पुरस्कार इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीमध्ये तृतीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या स्नेहल धप्पाधुळे हिस कै. रेवणसिध्द धरणे स्मृती पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. तसेच महाविद्यालात तीन वर्षाचा प्रवास पूर्ण करून एक आदर्श व्यक्तिमत्त्व असलेल्या अशा प्रत्येक अभियांत्रिकी शाखेतील एका विद्यार्थिनीस बेस्ट आउटगोइंग स्टुडंट या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यासोबतच प्रत्येक शाखेतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय अशा तिन्ही वर्षामधील विद्यार्थिनींचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीशैल मळेवाडी यांनी तर आभार प्रदर्शन संस्कृतिक विभागप्रमुख सुचेता चौधरी यांनी केले.

### गुरुवंदना ते बॉलिवूड गाणे

या संमेलनात गुरुवंदना पासून ते बॉलिवूड मिक्स पर्यतच्या गाण्यावर नृत्य, भरतनाट्यम सादर करुन प्रेक्षकांची मने जिंकली. भक्तीत तल्लीन होत विठ्ठल रुक्मिणी दिंडी सोहळा 'विठ्ठल विठ्ठल' या गाण्याद्वारे सादर केले, भगवान विष्णूचा सातवा अवतार मानल्या जाणाऱ्या भगवान रामाची कथा राम रामसिया गाण्याद्वारे सादर केले त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य आणि त्यागाचे दर्शन घडवणारा छावा या कथेवर आधारित एक नाट्य सादर केले.

## सिंहगडमध्ये रंगले महिलांचे खेळ अन् स्पर्धा, आरोग्यावर समुपदेशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित केगाव येथील सिंहगड पब्लिक स्कूल आणि एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात अनुक्रमे महिलांचे खेळ अन् स्पर्धा अर्थात होम मिनिस्टर आणि शारीरिक आणि मानसिक आरोग्यावरवर समुपदेशन करुन जागतिक महिला दिन साजरा केला.



महिलादिनी सकाळी सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्यूनिअर कॉलेजच्यावतीने होम मिनिस्टर कार्यक्रम घेण्यात आला. होम मिनिस्टर कार्यक्रमाचे संचलन वृत्तनिवेदिका अपर्णा गव्हाणे यांनी केले. यावेळेस कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्या निखहत शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले यांची उपस्थिती होती. पारंपरिक पेहरावात नऊवारी साडी, नथ, फेटा, अंबाडा, गजरा, अशा महाराष्ट्रीयन वेशभूषेत जवळपास ३५० पालक महिलांनी सहभाग नोंदविला. मिमिक्री, रॅम्प वॉक, उखाण्यांची स्पर्धा, फुगडी स्पर्धा, मर्दानी खेळ, गोंधळ नृत्याने प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिव्याणी शेलार, पल्लवी मस्के यांनी केले.

महाविद्यालयात महिला कर्मचाऱ्यांसह विद्यार्थिनींनी साठी मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर समुपदेशन करण्यासाठी कार्यक्रम घेण्यात आला. यात जीवशास्त्राच्या व्याख्यातिका, शिक्षिका अंजू क्षीरसागर आणि शहरी गुणवत्ता व्यवस्थापिका स्वाती मुडके-सलगर यांनी मार्गदर्शन केले. यावेळेस प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. रवींद्र व्यवहारे, प्रा. सुवर्णा क्षिरसागर, प्रा. मयुरी लटके यांची उपस्थिती होती. अंजू क्षीरसागर यांनी महिलांनी धावपळीच्या या वातावरणात मन आणि शरीर बळकट केले पाहिजे. मानसिक आणि शारीरिक तंदुरुस्तीसाठी व्यायाम, प्राणायाम केले पाहिजे. प्राणायामचे प्रात्यक्षिक दाखवून महिलांकडूनही प्राणायाम करून घेतला.स्वाती मुडके-सलगर यांनी भारतीय संस्कृती ही महिलाप्रधान संस्कृती असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन प्रणोती रणदिवे हिने केले.

### वैशाली नाईकवाडी प्रथम

पहिला क्रमांक वैशाली नाईकवाडी (पैठणी), दुसरा क्रमांक कान्होपात्रा जाधव (सोन्याची नाकातील नथ) यांनी पटकाविला. सर्वोत्कृष्ट पोशाख पारितोषिक कांचन लामकाने यांनी मिळविले.

## मोफत कौशल्य विकास रोजगार कार्यक्रम

**सोलापूर :** सेवा फाउंडेशन व सम्यक क्रांती मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिनानिमित्त मोफत कौशल्य विकास व रोजगार उपलब्धता कार्यक्रमाचे आयोजन लुंबिनी बुद्ध विहार, कमला नगर येथे आयोजित केले होते. यावेळी सम्यक क्रांती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष यशवंत गायकवाड, सेवा फाउंडेशनचे शितल कांबळे, मनीषा वाघमारे मानसी गायकवाड आदी उपस्थिती होते. याप्रसंगी मनीषा वाघमारे यांनी प्रशिक्षणाचे फायदे सांगितले. शितल कांबळे यांनी आभार मानले.

# घरकुल लाभार्थ्यांना मिळणार शासनाकडून जागा

- जागा खरेदीसाठी एक लाख रूपयांपर्यंत अनुदान
- जिल्ह्यातील तेरा हजारपेक्षा अधिक लाभार्थ्यांना फायदा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

प्रधानमंत्री आवास योजनेतून सोलापुरात ६२ हजार ९०० घरकुले मंजूर झाले आहेत. मात्र, घरकुल बांधकामांसाठी जागा नसलेल्या १३ हजार ४२८ लाभार्थ्यांना गावठाण, गायरानातून घरकुलांसाठी जागा-देण्याची तयारी जिल्हा परिषद प्रशासनाकडून सुरु झाली आहे.

जागा नसणाऱ्या लाभार्थ्यांना शासनाची मोफत जागा तसेच जागा खरेदी करणाऱ्या लाभार्थ्यांना पंडीत दीनदयाल उपाध्याय योजने अंतर्गथ खरेदी दर किंवा बाजार मूल्याप्रमाणे पन्नास हजारांपासून ते एक लाख रूपयांपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेचे सीईओ कुलदीप जंगम यांनी जिल्ह्यातील गायरान, गावठाणाच्या जागेची माहिती मागविली आहे. ज्या ठिकाणी गायरान, गावठाणांची जागा शिल्लक आहे , त्याठिकाणी जागा नसणाऱ्या लाभार्थ्यांना घरकुलसाठी जागा देण्यात येणार आहे. दरम्यान प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत जिल्ह्यात ६२ हजार ९०० लाभार्थ्यांना एकाच दिवशी मंजुरी देण्यात आली. मात्र, त्यातील तेरा हजारांपेक्षा जास्त लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी जागा नसल्याने त्यांनी शासनाकडे जागेची मागणी केली होती. त्यातील सर्वच लाभार्थ्यांना जागा देण्याची तयारी जिल्हा परिषदेकडून करण्यात येत आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाकडून जागा नसणाऱ्या लाभार्थ्यांची माहिती जमा करण्यात आली असून त्या लाभार्थ्यांना एका महिन्यांत जागा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच लाभार्थ्यांची जागा खरेदी करण्याची तयारी असेल तर त्यांना पन्नास हजार ते एक लाख रूपयांपर्यंत अनुदान मिळणार आहे.



त्यामुळे जिल्हा परीषदेचे घरकुल उद्दीष्ट पूर्ण होण्यास मदत होणार आहे. जिल्हा परिषद प्रशासन जिल्हाधिकारी यांच्याकडील गायरान व इतर शासकीय जागांची मागणी करण्यात आली आहे.

> **जागा व अनुदान देण्यात येणार**
>
> प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत जिल्ह्यातील ६२ हजार ९०० लाभार्थ्यांना घरकुले मंजूर झाले आहेत. त्यातील तेरा हजारांपेक्षा जास्त जागा नसणाऱ्या लाभार्थ्यांना १७ ते २८ मार्च दरम्यान शिबिर घेऊन जागा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. शिवाय पंडीत दीनदयाल योजनेअंतर्गत जागा खरेदीसाठी अनुदानही देण्यात येणार आहे.
>
> **- सुधीर ठोंबरे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा**

> **शासनाकडून जागा मिळाल्याचा आनंद**
>
> महिन्यांपूर्वी पंतप्रधान आवास योजनेतुन घरकुल मंजूर झाले. पंधरा हजार रूपयांचा पहिला हप्ताही मिळाले. मात्र जागा नसल्याने घरकुल बांधताना अडचण होती. मात्र शासनाकडून मोफत जागा मिळणार असल्याने आनंदी आहे.
>
> **- कलावती दिंडोरे, लाभार्थी**

### गावठाण व गायरान मधून जागा

गावठाण येथून १ हजार ९४२, वारसा हक्काने ३ हजार २३०, गायरान येथून २ हजार ४५०, बक्षीस पत्राद्वारे १ हजार ८८४ लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच राहिलेल्या लाभार्थ्यांना सीएसआर फंडातून जागा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. जागा खरेदीसाठी ५० हजार रूपयांपासुन एक लाख रूपयांपर्यंत अनुदानही देण्यात येणार आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थींच्या अंदोलनाला यश

### प्रशिक्षणार्थ्यांना ५ महिने मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रशिक्षणार्थ्यांना मुदतवाढ मिळणेकरिता राज्य सरकारकचे लक्ष वेधण्यासाठी सोलापूर शहर व जिल्हा मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थ्यांच्या वतीने सोलापूर शहर जिल्ह्यात समन्वयक सचिन शिंदे यांच्या नेतृत्वाखाली लोकशाही पद्धतीने आंदोलन करण्यात आले.

याआंदोलनाची दखल घेत, महाराष्ट्र राज्यातील विविध शहर जिल्ह्यात प्रशिक्षणार्थ्यांनी आंदोलने केले. दरम्यान, राज्य सरकारने आंदोलनाची दखल घेऊन महाराष्ट्र राज्याचे विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून आज रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांनी विधानसभेत मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षणार्थीची पाच महिने मुदत वाढ देण्यात आल्या बाबतची घोषणा करण्यात आले. याबाबत सोलापूर शहर जिल्हा युवा कार्य प्रशिक्षणार्थींच्या वतीने विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून निर्णयाचा स्वागत करून आनंदोत्सव साजरी करण्यात आला. यावेळी विविध आस्थापन विभागातील युवा कार्य प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### महिला दिन; इंग्लिश स्पिकींग कोर्सला महिलांचा प्रतिसाद

**सोलापूर, दि. १० मार्च -**

जागतिक महिला दिना निमित्तान अखिल भारतीय सोमवंशी आर्य क्षत्रिय महिला संघटन समिती, सारथी स्पोकन इंग्लिश आणि रोटरी क्लब ऑफ सोलापूर प्राईड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत इंग्लिश स्पीकिंग कोर्सला महिलांनी चांगला प्रतिसाद दिला. टिळक चौकातील मुक्तेश्वर मंदीराच्या गणेश हॉलमध्ये सुरु झालेल्या या उपक्रमात प्रशिक्षणाच्या पहिल्याच दिवशी मार्गदर्शक सरांनी वर्तमान काळातील इंग्रजी शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले आणि अनेक मूलभूत संकल्पना सोप्या उदाहरणांसह समजावून सांगितल्या. विशेषतः विवाहानंतर महिला बराच काळ शिक्षणापासून दूर राहिल्याने त्यांचा आत्मविश्वास कमी होतो आणि काही गोष्टी विस्मरणात जातात. मात्र, आपल्या मुलांच्या शिक्षणात आपण मागे राहू नये, त्यांना उत्तम मार्गदर्शन करता यावे यासाठी इंग्रजी भाषा आत्मसात करणे आवश्यक असल्याचे या सत्रातून अधोरेखित झाले.

### मडकी वस्ती ग्रीन सोसायटीत ८० हजारांची घरफोडी

**सोलापूर, दि. १० मार्च -**

शहरातील पुणे रोडवरील मडकी वस्ती येथील ग्रीन सोसायटीमधील बंद घर फोडून चोरट्याने ७८ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला. याबाबत आशुतोष विजयसिंह पाटील (वय ४४) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ८ मार्च रोजी आशुतोष पाटील हे घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. ते ९ मार्च रोजी सकाळी परत घरी आले. त्यावेळी त्यांना घरामध्ये चोरी झाल्याचे दिसून आले. यावेळी चोरट्याने पाटील यांच्या बंद घराचा कडी कोयंडा तोडून घरातील कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ७८ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक शंकर धायगुडे पुढील तपास करीत आहेत.



### हँडल लॉक केलेली दुचाकी बाळे येथून चोरीस

**सोलापूर, दि. १० मार्च -**

शहरातील बाळे परिसरातील जय मल्हार नगरातून चोरट्याने ४० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत दत्तात्रय बाहु अवताडे (वय ४०, रा. जय मल्हार नगर, बाळे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २३ फेब्रुवारी रोजी रात्री दत्तात्रय अवताडे यांनी त्यांची एमएच ४५ व्ही १८९० क्रमांकाची दुचाकी ही हॅन्डल लॉक करून घरासमोर पार्क केली होती. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस हवालदार कसबे पुढील तपास करीत आहेत.




### पादचाऱ्यास धडक; चारचाकी चालकाविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १० मार्च -**

हैद्राबाद रोडवरील सर्व्हिस रोडवरील जगदंबा हॉटेलसमोर पायी जाणाऱ्या पादचाऱ्यास धडक देणाऱ्या चारचाकीचालकाविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मुन्नाकुमार विनोद यादव (वय १९, रा. मार्केट यार्ड, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन आण्णाराव प्रभाकर पाटील (वय ३२, रा. वडगाव, ता. दक्षिण सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ मार्च रोजी सकाळी मुन्नाकुमार व त्याचा भाऊ रणजितकुमार हे दोघे जगदंबा हॉटेलसमोरील सर्व्हिस रोडने कोलगेट व ब्रश आणण्यासाठी पायी जात होते. त्यावेळी आण्णाराव पाटील याने त्याच्या ताब्यातील चारचाकी वाहन क्र. एमएच १३ सीजे १४५१ ची यादव यांस जोरदार धडक दिली. यामध्ये मुन्नाकुमार व त्याचा भाऊ हे दोघे जखमी झाल्याने याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार साळुंखे पुढील तपास करीत आहेत.



सोलापूर : ऑक्टोबर ते मे या कालावधीत सातसमुद्र पार करीत पर्यटनावर निघणाऱ्या फ्लेमिंगो पक्षांचे आगमन सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणावर झालेले आहे. धरण क्षेत्रात मच्छिमारी करणारे बांधवांशी हे पक्षी जणू काही परिचीत असून यांची जुनीच ओळख असल्यासारखे हे शेकडो फ्लेमिंगो धरण क्षेत्रात वावरत असून पहिला पाऊस पडताच ते मायदेशी परत जातात.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर

### • पदाधिकाऱ्यांमध्ये चलबिचल

**तभा वृत्तसेवा । अमोगसिध्द मुंजे**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

ग्रामपंचायत सदस्य व सरपंच झालेल्या लोकप्रतिनीधींना तीन वर्षांपासून जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य होता येत नसल्याने व माजी जिल्हा परीषद सदस्यांना पुन्हा सदस्य होण्याची ईच्छा निर्माण झाले असताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर जात आहे.



आमदार व खासदार निर्माण करण्याची फॅक्टरी म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था होय. राज्यातील अनेक जिल्हा परीषद सदस्य, अध्यक्ष व पंचायत समितीचे सभापती बनलेले लोकप्रतिनीधी आमदार व खासदार झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. मात्र तीन वर्षांपासून ओबीसी आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडल्याने जिल्हा परीषद व पंचायत समिती सदस्य होण्यास आतुर असलेल्या इच्छुकांची चलबिचल सुरू असल्याचे दिसून येते. मे महिन्यात निवडणुका होण्याची चिन्हे दिसत नसल्याने इच्छुकांची हिरमोड झाली आहे.

२०२२ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचे कार्यकाल संपला. मात्र, त्यावेळी कोरोना असल्याने निवडणुका पुढे ढकलण्यात आली. त्यानंतर न्यायालयात ओबीसी आरक्षण विषय प्रलंबित असल्याने निवडणुका पुढे जात आहेत. मात्र, यामुळे तीन वर्षांपासून निवडणुकीची तयारी करणाऱ्या इच्छुकांमध्ये चलबिचल सुरू असल्याचे दिसून येत आहे.

राज्यात २०१७ ते २०२२ कालावधीत जिल्हा परीषद व पंचायत समितीचे लोकप्रतिनिधी कार्यरत होते. त्यांचा कार्यकाल संपल्यानंतर राज्य सरकारकडून निवडणुका घेण्यासाठी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे इच्छुकांमधून सांगण्यात येत आहे. महाविकास व महायुती सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी हालचाल केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सर्वच पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजी दिसुन येते. ओबीसी आरक्षण न्यायालयात प्रलंबित असल्याचे कारण सांगत सरकार जाणिवपूर्वक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलत आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांना संधी कधी मिळणार ? अशी तक्रार करण्यात येत आहे. २०२२ मध्ये महाविकास आघाडी सरकार सत्तेत असताना निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या. त्यानंतर महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर नाराजी असल्याने महायुतीसाठी पोषक वातावरण निर्मिती करण्यासाठी निवडणुक लांबणीवर टाकण्यात आले. विशेष म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडत असताना लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. शिवाय विधान परीषदेच्या निवडणुकाही जाहीर झाल्या आहेत. विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारला भरघोस प्रतिसाद मिळाल्याने राज्य सरकार मे महिन्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुक घेण्याबाबत अंदाज वर्तविण्यात येत होता. मात्र, निवडणुक कार्यक्रम जाहीर झाला नसल्याने मे महिन्यात निवडणुका होण्याची शक्यता धूसर झाली आहे. स्थानिक पदाधिकाऱ्यांना संधी मिळणाऱ्या निवडणुका पुढे ढकलण्यामागे सरकारचे धोरण काय? असा सवाल उपस्थित केला जात आहे. मात्र यामुळे विधानसभा व लोकसभेसाठी नवे नेतृत्व तयार होताना अडचणी निर्माण होणार ? हे मात्र नक्की! जिल्हा परीषद व पंचायत समिती निधीमधून गावाच्या विकासासाठी निधी उपलब्ध होत असल्याने मतदार व कार्यकर्त्यांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण होतात. शिवाय विकासाला गती मिळते. मात्र तीन वर्षांपासून लोकप्रतिनिधी नसल्याने अधिकाऱ्यांवर वचक राहिला नाही. शिवाय अधिकारी मनमानी पध्दतीने वागताना दिसून येत आहे. विकासकामांच्या निधी व बिल वाटपाबाबत अनेक तक्रारी सुरू आहेत. त्यामुळे प्रशासनावर वचक ठेवण्यासाठी लोकप्रतिनिधी आवश्यक आहेत. मात्र सरकार निर्णयानंतरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार! हे मात्र निश्चित. त्यासाठी पदाधिकाऱ्यांना प्रतीक्षा करावी लागणार आहे.

**ग्रामपंचायतींना थेट निधी :** केंद्र सरकारकडून गावांच्या विकासासाठी मंजूर करण्यात आलेला वित्त आयोगासह विविध प्रकारच्या निधी थेट ग्रामपंचायतींना मिळताना कोणतीही अडचण नाही. शिवाय विकासकामे त्वरीत होत असल्याने सरकार स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुक घेण्यास जाणिवपूर्वक टाळाटाळ करीत असल्याचे सांगण्यात येते.

**विकासकामांसाठी लोकप्रतिनिधी आवश्यक :** जिल्हा परीषद व पंचायत समितीमधील विकासनिधीमुळे गावाच्या विकासासाठी गती येते. शिवाय सभागृहात पाठपुरावा केल्यानंतर विकासकामे प्रगतीपथावर येतात. अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारावर वचक ठेवण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकप्रतिनिधी आवश्यक आहेत.

- **सुरेश हसापूरे,** जिल्हा कार्याध्यक्ष, काँग्रेस

**लोकप्रतिनीधींचा सिंहाचा वाटा :** देशाच्या विकासात आमदार व खासदारांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींचा सिंहाचा वाटा आहे. स्थानिक पातळीवर नेतृत्व तयार झाल्याने विधानसभा व लोकसभेत समस्यांचा पाठपुरावा करणे सुलभ होते. नागरीकांना दररोज भेटणारा लोकप्रतिनीधी असल्याने नागरीकांना समस्यांचा त्रास होत नाही.

- **अमर पाटील,** माजी जिल्हा परीषद सदस्य, हत्तूर

**अधिकारांच्या विभागणीमुळे विकास शक्य**
आमदार व खासदार यांचे कार्यक्षेत्र मोठा असते. त्यामुळे त्यांना विकासकामे करताना अडचणी येतात. आमदार व खासदार यांचे अधिकार जिल्हा परीषद व पंचायत समितीमध्ये विभागणी झाल्यामुळे स्थानिक पातळीवरील समस्या सोडविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य पाठपुरावा करू शकतात.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणे गरजेचे आहे.

- **मळसिध्द मुगळे,** जिल्हा उपाध्यक्ष, भाजपा

**तरूणांच्या नेतृत्वासाठी गरजेचे**
ग्रामपंचायत सरपंच झाल्यानंतर पंचायत समिति व जिल्हा परीषद सदस्य झालेल्या लोकप्रतिनिधींना स्थानिक पातळीवरील समस्यांची जाणीव असते. त्यामुळे मतदार संघातील समस्या सोडविण्यासाठी व तरूणांचे नवे नेतृत्व तयार होण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात यावे. वारंवार निवडणुका पुढे जात असल्याने हिरमोड होत आहे.

- **अप्पाराव कोरे,** माजी जिल्हा परीषद सदस्य मंद्रुप

# शिवपुरी येथील श्री अग्निमंदिराचे उद्या भूमिपूजन

### • अग्निहोत्र दिनाचे औचित्य : ४ एकरात साकारणार मंदिर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० मार्च -**

अक्कलकोट तालुक्यातील शिवपुरी येथे उभारण्यात येणाऱ्या श्री अग्निमंदिराचे भूमिपूजन बुधवारी १२ मार्च रोजी सकाळी ८ वाजता डॉ. पुरुषोत्तम राजीमवाले यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती ज्येष्ठ पत्रकार एस. के. कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली.



दि. १२ मार्च हा अग्निहोत्र दिन म्हणून साजरा करण्यात येतो. याच दिवशी परमसद्गुरु श्री गजानन महाराज यांना त्यांच्या श्रेष्ठ सद्गुरूंकडून पूर्णाभिषेक दीक्षा (त्रिपुरी विद्या) मिळाली होती. त्यामुळे १२ मार्च रोजी श्री अग्निमंदिराचे भूमिपूजन होणार आहे. चार एकर परिसरात सुमारे तीन वर्षात उभारण्यात येणारे हे श्री अग्निमंदिर अग्निहोत्राचे जगातील प्रमुख केंद्र राहणार आहे. या श्री अग्निमंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे या श्री अग्निमंदिरात अग्निहोत्राशिवाय दुसरा कोणताही विधी होत नाही. या श्री अग्निमंदिराचा परिसर शांततामय राहणार असून येथे दुसरा कोणताही शब्द उच्चारला जाणार नाही. त्यामुळे या वातावरणात भावातील ध्यानाचा अनुभव घेता येऊ शकेल, असे कुलकर्णी याप्रसंगी म्हणाले.

जगभरातील मलेशिया, जर्मनी, पोलंड, चीन अशा ६० देशांमधील नागरिक अग्निहोत्राशी परिचित असून ते नित्य अग्निहोत्र करतात. सोलापूर शहर जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांनीही स्थानिक सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळेला नित्य अग्निहोत्र करावे आणि वातावरण शुद्धीसह मनशांतीचा लाभ घ्यावा. तसेच बुधवारी दि. १२ मार्च होणाऱ्या श्री अग्निमंदिराच्या भूमिपूजन समारंभास उपस्थित रहावे, असे आवाहनही एस. के. कुलकर्णी यांनी याप्रसंगी केले. या पत्रकार परिषदेस विश्व फाउंडेशनचे विश्वस्त नाना गायकवाड, मोहन डांगरे, राहुल डांगरे, योगेश डांगरे उपस्थित होते.

# युनियन बँकेच्या व्यवस्थापकाची घरफोडी उघडकीस

### ▶▶ २१ तोळे सोन्याचे तर २३ तोळे चांदीचे दागिने हस्तगत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० मार्च -**

नोव्हेंबर २०२३ मध्ये शहरातील एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या युनियन बँकेच्या व्यवस्थापकाच्या घरामध्ये झालेली घरफोडीचा गुन्हा शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी उघडकीस आणून अटक केलेल्या चोरट्याकडून ९ लाख ४८ हजार ३१६ रुपये किंमतीचे २०.९३ तोळ्याचे सोन्याचे, २३.२२ तोळे चांदीचे दागिने हस्तगत केले.




प्रदीपकुमार रामचंद्र कोळी (वय ४५, रा. कवठेमहांकाळ, जि. सांगली सध्या रा. बाळे ब्रिजजवळ, सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत संतोष नागनाथ केदारी (वय ४१, रा. बी ग्रुप, जुना विडी घरकुल, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

संतोष केदारी हे २४ नोव्हेंबर २०२३ रोजी कुटुंबियासमवेत पुणे येथे गेल्यानंतर चोरट्याने त्यांच्या बंद घराचे कुलूप तोडून घरातून ५ लाख ३० हजार रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले होते. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. १ मार्च रोजी शहर गुन्हे शाखेचे पोलिस पथक हे सिध्देश्वर मंदीर परिसरात गस्त करीत होते. त्यावेळी गणपती घाट येथे एक संशयित व्यक्ती मिळून आल्याने पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली. त्यावेळी त्याने त्याचे नाव पी एस पाटील (रा. कोल्हापूर) असे सांगितले. तो व्यक्ती मोबाईलदेखील वापरत नसल्याने त्याने त्याच्या नावाबद्दल पोलिसांना कोणताही पुरावा दिला नाही. त्यामुळे पोलिसांचा संशय बळावल्याने पोलिसांनी त्यास पोलिस खाक्या दाखविला. त्यावेळी त्याने त्याचे नाव प्रदीपकुमार कोळी असे सांगून नोव्हेंबर २०२३ मध्ये विडी घरकुल परिसरात रात्रीच्यावेळी चोरी केल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी त्याच्याकडून संतोष केदारी यांच्या गुन्ह्यातील सोन्या-चांदीचे दागिने हस्तगत केले. ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक संदीप पाटील, अमंलदार विजयकुमार वाळके, विद्यासागर मोहिते, तात्यासाहेब पाटील, गणेश शिंदे, निलोफर तांबोळी, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड, फरदीन शेख यांनी केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०५३

**विधीतें पाळित । निषेधाते गाळित ।**
**मज देऊनि जाळित । कर्मफळें ।।**

योगमार्ग आणि भक्तिमार्ग हे एकाच ध्येयाच्या ठिकाणी जाणारे मार्ग असले तरी योगमार्ग हा किती कठिण आहे, याचे स्पष्टीकरण भगवंतांनी अर्जुनासमोर केले आहे. योगमार्गाच्या तुलनेत भक्तिमार्ग साधा, सरळ असल्याबाबत भगवंत अर्जुनाला सांगत आहेत. भक्तिमार्गावर चालणारे भक्त त्यांच्या त्यांच्या वाटयाला आलेल्या कर्माचे आपल्या इंद्रियाद्वारा आनंदाने आचरण करीत असतात. असे भक्त नितीनियमाचे पालन शास्त्राने सांगितल्या प्रमाणे करतात. निषिध्द कर्माचा त्याग करुन ती कर्मे निष्काम बुध्दीने भगवंताला अर्पण करुन त्या कर्मापासून उत्पन्न होणारी सर्व फळे निर्बीज करतात. हे सांगतांना भगवंत म्हणाले,

**विधीतें पाळित । निषेधाते गाळित ।**
**मज देऊनि जाळित । कर्मफळें ।।**

भगवंताला यातून अर्जुनाला हे ही सांगायचे आहे की, असे भक्त कर्मात फलासक्ती बाळगत नाहीत. फळाची अपेक्षा न ठेवता किंवा त्या कर्मात न गुंतता कर्म, कर्तव्य पार पाडल्याने त्या कर्माच्या परीणामाची बाधा त्यांना होत नाही. कर्मात न अडकणाऱ्या भक्ताच्या मनावर कसलाही ताण राहत नाही. कर्माच्या परिणामाचे, फळाचे ओझे अशा भक्ताच्या मनावर पडत नसल्याने ते आनंदी राहत असतात. भोग आणि



मोक्षाचा अहंकार, अपेक्षा या भक्तांनी सोडलेली असल्याने इंद्रियाचे लाड पुरविण्यासाठी ते काहीच करीत नाहीत. यांची मानसिकता व भावना पाहून इंद्रिये सुध्दा आपोआप स्थिर झालेली असतात. इंद्रिये यांच्यासाठी आवश्यक ती कामे आपोआप करतात पण हे भक्त इंद्रियासाठी काही करीत नाहीत.

भक्तीमार्गाचा हा उपदेश भगवंत अर्जुनाला सांगत असले तरी ज्ञानेश्वर माऊली या भक्तीमार्गाचे जास्तीत जास्त व आवश्यक त्या प्रमाणे हा उपदेश तुम्हा-आम्हाला करीत आहेत. भक्तीमार्ग साधा, सरळ असला तरीही त्याला यश प्राप्ती तेव्हाच आहे, जेव्हा आपले मन, इंद्रिये आपल्या ताब्यात येतील. आपल्यातला मीपणा जेव्हा गळून जाईल तेव्हा खऱ्या अर्थाने या भक्तीमार्गाला सुगंध प्राप्त होईल. मीपणाचे ओझे घेऊन या मार्गावरुन चालता येत नाही, याचे स्पष्टीकरण माऊलींनी केले आहे. आपण आपणाला पडताळून पाहिले पाहिजे की, आपण मी ला सोबत घेऊन कर्मे करतो का? फलासक्ती ठेवून कर्म करतो की? निष्काम बुध्दीने कर्मे करतो का? या प्रश्नांची उत्तरे आपण शोधून भक्तीमार्गावर चालण्याचा प्रयत्न करायला हवा. आपल्या या प्रयत्नाला यश देण्याची जबाबदारी सद्गुरु श्री ज्ञानेश्वर माऊलीवर टाकली तरी चालेल. माऊलीवर जबाबदारी टाकण्याअगोदर आपणाला आपली इंद्रिये, मन आपल्या ताब्यात ठेवण्याची जबाबदारी पार पाडावी लागेल. इंद्रियांना आपल्या अधिन न ठेवता हा भक्तीमार्ग आम्ही पाळू असे म्हणणे अतिशय चुकीचे होईल, हे आपल्या ध्यानात असू द्यावे. भक्तीमार्गातला खरा अडसर म्हणजे इंद्रियांच्या तालावर चालणे हाच असल्याने हा अडसर आपण स्वत:च दूर करायला हवा.

**जय जय राम कृष्ण हरी ।।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - चांगला दिवस, छत्रपती संभाजीराजे बलिदान दिन, कानिफनाथ यात्रा |
| दि. ११ मार्च २०२५ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८०-८१ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४६ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| मास - फाल्गुन | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| शु. द्वादशी (०८.१३) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - वसंत | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र - आश्लेषा (२६.१४) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - अतिगंड (१३.१६) | |
| करण - कौलव (२०.३९) | |

### राशीभविष्य

**मेष :** जीवनसाथीच्या सहकार्याने कौटुंबिक समस्या दूर होतील. फायदेशीर चर्चा घडून येई. भोग-विलास प्रवृत्तीत वाढ होईल. व्यापार चांगला चालेल.

**वृषभ :** सहनशिलता कमी होऊ देऊ नका. आर्थिक अडचणी येऊ शकतील. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. जास्त विश्वास, जास्त उत्साह आपले होणारे काम बिघडवू शकतात.

**मिथुन:** अविवाहितांना लग्नाचे प्रस्ताव येतील. कामकाजाचे क्षेत्र विस्तारीत होईल. व्यापाराकरिता आजचा दिवस शुभ जाईल.

**कर्क :** विश्वासदर्शक वातावरण राहील. स्वत:च्या प्रयत्नाने सम ाजात मान मिळेल.

**सिंह :** प्रतिष्ठित व्यक्तींच्या उदारपणामुळे आपली कार्यक्षम ता वाढणार आहे. कामकाजात सुधारणा होईल. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे.

**कन्या :** व्यापार चांगला चालेल. कार्यक्षेत्रात नवीन काम ाची योजनेमुळे फायदा होईल. मेहनतीचे उचीत फळ मिळेल.

**तुळ :** नवीन कामाची आखणी कराल. फायदेशीर बातम्या ऐकण्यास मिळतील. जुना रोग उदभवण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** साहित्य वाचनाची गोडी वाढणार आहे.आधिकारी लोकांशी नवीन संबध जुळतील. चैनीच्या वस्तू घेण्याकडे आपला ओढा राहील. रोजगारात प्रगीत होईल. खर्चावर नियंत्रण राखा.

**धनु :** आपली कार्यकुशलता व इतरांच्या सहयोगाने कामात यश मिळेल. आपले विचार योग्य असतील. कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवा.

**मकर :** नातेवाईंकाशी असलेले संबंध मर्यादित ठेवा. मुलांच्या प्रकृतीत सुधारणा होईल. विराधीन असलेले कामे पार पडतील. व्यवसायिक निर्णय वेळेवर घ्या.

**कुंभ :** लोकांशी संपर्क वाढवून आपण आपल्या योजना पूर्णत्वास न्याल. राजकीय लोकांपासून फायदा होईल. व्यापारात नवीन संबंध प्रस्तापित होतील. मुलांच्या कामाकडे लक्ष द्या.

**मीन :** रचनात्मक कार्यात प्रगती होईल. मुलांच्या इच्छा पूर्ण होतील. फायद्याच्या संधी मिळतील. मित्रांची मदत मिळेल. व्यवहारात नम्रता व सहनशिलता आवश्यक आहे.

# वाचनामुळे संवेदनशील समाज निर्माण होतो

### साहित्य अकादमी पुरस्कार विजेते देविदास सौदागर यांचे प्रतिपादन

### ग्रंथोत्सव २०२४ चे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १० मार्च-**

पुस्तके विकत घेऊन वाचली पाहिजे दररोज दहा ते पंधरा मिनिट पुस्तके वाचलीच पाहिजे. वाचनामुळे संवेदनशील समाज निर्माण होतो व संवेदनशील समाजाची आजची गरज आहे. आजच्या भयावान वातावरणात त्याची जास्तच गरज आहे. वाचन आजच्या परिस्थितीला उत्तर म्हणून पर्याय असू शकतो, असे प्रतिपादन साहित्य अकादमी पुरस्कार विजेते देविदास सौदागर यांनी केले.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र, जिल्हा ग्रंथालय कार्यालय आयोजित महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत ग्रंथोत्सव २०२४ चे शिवछत्रपती रंगभवन येथे उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कवी अनंत राऊत हे होते. तत्पुर्वी सकाळच्या सत्रात संगमेश्वर पब्लिक स्कूल येथे लेझीम, टाळमृदंग झांज पथक या पारंपरीक वाद्यांच्या गजरात ग्रंथ दिंडीचे पुजन करुन उपजिल्हाधिकारी अजंली मरोड यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचा शुभारंभ करण्यात आला.

शिवछत्रती रंगभवन येथे आयोजित ग्रंथोत्सव कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती शालिनी इंगोले सहाय्यक ग्रंथालय संचालक पुणे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील हुसे,जिल्हा कोषागार अधिकारी रणजित कदम, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष विजय पवार, जेष्ठ पत्रकार सचिन जवळकोटे, प्रोफेसर डॉ. शिवाजीराव देशमुख, कार्यवाह साहेबराव शिंदे ग्रंथ मित्र कुंडलिकराव मोरे, उपाध्यक्ष पांडुरंग सुरवसे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती. तसेच सोलापूर जिल्ह्यामधून सार्वजनिक ग्रंथालयाचे पदाधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर आयोजित परिसंवादामध्ये मान्यवर साहित्यिकांनी आपले विचार व्यक्त करून वाचनाने माणूस समृध्द होतो तसेच ग्रंथ, पुस्तक हे माणसाचे मित्र असतात हे सांगितले. ज्या ज्या लोकांनी पुस्तकाची मैत्री केली ती लोक या जगात यशस्वी झाली निवडक दर्जेदार पुस्तक वाचली पाहिजे. तर ज्येष्ठ साहित्यिक प्रोफेसर डॉ. शिवाजीराव देशमुख यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणामध्ये, धर्म, जात कधी आडवी नसते भक्तीला, चालत राहावं वाटा पुस्तक असावं सोबतीला. पुस्तक शब्दांच्या मोत्यात गुंफलेला हार वळणाच्या वाटेवर विसाव्याचा आधार. पुस्तक मोरपीस बनवून काळजावर फिरतं, दु:खाच्या जखमेवर हळूच फुंकर मारत. अशा अनमोल विचारांनी सभागृहास साहित्याची दिशा दाखवण्याचा प्रयत्न केला. या ग्रंथोत्सवा दम्यान ग्रंथप्रेमींसाठी ग्रंथ विक्रीचे स्टॉल लावण्यात आलेले असून, आपल्या आवडीचे ग्रंथ विकत घेण्याची संधी या दोन दिवसात उपलब्ध होणार आहे, असे जिल्हा ग्रंथालया मार्फत आवाहन करण्यात आले आहे.



# सुरवसे शिक्षण संस्थेत जागतिक महिला दिन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० मार्च -**

शहरातील होटगी रोडवरील सुरवसे शिक्षण संस्थेमध्ये जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य उज्वला साळुंखे तर प्रमुख पाहुणे म्हणून सुरवसे प्राथमिक विभागाचे दीपक डांगे सुरवसे बालक मंदिर च्या शुभांगी लोखंडे ज्येष्ठ शिक्षक विनायक घाडगे ज्येष्ठ शिक्षिका सुजाता लोंढे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या मूर्तीची तसेच सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी सुरवसे शिक्षण संस्थेतील सर्व महिला शिक्षकांचा संस्थेच्या वतीने भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतातून महिला दिनाच्या सर्व शिक्षक महिलांना शुभेच्छा दिल्या. प्राचार्य उज्वला साळुंखे यांनी आपल्या मनोगतातून जागतिक महिला दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या व महिला सर्व क्षेत्रात पुढे असून त्यांच्या कार्यामुळे महिलांना जगात मानाचे स्थान निर्माण झाले आहे असेही त्या म्हणाल्या यावेळी कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन आरती काटेकर यांनी केले यावेळी प्रशालेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# प.म.प्रांत बौद्धिक प्रमुख मैत्रेयीताई शिरोळकर यांचे व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१० मार्च-**

राष्ट्र सेविका समिति आणि अ. भा. अधिवक्ता परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे सुशासन या विषयावर समितिच्या प.म.प्रांत बौद्धिक प्रमुख मैत्रेयीताई शिरोळकर यांचे व्याख्यान शिवस्म ारकच्या सभागृहात झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उत्पादन शुल्क विभाग अधीक्षक भाग्यश्रीताई जाधव होत्या. व्यासपीठावर अधिवक्ता परिषद सोलापूर जिल्हा अध्यक्ष ॲड. धनंजयराव माने, शहर अध्यक्ष श्री. अग्रवाल हे मान्यवर होते.



अहिल्यादेवींच्या शासनातील राजकारण,समाजकारण, न्यायनिवाडा, पर्यावरण, प्रजेची काळजी,राष्ट्र हितासाठी अनेक रूढींना छेद देत उपभोगशून्य जीवन जगत सुशासन, संरक्षण, महिलांची सेना उभारणी अशा अनेकानेक पैलूंची माहिती पोचवली. ओघवती भाषा, स्पष्ट विचार व्यक्त करत श्रोत्यांचे समाधान केले. कार्यक्रमात पद्य, अपर्णाताई सहस्रबुद्धे यांच भारूड याने रंगत आणली. प्रास्ताविक समितिच्या सोलापूर जिल्हा कार्यवाहिका देवयानीताई देशमुख यांनी केले. तर सूत्रसंचालन डॉ. यशश्रीताई जोग यांनी केले.

# होम मिनिस्टर स्पर्धा : जयश्री पुप्पल प्रथम

### सहस्त्रार्जुन विद्यामंदिरात महिला दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

जागतिक महिला दिन व कै. सौ. पार्वतीबाई बाबुरावसा भूमकर यांच्या २५व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त सहस्त्रार्जुन प्राथमिक विद्यामंदिर माता पालकांसाठी होम मिनिस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात या स्पर्धेत जयश्री पुप्पल यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

होम मिनिस्टर कार्यक्रमाचे उद्घाटन आहार तज्ञ डॉ.सोनाली घोंगडे यांच्या हस्ते आकाशात फुगे उडून करण्यात आले. अध्यक्षस्थानी माधुरी भूमकर होत्या. या स्पर्धेत शाळेतील दोनशे माता पालकांनी सहभाग नोंदवला होता. प्रथम क्रमांक मिळवलेल्या जयश्री पुप्पल यांना माधुरी भूमकर यांच्याकडून १५००१ रूपयेची पैठणी साडी, सन्मानचिन्ह, मानाचा मुकुट व त्याचबरोबर होम मिनिस्टर बॅच देऊन गौरविण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापिका मंजुषा माने यांनी केले. सूत्रसंचालन लक्ष्मी बिच्चल यांनी केले तर आभार रेखा नेलुरे यांनी मानले.



कार्यक्रमाचे निवेदन शाळेतील सहशिक्षिका वंदना आळंगे, भारती बुरगुटे, अनिल गायकवाड, वर्षा कबाडे, सुवर्णा भोपळे व जय कबाडे यांनी केले. याप्रसंगी महिला मंडळाच्या अध्यक्षा वर्षा मगजी,युवती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा गीता हबीब, केशर भूमकर,वासंती भूमकर, विद्या पवार,रुपाली दामजी,शांताबाई भूमकर,मधु भूम कर,मिताली भूमकर,राणी भूमकर,. लक्ष्मी बारड,सुरेखा झाड,मोनाली रंगरेज आदी महिला उपस्थित होत्या. यावेळी विठ्ठल मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष संजीव बिद्री,शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष राजूसा भूम कर,संस्थेचे सचिव मा.श्रीजयकुम ारसा कोल्हापुरे,शैक्षणिक संस्थेचे सचिव गजाननसा गोयल, संजीव रंगरेज,शिरीष कोल्हापूरे,भरतकुमार शालगर , श्रीराम पवार, अनिल रंगरेज आदी उपस्थित होते.

**हे आहेत विजेते १० स्पर्धक**

जयश्री पुप्पल, पुजा गवळी, राजश्री हांडे, सुलभा निकम, शितल कुरुडे, वर्षाराणी देवरकोंडा,अरुणा शिंदे,शिल्पा हौशेट्टी, निकत शेख व महानंदा हुल्ले

**पोषणयुक्त केसांसाठी**

**पॅराशुट ॲडव्हान्स ॲलोवेरा एनरिच्ड कोकोनट हेयर ऑईल सर्वोत्तम पर्याय**

**सोलापूर, दि. १० मार्च -**

कोमल व पोषणयुक्त केसांसाठी या डीआयवाय हेअर मास्कने उन्हाळ्यातील उष्णतेवर मात करा. ते केसांमधील ओलावा कायम ठेवते,केस म जबूत करते आणि उन्हाळ्यात होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण करते.हे फायदे मिळवण्यासाठी विनासायास आणि गुणकारी उपाय शोधत असाल तर पॅराशूट ॲडव्हान्स्ड ॲलोवेरा एनरिच्ड कोकोनट हेअर ऑईल हे उत्पादन अगदी सुयोग्य आहे.हा नरिशिंग हेअर मास्क स्वतः तयार करायचा असेल (डीआयवाय) तर कोरफडीचे ताजे जेल आणि नारळाचे तेल एकत्र करा.त्याची पेस्ट बनवा. केसांच्या मुळांपासून टोकांपर्यंत समप्रमाणात ही पेस्ट लावा आणि टाळूवर हलक्या हाताने मसाज करा.केस रूक्ष होणार नाहीत आणि केसांना कोमलता व पोषण मिळेल.

# देऋब्राच्या पाठांतर स्पर्धेत १९५ विद्यार्थ्यांचा सहभाग

### दासनवमीनिमित आयोजन; शुक्रवारी बक्षिस वितरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१० मार्च-**

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्यावतीने दासनवमीनिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी मनाचे श्लोक, करूणाष्टके व रामरक्षा यावर आधारीत पाठांतर स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये शहरातील १९५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सरस्वती मंदीर शाळेत घेण्यात आलेल्या या स्पर्धेचे उदघाटन सरस्वती मंदिर प्रशालेच्या मुख्याध्यापिका नीता येरमाळकर यांच्या हस्ते प्रतिमापूजनाने झाले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर, कार्यवाह श्याम जोशी, उपाध्यक्ष दत्तात्रय आराध्ये, विजय कुलकर्णी, खजिनदार सतीश पाटील, कार्यकारिणी सदस्यरविंद्र तुळजापूरकर, महिलाध्यक्षा हेमा चिंचोळकर, युवक अध्यक्ष सुशांत कुलकर्णी आदींसह पालक व विविध शाळेतील शिक्षक उपस्थित होते. सौ. येरमाळकर यांचा सत्कार डॉ.येळेगावकर यांच्या हस्ते करण्यात आला.



सूत्रसंचालन श्याम जोशी यांनी केले. दत्तात्रय आराध्ये यांनी आभार मानले. या स्पर्धेत शहरातील विविध शाळांतून छोटा गट ते चौथी इयत्तेतील सुमारे १९५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

दिपाली आराध्ये, मीरा धाम णगावकर, मीनल येळेगावकर, रुपाली भंडारे, संपदा पानसे, अम रजा वासकर, पद्मजा तारके, सुवर्णा देशपांडे, शांभवी कणबसकर, कौशिकी कणबसकर, सारीका कुलकर्णी, समृध्दी नाशिककर यांनी परिक्षकाचे काम केले. तर सुशांत कुलकर्णी यांनी स्पर्धा प्रमुख म्हणून काम केले. स्पर्धेचा निकाल त्या त्या शाळेत जाहीर करण्यात आला आहे. पारितोषिक वितरण कार्यक्रम शुक्रवारी (ता.१४) सकाळी दहा वाजता दत्त चौकातील रामदास संकुलातील संस्था कार्यालयात होणार आहे. यावेळी बक्षिसाचे वितरण करण्यात येणार आहे.

# न्यायालयीन प्रक्रियेस अडथळा; मोहोळ पोलिसांविरुद्ध कारवाई करावी

### दोन्ही आरोपीतर्फे न्यायालयात अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

न्यायालयीन कामकाजासाठी न्यायालयात आलेल्या आरोपीला न्यायालयाच्या आवारातून न्यायाधीशांच्या परवानगीशिवाय अटक केल्याने न्यायालयीन प्रक्रियेस अडथळा आणल्याबद्दल मोहोळ पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक अजय केसरकर, पोलीस ढवळे, पोलीस राठोड व सोलापूर न्यायालयातील मोहोळ पोलीस स्टेशनचे कोर्ट ऑर्डरली पवार यांचेविरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी, असा अर्ज आरोपीतर्फे न्यायालयात सादर करण्यात आला आहे.

सरकार पक्षाने १२ मार्च रोजी या अर्जावर म्हणणे सादर करण्याचे आदेश ॲडिशनल सेशन्स जज्ज योगेश राणे यांनी दिले आहेत. म ोहोळ तालुक्यातील पाटकुल येथील सुनील घोडके खून खटल्याची सुनावणी सत्र न्यायालयात सुरू आहे. या खटल्याचे कामकाज अंतिम टप्प्यात आले आहे. १२ फ ेब्रुवारी २०२५ रोजी न्यायालयाने कलम ३१३अन्वये आरोपींचा जबाब नोंदविण्यासाठी तारीख नेम लेली होती. या तारखेस जामिनावर असणारे आरोपी रोहन व अक्षय एडके न्यायालयात हजर होते. न्यायालयाच्या आवारात ते हजर असताना मोहोळ पोलीस स्टेशनच्या पोलीस अधिकाऱ्यांनी या दोन्हीही आरोपींना न्यायालयाची परवानगी न घेता अटक केली. या पोलीस अधिकाऱ्यांच्या बेकायदेशीर कृत्यामुळे त्या दिवशी आरोपींचा न्यायालयात जबाब घेता आला नाही त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेस अडथळा निर्माण झाला. या कृत्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करण्याचा अर्ज दोन्ही आरोपींतर्फे न्यायालयात दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात आरोपींतर्फे ॲड. धनंजय माने, ॲड. जयदीप माने, ॲड. वीरभद्र दासी हे काम पाहत आहेत.

# कर्करोगापासून वाचण्यासाठी महिलांनी वेळीच तपासणी करावी : डॉ. डांगे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च -**


पूर्वी तुरळक प्रमाणात असणारा कर्करोग आता घरापर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे विशेषतः स्तनाच्या कर्करोगापासून वाचण्याकरिता महिलांनी तज्ञांकडून वेळीच तपासणी करून घ्यावी, असे प्रतिपादन डॉ. अवधूत डांगे यांनी केले.



विशाखा महिला लोकसंचलित साधन केंद्र, भाई छन्नूसिंग चंदेले अभ्यास केंद्र यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ व जिल्हा विधीसेवा प्राधिकरण सोलापूर यांच्यातर्फे महिला दिनानिमित्त महिलांना उद्योग प्रशिक्षण मार्गदर्शन, आरोग्य विषयक आणि कायदेविषयक मार्गदर्शन अंत्रोळीकर नगरातील प्रगती लॉन येथे झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन उद्योजक कुमार करजगी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष सुधीर खरटमल, सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश वासुदेव, उद्योग आघाडीच्या श्रद्धा कंडूडे, स्नेहल राऊत, डॉ. अवधूत डांगे, संयोजिका माजी महापौर नलिनी चंदेले, प्रतीक्षा चव्हाण, नीता गवळी, वंदना भिसे, महेश धनवाणी, माजी नगरसेविका नंदा कांगरे, कविता पाचंगे, सुनंदा साळुंखे, लक्ष्मण भोसले लता ढेरे, शशिकला ढंगापुरे, सुचिता साळवी, ॲड. संतोषी गुंडे आदी उपस्थित होते. नलिनी चंदेले यांनी प्रास्ताविक तर पल्लवी माने यांनी सूत्रसंचालन आणि आभार मानले.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलक:- (७५) धर्म

भारतीय शिक्षण पद्धती अशी असावी जिथे नैतिक शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रप्रेमाचे जागरण व्हावे. हा दृष्टिकोन समोर ठेवून श्री गुरुजींनी शिक्षा प्रणाली विकसित करण्याचा संकल्प केला. १९४६ साली त्यांनी कुरुक्षेत्र येथे गीता विद्यालय सुरू केले. १९५२ मध्ये उत्तर प्रदेशातील गोरखपूर येथे सरस्वती शिशु मंदिर योजनेचा श्री गणेशा केला. श्री गुरुजींनी आपल्या उद्-बोधनात सांगितले की-प्रचलित शिक्षण प्रणाली मध्ये धर्मनीती, राष्ट्रभक्ती एवं मातृभूम िबद्दल अनन्य श्रद्धा आदि संस्कारांचा अभाव आहे. या त्रुटी भरून काढण्यासाठी त्यांनी संघ संस्कारांची विद्यालये सुरू केली. या दोन्ही संस्थांचे जाळे हळूहळू भारतभर पसरले. श्री गुरुजी सांगतात धर्म त्यालाच म्हणतात, ज्यामुळे समाजाची धारणा होते. त्यामुळे आपसात सामंजस्याची स्थिती निर्माण होते. श्री गुरुजी म्हणत चंदन, भस्मलेपन, देवता वंदन आणि देवता बंधन देखील आदी बाह्य उपकरणे म्हणजे धर्म नाही. किंवा विविध पंथ संप्रदाय पण धर्म नाही. धर्म परस्पर सहयोग व परस्पर पूरकता शिकवतो. धम र्मुळे व्यक्तीचा नैतिक विकास होतो आणि समाजाची सुव्यवस्था कायम राहते हे सत्य सदैव स्मरणात राहू द्या.

- क्रमशः

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# रेबीजचा धोका; दुग्ध व्यावसायिक, पशुपालकांनी काळजी घ्यावी

## लक्षणे दिसल्यानंतर उपचार अशक्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

पशुपालन आणि दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी रेबीजचा धोका वाढत चालला आहे. काही प्रकरणांमध्ये जनावरांना रेबीजचा संसर्ग झाल्याने त्यांचा मृत्यू झाल्याच्या घटना समोर येत आहेत. त्यामुळे दुग्ध व्यावसायिक आणि पशुपालकांनी योग्य काळजी घेण्याची गरज आहे. वेळेवर लसीकरण केल्यास जनावरांचे प्राण वाचू शकतात आणि संसर्ग पसरण्याचा धोका टाळता येतो.

रेबीज हा जीवघेणा आजार आहे. संक्रमित जनावराच्या लाळेमुळे, विशेषतः चावल्यास किंवा जखम झाल्यास हा विषाणू पसरतो. कुत्रा, मांजर, कोल्हा किंवा इतर भटकी जनावरे यांच्याद्वारे रेबीजचा संसर्ग होण्याची शक्यता असते. काही वेळा कुत्रा चावल्याचे लगेच जाणवत नाही. जखम लहान असल्यास किंवा जनावराच्या दाट केसांमध्ये असल्यास ती ओळखणे अवघड होते. कुत्रा चावल्याचे परिणाम लगेच दिसतात असे नाही. काही वेळा ५-६ वर्षांनंतरही लक्षणे दिसू शकतात. कुत्रा चावल्यानंतर पुढील २४ तासांत पहिली लस घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यानंतर तिसऱ्या दिवशी दुसरी लस घ्यावी. त्यानंतर सातव्या दिवशी तिसरी लस घ्यावी. त्यानंतर चौदाव्या दिवशी चौथी लस घ्यावी. शेवटी अठ्ठावीसाव्या दिवशी पाचवी लस घ्यावी. याशिवाय वर्षातून एकदा लसीकरण करून घेणेही आवश्यक आहे. संसर्गानंतर जनावरांच्या वर्तनात अचानक बदल होतो. तसेच भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थानिक प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.



### संसर्ग टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी

- जर कुत्रा चावला असेल किंवा संशय आला असेल तर २४ तासांत रेबीजविरोधी पहिली लस घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.
- रेबीज झालेल्या जनावराच्या संपर्कात आलेल्या सर्व जनावरांचे लसीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे.
- भटक्या कुत्र्यांपासून सावध राहा आणि पाळीव जनावरांना वेळच्या वेळी लसीकरण करा.
- जर जनावराला चावा बसला असेल किंवा जखम झाली असेल, तर त्वरित पशुवैद्यकांचा सल्ला घ्या.
- जनावरांमध्ये लक्षणे दिसल्यास इतर जनावरांपासून वेगळे ठेवा.

माझ्या गाईला रेबीज संसर्ग झाला होता आणि अवघ्या काही तासांतच ती दगावली. त्यामुळे इतर जनावरांचे वेळीच लसीकरण करणे सुरू केले आहे. इतर शेतकऱ्यांनीही आपल्या जनावरांना वेळेवर लस द्यावी आणि सतर्क राहावे. **- ज्ञानेश्वर जवळकोटे,** पशुपालक

कुत्रा चावल्यानंतर होणारा संसर्ग हा मेंदूशी संबंधित आहे. लक्षणे दिसल्यानंतर उपचार करणे शक्य नसते. त्यामुळे जनावरांना वेळेवर लसीकरण करणे आणि कुत्रा चावल्यानंतर डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. **- डॉ. प्रणाली क्षीरसागर,** पशुधन विकास अधिकारी



## न्यू हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय आदर्श शाळा पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**उत्तर सोलापूर, दि. १० मार्च-**

सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक पतसंस्थेच्या वतीने वडाळा येथील श्री भारत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू हायस्कूल वडाळा व कनिष्ठ महाविद्यालयाला आदर्श शाळा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

पतसंस्थेच्या वतीने प्रत्येक तालुक्यातून एका शाळेला हा पुरस्कार देण्यात आला. त्यात शाळेने वर्षभर गुणवत्तावाढीसाठी केलेले प्रयत्न, अभिनव उपक्रम यांचे मूल्यमापन करुन पुरस्कारासाठी शाळांचे मानांकन करण्यात आले. रविवारी सोलापुरातील हुतात्मा स्मृती मंदिरात हा पुरस्कार वितरण सोहळा झाला. माजी आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते प्राचार्या डॉ. वैशाली साठे यांना पुरस्कार देण्यात आला. पतसंस्थेचे चेअरमन राजेंद्र माळी अध्यक्षस्थानी होते. व्हाईस चेअरमन विद्या पाटील, संचालक सुरेश गुंड, समाधान घाडगे, शिवाजी शिंदे, दत्तात्रय कदम, तात्यासाहेब काटकर, मारुती गायकवाड, संभाजी चव्हाण, शिवाजी थिटे कैलास देशमुख, सुभाष भिमनवरु, नवनाथ मोहोळकर, जवानसिंग रजपुत, सुप्रिया पांगळ, नामदेव आलदर, शंकर वडणे उपस्थित होते. प्रस्ताविक संचालक तात्यासाहेब काटकर, सूत्रसंचालन बालाजी शिंदे यांनी केले. संचालक संभाजी चव्हाण यांनी आभार मानले.


## संक्षिप्त वृत्त



### जिजाऊ स्कूलच्या वतीने महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी

**बार्शी, दि. १० मार्च-**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून जिजाऊ प्रि स्कूल बार्शीच्यावतीने महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात महिलांच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक आरोग्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गौरी गायकवाड (एम.डी., स्त्रीरोग तज्ञ) होत्या. तसेच, प्रमुख मार्गदर्शक म्हणून आश्लेषा दिवेकर (झोनल हेड, पश्चिम महाराष्ट्र) आणि डॉ. पल्लवी तांबारे (संचालिका, येडाई व्यसनमुक्ती केंद्र, येरमाळा) उपस्थित होत्या. महिलांच्या आरोग्याची दखल घेत विविध चाचण्यांचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात १२० पेक्षा अधिक महिलांनी सहभाग घेतला. कार्यक्रमास रवी क्लासेसचे संचालक मधुकर डोईफोडे, सोलापूर जिल्हा आटपट्या असोसिएशनचे अध्यक्ष बाबासाहेब कापसे, जिजाऊ संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संभाजी घाडगे, सचिव वर्षा घाडगे, प्रशासकीय अधिकारी किशोर कदम, प्राचार्य संदेश कदम, फिजिकल कोच जे.बी. शिंदे उपस्थित होते. सूत्रसंचालन सुवर्णा देवकर आणि मनीषा मोठे यांनी केले तर आभार दैवशाल दास यांनी केले.



### अन्नछत्र मंडळाच्या वतीने राष्ट्रीय मंत्री राम चौधरी यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. ९ मार्च -**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली धार्मिकते बरोबरच न्यास क्रीडाला देखील महत्व देणारे राज्यातच एकमेव असल्याचे मनोगत अखिल भारतीय क्रीडा भारती संघाचे राष्ट्रीय महामंत्री राम चौधरी यांनी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहपरिवार आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत क्रीडाभारतीचे ज्ञानेश्वर मॅकल, अभिजित लोके, प्रकाश सोनटक्के, परमेश्वर व्हसुरे, प्रा. भीमराव साठे, संतोष वगाले, कल्याणी लकशेट्टी हे उपस्थित होते. याप्रसंगी मैनुद्दीन कोरबू, सरफराज शेख, न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, सौरभ मोरे अतिश पवार, गोटू माने, निखील पाटील, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, बाळासाहेब घाडगे, बाळासाहेब पोळ, प्रवीण घाडगे, संभाजीराव पवार, सागर पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, गोविंदराव शिंदे, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, धनंजय निंबाळकर, मुन्ना कोल्हे, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, महांतेश स्वामी, शिव स्वामी, प्रकाश लोंढे, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, विशाल घाडगे, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.



### ३२ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**मोहोळ, दि. १० मार्च-**

जागतिक महिला दिना निमित्त पंचशील मंडळाचे वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात आदर्श कर्तुत्ववान अशा ३२ महिलांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष आण्णासाहेब भालशंकर होते. यावेळी डॉ. अहिल्या गायकवाड, उद्योजिका संगीता फाटे, यशोदा कांबळे, दिलिप गायकवाड, पँथर नेते कुमार ढवळे मंडळाचे अध्यक्ष शशीकांत ठोकळे आदी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते महिलांना सन्मानित करण्यात आले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. अशोक पाचकुडवे यांनी केले. सूत्रसंचालन सारिका नाईकनवरे यांनी केले तर आभार संजय आठवले यांनी मानले. यावेळी युवराज भोसले प्रकाश शिंदे, धनंजय आवारे, हणमंत भडकवाड, धनंजय जगताप, सुनील गायकवाड शर्मिला साबळे, आशा शिंदे, संघमित्रा सुरवसे, चीतारे, सामाजिक कार्यकर्त्या शोभा ससाने, सुवर्णा कांबळे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवाजी आवारे, सुरज पाचकुडवे, संदीप सोनवणे, प्रशांत पाचकुडवे, दीपक मडिखांबे आदींनी परिश्रम घेतले.

### मालवाहतूक करणाऱ्या ट्रकला पिकअपने दिली धडक

**मंगळवेढा, दि. १० मार्च -**

मंगळवेढा ते उमदी मार्गावर मालट्रकला पिकअपने भरधाव वेगात येवून जोराची धडक दिल्याने ट्रकचे मोठ्या प्रमाणात नुकसान केल्या प्रकरणी पिकअप चालक अविनाश खेमू राठोड (रा.हगलूर जि.विजयपूर) याच्या विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. दि. ६ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता यातील फिर्यादी बिरा उर्फ बलबीर सौदागर (रा.चिकोडी जि.बेळगाव) हे बारा टायर मालवाहतूक ट्रक क्रमांक एम.एच.४२ वाय ६७६१ हा कर्नाटक येथून तांदूळ घेवून मुंबई येथे खाली करण्यास घेवून जात असताना रात्री १२.१५ वाजता मरवडे शिवारातून उमदीकडे जाणार्या रस्त्यावर समोरुन येणार्या महिंद्रा कंपनीचा माल वाहतूक पिकअप के.ए.२८ ए.बी.३०७५ वरील आरोपी चालकाने भरधाव वेगात येवून ट्रकचे डावे बाजूस जोराची धडक देवून ट्रकचे नुकसानीस व स्वत: जखमी होण्यास कारणीभूत ठरला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## कर्मवीर प्रज्ञा शोध परीक्षेचे बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० मार्च -**

येथील यशवंतराव चव्हाण मध्यवर्ती ग्रंथालयात केटीएस परीक्षेचे बक्षीस वितरण करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे खजिनदार व सांस्कृतिक विभागप्रमुख बापूसाहेब शितोळे तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवशक्ती बँकेचे संचालक प्रफुल्ल गाढवे उपस्थित होते. शितोळे म्हणाले की, सध्याचे युग हे स्पर्धेचे असून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी कर्मवीर प्रज्ञा शोध परीक्षा ही यशाची संधी उपलब्ध करुन देणारी पहिली पायरी आहे, असे ते म्हणाले. गाढवे सर यांनी शालेय स्तरावर होणाऱ्या अशा विविध स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून विविध क्षेत्रांत करिअर करावे, असे मत व्यक्त केले. याप्रसंगी प्रा.डॉ. राहुल पालके यांचा नेट व सेट परीक्षेत यश मिळविल्याबद्दल बापूसाहेब शितोळे यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.



या परीक्षेचा संस्थांतर्गत संकलित निकाल पुढीलप्रमाणे : प्रथम, द्वितीय, तृतीय अनुक्रमे : इयत्ता पहिली - वेदांगी केळे, राघव कुंभारे, तनया गपाट. इयत्ता दुसरी- श्रीवर्धन पाटील, ज्ञानेश जाधव, राजनंदन करडे. इयत्ता तीसरी हर्ष डोंगळे, सर्वज्ञ साळुंखे, रुद्र शिंदे. इयत्ता चौथी वेदांत अंधारे, श्लोक म्हेत्रे, राघव जगदाळे. इयत्ता पाचवी शिवांश गोरे, श्रीशैल घाडगे, सम्राट सरवदे. इयत्ता सहावी- श्रीअंश हुबळीकर, श्रध्दा डोके, विनित चोबे, इयत्ता सावती- राघव मुंढे, सुदिक्षा पाटील राहुल, सानिका मुसळे, इयत्ता आठवी- प्रणिती बारंगुळे, श्रावणी गवळी, राज मोर. इयत्ता नववी- गौरी डिसले, सुप्रिया गिराम, श्रद्धा वराळे. इ. १० वी- भक्ती गुंड, ध्रुव पत्की, पूनम जुनवणकर. इ. ११ वी १२ वी- तुषार हनपुडे, सम्राज्ञी बडवे, सिध्दी निकम. महाविद्यालयीन गट सार्थक गवळी, रणजित लोंढे, मंजूषा पाटील. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी.वाय यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव ए.पी. देबडवार यांनी अभिनंदन केले. या बक्षीसांचे प्रायोजकत्व शिवशक्ती बँक, बार्शीने यांच्याकडे होते. श्री. राऊत, श्री.शिखरे, श्री. चव्हाण, महामुनी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. एम.आर. राऊत, श्री उमेश क्षीरसागर, राजेश भोसले, अर्जुन सुतार, ए. ए. शेंडगे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एच.डी. काळे यांनी केले तर सूत्रसंचालन आनंद कसबे यांनी केले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

## सरपंच देशमुखांच्या हत्येच्या निषेधार्थ करकंब कडकडीत बंद

- व्यापारी, नागरिकांचा शंभर टक्के प्रतिसाद;
- हत्येचा खटला जलदगती न्यायालयात चालवण्यात यावा

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १० मार्च-**

करकंब ता.पंढरपूर येथे मस्साजोग ता.केज येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला तीन महिने झालेतरी अद्याप एक आरोपी फरार आहे.इतर आरोपीसह मुख्य आरोपी वाल्मिक कराडला फाशीची शिक्षा द्यावी,महादेव मुंडे व सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येचा खटला जलतगती न्यायालयात चालवून आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी इत्यादी मागन्यांसाठी करकंब येथे कडकडीत बंद पळून निषेध व्यक्त करण्यात आला.

करकंब गाव बंदबाबत दि.८ रोजी सर्व ग्रामस्थांच्या वतीने करकंब पोलिसांना निवेदन देण्यात आले होते.त्याप्रमाणे अत्यावश्यक सेवा वगळता गावकऱ्यांनी कडकडीत बंद पाळून निषेध व्यक्त करीत पाठिंबा दर्शविला.संतोष देशमुख यांच्या हत्येच्या वेळचे फोटो व व्हिडिओ आरोपींनी समाजमाध्यमातून व्हायरल केले होते.या घटनेचे दोषारोपपत्र एसआयटीने न्यायालयात दाखल केल्यानंतर सदर फोटो सर्वत्र माध्यमातून दाखवण्यात आले.यावेळी संपूर्ण राज्यात हत्येचे फोटो पाहून हळहळ व्यक्त केली जात आहे. अनेकांना अश्रू अनावर होत आहेत.त्यामुळे एवढ्या क्रूरतेने हत्या करणाऱ्या आरोपींना लवकरात लवकर फाशीची शिक्षा देऊन वाल्मिक कराड यांचे निकटवर्तीय असलेले धनंजय मुंडे यांनाही सहआरोपी करण्याची मागणी आता राज्यभरातून जोर धरू लागली आहे.करकंब गावातील व्यापारी,नागरिक यांनी बंदला शंभर टक्के उत्स्फूर्त प्रतिसाद देत दिवसभर गाव बंद ठेवून घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला.



## शिक्षकांच्या संस्कारामुळे शिक्षकांबद्दल आत्मीयता

### उपजिल्हाधिकारी अंजली मरोड; दक्षिण तालुका प्राथमिक शिक्षक संघाकडून महिलांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० मार्च-**

प्राथमिक शिक्षकांच्या संस्कारातूनच घडल्यामुळे शिक्षकांबद्दल आजही आत्मीयता असल्याचे प्रतिपादन उपजिल्हाधिकारी अंजली मरोड यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त दक्षिण सोलापूर तालुका प्राथमिक शिक्षक संघ व महिला आघाडी यांच्या वतीने घेण्यात आलेल्या महिला मेळाव्यामध्ये उपजिल्हाधिकारी अंजली मरोड बोलत होत्या. अध्यक्षस्थानी शिक्षक संघाचे माजी राज्य अध्यक्ष तथा राज्य सल्लागार बाळासाहेब काळे होते. तर शिवानंद भरले यांची प्रमुख उपस्थित होते. यावेळी माजी जि. प. सदस्य अशोक देवकते, ज्येष्ठ नेते उत्तमराव जमदाडे, शिक्षण विस्तार अधिकारी गुरुबाळ सनके, अध्यक्ष विरभद्र यादवाड, सरस्वती भालके, अंबुताई इतापे, रामभाऊ यादव, राजकुमार बिज्जरगी, सिद्राम कटगेरी, रेवणसिद्ध हत्तुरे, काळप्पा सुतार, सुभाष फुलारी, नारायण घेरडे, गजेंद्र भालके, बसवराज खिलारी, सिद्रया कोळी, पुंडलिक कलखांबकर,काशिनाथ विजापूरे, मंजुनाथ भतगुणकी, बालाजी गुरव, मल्लिनाथ पाटील, सतीश वाले आदी उपस्थित होते.



दक्षिण सोलापूर तालुका प्राथमिक शिक्षक संघाकडून १६ महिलांचा राजमाता जिजाऊ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते आकर्षक ट्रॉफी, प्रमाणपत्र,शाल व बुके देऊन राजमाता जिजाऊ पुरस्कार प्राप्त भगिनींना गौरवण्यात आले. लकी ड्रॉ चा यावर्षीचा विशेष असा सोन्याची नथ मिळविण्याचा मान अश्विनी वाघमोडे यांना मिळाले. दक्षिण सोलापूर तालुका शिक्षक संघाचे अध्यक्ष महिबूबसाब सवार यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन अंजली जमखंडीकर यांनी केले तर आभार सरचिटणीस अपेक्षा रणदिवे यांनी मानले.

## सांगोल्यात राज्यस्तरीय वारकरी संमेलन उत्साहात

### अखिल भाविक वारकरी मंडळाच्या वतीने आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १० मार्च-**

सांगोल्यात पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मृतीभवन येथे अखिल भाविक वारकरी मंडळाचे पहिले राज्यस्तरीय वारकरी संमेलन संपन्न झाले. संमेलनाची सुरुवात अंबिकादेवी मंदिर चौक ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती भवन पर्यंत ग्रंथदिंडी, पालखी काढून करण्यात आली. कार्यक्रमस्थळी विठ्ठल रुक्मिणी प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन प्रमुख वारकरी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री.संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान आळंदीचे प्रमुख विश्वस्त हभप निरंजननाथ योगीजी महाराज, संमेलनाचे अध्यक्ष श्री. संत नामदेव महाराज यांचे वंशज हभप माधव महाराज नामदास, प्रमुख अतिथी गोपाळअण्णा वासकर महाराज, अखिल भारतीय वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुधाकर इंगळे महाराज, हभप. नामदेव चवरे महाराज, आध्यात्मिक आघाडी शिवसेना प्रदेशाध्यक्ष हभप.अक्षय भोसले महाराज, प्रदेशाध्यक्ष हभप.जोतीराम चांगभले महाराज, जिल्हाध्यक्ष हभप ज्ञानेश्वर भगरे महाराज, जिल्हा उपाध्यक्ष हभप बिरा बंडगर महाराज माजी आ. दीपकआबा साळुंखे पाटील उपस्थित होते.

वारकरी संप्रदायाची परंपरा शंकरापासून तसेच नाथ संप्रदायापासून सुरू झाली आहे. संताकडे शब्दाची संपत्ती असते. महाराष्ट्र भूमीत चार संप्रदाय आहेत. वारकरी संप्रदाय हा जीवनात आनंद देणारा आहे. गाथेचे वाचन सर्वात प्रथम पांडुरंगाने केले आहे. रामकृष्ण हरी हा वारकरी संप्रदायाचा मंत्र आहे. वारकरी संप्रदायाची परंपरा यापुढेही अखंडपणे चालत राहणार आहे असे विचार हभप निरंजननाथ योगीजी महाराज यांनी यावेळी व्यक्त केले. इंगळे महाराज यांनी वारकरी संप्रदायाविषयी महत्वपूर्ण माहिती दिली. पार्वती अवताडे यांनी वारकरी संमेलनात महिला भाविक वारकऱ्यांचा मोठा सहभाग असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. भारुडकार चंदाताई तिवाडी, भोसले महाराज आदी वारकऱ्यांनी मनोगत व्यक्त केले. दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी जवळा येथे आध्यात्मिक नगरी उभा करण्याचा संकल्प जाहीर केला. यावेळी इंगळे महाराज यांनी संमेलनाचे आयोजक माजी नगरसेवक सतीश सावंत यांची अखिल भारतीय वारकरी मंडळ पंढरपूर विभागाच्या उपाध्यक्षपदी निवड केली व त्यांचा सन्मान केला. संमेलनासाठी राज्यभरातील अनेक जिल्ह्यातून वारकरी उपस्थित होते.



### या संमेलनामध्ये घेण्यात आलेले ठराव

कलाकार मानधन समितीमध्ये प्रत्येक जिल्ह्यात भाविक वारकरी मंडळाचा एक प्रतिनिधी असावा, कलाकार मानधान निवड करताना ५० टक्के वारकरी असावेत, माघ वारीला आषाढी वारीप्रमाणे प्रत्येक दिंडीला मानधन सुरु करावे, प्रत्येक जिल्ह्यात एक वारकरी भवन उभे करावे, शालेय शिक्षणामध्ये संत वाङ:मय जास्त असावे, भाविक वारकरी मंडळ पदाधिकारी जिथं सप्ताह संयोजक असतील तिथं कीर्तनामध्ये इतर गीतांना बंदी असावी, वारकरी शिक्षण घेतलेल्या मुलांना शैक्षणिक प्रवेशासाठी ५ टक्के मार्क गृहीत धरावेत, महाराष्ट्रातील सर्व तीर्थक्षेत्रामध्ये मांस विक्री बंदी व दारू बंदी असावी, तीर्थक्षेत्राच्या ३ किमी. आत बंदी असावी.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# धर्मपुरीतील शिंदेमळा रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण

## माजी आमदार राम सातपुते यांच्या फंडातून या रस्त्याची मागणी पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १० मार्च-**

शिंदेमळा धर्मपूरी येथे डांबरीकरण रस्ता पूर्ण) धर्मपूरी ग्रामपंचायत हद्दीतील शिंदेमळा ही वस्ती अनेक वर्षापासून रस्त्यापासून वंचित होती कच्च्या रस्त्याने वाट काढत गेली कित्येक दशके या वस्तीतील ग्रामस्थ शाळकरी मुले ये जा करत होती भाजपा जिल्हा उपाध्यक्ष बाजीराव काटकर यांच्या प्रयत्नातून माजी आमदार राम सातपुते यांच्या निधीतून या रस्त्यासाठी सुमारे साठ लाख रुपये निधी मंजूर झाला.

> धर्मपुरीतील शिंदेमळा वस्तीला येणाऱ्या रस्त्याची कित्येक वर्ष खूपच बिकट अवस्था होती पावसाळ्यात तर खूपच रस्त्याने येता-जाता आमची आपदा होत होती परंतु माजी आ. राम सातपुते यांनी आपल्या फंडातून डांबरी रस्ता केल्याने आमच्या रस्त्याचा प्रश्न मिटवला.
>
> **- भाऊसाहेब शिंदे**





## संक्षिप्त वृत्त...



### गुळसडीत जिल्हा परिषद शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**करमाळा, दि. १० मार्च-**

करमाळा तालुक्यातील गुळसडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. यावेळी विद्यार्थ्यांनी त्यांची कला सादर करत समुहनृत्यांचे सादरीकरण केले.जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी शिक्षण विस्ताराधिकारी नितीन कदम, केंद्रप्रमुख राजकुमार खाडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष समाधान यादव, उपाध्यक्ष धनंजय भंडारे, बाजार समितीचे माजी उपसभापती दत्तात्रय अडसूळ, महावीर कळसे, पोलिस पाटील धनंजय अडसूळ, कृषी पर्यवेक्षक उमाकांत जाधव, सदस्य नारायण भोसले तसेच ग्रामपंचायत सदस्या सिंधू खंडागळे, संजीवनी यादव, रेश्मा कळसे, मुख्याध्यापिका प्रफुल्लता सातपुते, अंजली गायकवाड, अंजली निमकर, सुनिता माळी, मुख्याध्यापक सतीश कांबळे, शहाजी रंदवे, बलभीम बनसोडे, आबा बागल, अमोल टोणे, लक्ष्मण वाघमारे, अन्वर शेख, संतोष गाडे, उमेश माहुले, किशोरकुमार शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती. मुख्याध्यापिका मंजुषा आव्हाड, संगीता बिडगर, चंद्रहास शिंदे यांच्या नियोजनाखाली हा कार्यक्रम पार पडला. प्रास्ताविक मुख्याध्यापिका आव्हाड यांनी केले. सूत्रसंचालन राजकुमार खाडे यांनी केले. आभार शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष समाधान यादव यांनी मानले.



### विजयकृष्ण थोरातची राष्ट्रीय तिरंदाजी (आर्चरी) स्पर्धेसाठी निवड

**सदाशिवनगर, दि. १० मार्च-**

विजयकृष्ण थोरात याची २३ मार्च रोजी आंध्रप्रदेश (गुंटूर) येथे होणाऱ्या दहा वर्षाखालील वैयक्तिक प्रकार आणि महाराष्ट्र राज्याकडून सांघिक राष्ट्रीय तिरंदाजी (आर्चरी) स्पर्धेसाठी निवड झाली असून या निवडीबद्दल राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री .दत्तात्रय भरणे (मामा) यांनी सत्कार करून पुढील राष्ट्रीय सामान्यासाठी शुभेच्छा दिल्या. विजयकृष्ण थोरात हा सर्वसामान्य कुटूंबातून व ग्रामिण भागातील असून त्याच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. त्याचे प्रशिक्षक सुरज ढेंबरे , शेखर देवकर व निखिल गुरव यांचे वडील नवनाथ थोरात ,आई स्वाती थोरात, आजोबा डॉ. गजानन टिंगरे यांनी आभार मानून..विजयकृष्ण यशात प्रशिक्षकांचा मोलाचा वाटा असल्याचे सांगितले.

### ननवरे यांची डिजीटल मिडिया परिषदेच्या उपाध्यक्षपदी निवड

**बार्शी, दि. १० मार्च-**



डिजिटल मीडिया पत्रकारिता क्षेत्रातील सक्रीय आणि प्रभावी नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या माझा न्यूज चे संपादक विनोद ननवरे यांची मराठी परिषद संलग्न डिजिटल मीडिया परिषदेच्या सोलापूर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. ही निवड प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली आणि संस्थापक एस. एम. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या बैठकीत करण्यात आली. यावेळी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी बोलताना प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी सांगितले की, डिजिटल मीडिया पत्रकारांवरील अन्याय आणि हल्ल्यांविरोधात संघटना सतत लढा देणार आहे. तसेच डिजिटल पत्रकारांना अधिस्वीकृती मिळावी यासाठी प्रयत्न सुरू असतील.

### कलाकार सोनकांबळे यांची आयटीआय व्यवस्थापन समितीच्या शासकीय सदस्यपदी निवड

**अक्कलकोट दि. १० मार्च-**



श्री स्वामी समर्थ औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटी आय) चे व्यवस्थापन समितीवर गोगांवचे उपसरपंच कलाकार सोनकांबळे यांची शासकीय सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. कलाकार सोनकांबळे हे आ. सचिन कल्याणशेट्टी यांचे समर्थक असून म. रा. मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष आहेत. कमलाकर सोनकांबळे यांच्या निवडी बददल आ. सचिन कल्याणशेट्टी, नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, सागर कल्याणशेट्टी, संतोष गायकवाड, सरपंच वनिता मधुकर सुरवसे, युवा उद्योजक मधुकर सुरवसे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वासराव अरोटे, प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गटाचे तालुकाध्यक्ष अविनाश मंडीखांबे, सरपंच संघटनेचे तालुका अध्यक्ष प्रदीप जगताप, एस. एस. शेळके प्रशाला व ज्युनियर कॉलेजचे चेअरमन बसवराज शेळके, आनंद तानवडे, महेश गायकवाड यांनी अभिनंदन केले.

# विठ्ठल दर्शन बंद की दर्शनाच्या वेळेत बदल; आज निर्णय

## जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीकडे भाविकांचे लक्ष

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि. १० मार्च-**

विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचे संवर्धन आणि सुशोभीकरणाचे काम आषाढी यात्रेच्या अगोदर पुर्ण व्हावे यासाठी येत्या काळात मंदिर काही काळ बंद ठेवावे? की दर्शनाच्या वेळेत बदल करावा? या बाबतचा निर्णय घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती व सल्लागार समितीच्या खास बैठकीचे आयोजन केलेले आहे. ही बैठक मंगळवारी (ता.११) येथील भक्त निवासामध्ये आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे विठ्ठल दर्शनाबाबत या बैठकीमध्ये काय निर्णय घेतला जातोय याकडे राज्यातील तमाम विठ्ठलभक्तांचे लक्ष लागलेले आहे.

विठ्ठल-रुक्मिणी मंदिर हे अत्यंत पुरातन असल्यामुळे त्याचे जतन आणि संवर्धनाचे काम राज्य शासनाकडून हाती घेण्यात आलेले आहे. त्यासाठी सुमारे दीडशे कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. त्या पैकी पहिल्या टप्प्यासाठी सुमारे ७३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. या ७३ कोटी रुपयांच्या निधी मध्ये पहिल्या टप्प्यात मंदिराच्या जिर्णोध्दाराचे काम हाती घेण्यात आलेले आहे.



गेल्या वर्षी पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली या कामास प्रारंभ झालेला आहे. हे काम सुरु झाल्यावर मंदिरातील मुख्य गर्भगृहाच्या कामासाठी म्हणून विठ्ठल मंदिर काही काळ बंद ठेवण्यात आलेले होते. त्या नंतर काही काळ विठ्ठल दर्शनाच्या वेळेत बदल करण्यात आलेला होता. मात्र भगवान विठ्ठल आणि त्याच्या वारकरी भक्तांमध्ये निमाण करण्यात आलेला दूरावा आता असाह्य झाला आहे. त्यामुळे मंदिर बंद बाबत विठ्ठल भक्तांच्या तसेच पंढरपूरवासियांच्या भावना तीव्र होत आहेत हे लक्षात येताच मंदिर पुन्हा भाविकांसाठी खुले करण्यात आले होते.

मात्र मंदिराच्या संवर्धनाच्या कामाने जशी गती घेणे अपेक्षीत होते त्या मानाने हे काम गती घेऊ शकले नाही. दरम्यान येत्या आषाढी यात्रेपूर्वी हे काम पूर्णत्वास जावून आषाढी एकादशीला विठ्ठलाच्या शासकीय महापुजेसाठी मुख्यमंत्री येथे आल्यावर त्यावेळेस मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मंदिराच्या कामाचे देखील उदघाटन करण्याचा जिल्हा प्रशासनाचा तसेच विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचा विचार आहे.

### मंदिर बंद झाल्यावर पंढरपूर होते ठप्प

विठ्ठल मंदिरावरच पंढरपूरातील अर्थचक्राचा गाडा सुरु असतो. येथील अनेकांचे अर्थार्जन हे थेट विठ्ठल मंदिराशी निगडीत आहे. शहरातील हजारो नागरिक विठ्ठल दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना विविध सेवासुविधा पुरवून आपली उपजिविका भागवित असतात. त्यामुळे विठ्ठल मंदिर काही काळ भाविकांसाठी बंद करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला तर पुन्हा एकदा पंढरपूर ठप्प होईल. अनेकांच्या रोजीरोटीचा प्रश्न निर्माण होईल अशी भिती व्यापारी वर्गातून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे विठ्ठल मंदिर पुन्हा काही काळ भाविकांसाठी बंद केले जाते की दर्शन वेळेत बदल करुन सकाळच्या सत्रातच फक्त विठ्ठल दर्शन सुरु ठेवले जाते या बाबतचा निर्णय बैठकीत होणे अपेक्षित आहे.

### मंदिराच्या संवर्धनाचे काम देखील पूर्ण होणे महत्वाचे

राज्य शासनाकडून हाती घेण्यात आलेले मंदिराच्या संवर्धनाचे काम देखील वेळेत पुर्ण होणे गरजेचे आहे. संपुर्ण संवर्धनाचे आणि सुशोभीकरणाचे काम हे दोन, तीन टप्प्यात होणार आहे. सध्या पहिल्या टप्प्यातील काम सुरु आहे. हेच काम ऐवढे लांबल्यामुळे पुढील टप्प्यातील कामे कधी होणार असा देखील जिल्हा प्रशासन तसेच मंदिर समिती आणि मंदिर प्रशासना पुढे यक्षप्रश्न आहे. त्यामुळे आत्ताच ठोस निर्णय घेऊन पहिला टप्पा लवकरात लवकर पुर्ण करणे गरजेचे असल्याचे मत जिल्हा प्रशासनातील आधिकाऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

### भाविकांची वर्दळ असताना काम करण्यात येतात अडचणी

पहाटे चारच्या सुमारास विठ्ठल मंदिर उघडले जाते. त्या नंतर मंदिरातील नित्योपचार किंवा राजोपचारास दिवसभर सुरु असतात. नित्योपचार किंवा राजोपचारासाठी काही काळ दर्शन बंद केले जाते. इतरत्र नाही असे विठ्ठलरखुमाईचे पदस्पर्श दर्शन केवळ पंढरपूरातच असल्यामुळे विठ्ठल दर्शनाला महत्व आहे. विठ्ठलरखुमाईच्या दर्शनासाठी दिवसभर भाविकांची मंदिरात थेट वर्दळ असते. त्यामुळे मंदिरातील संवर्धनाचे काम पार पाडताना भाविकांच्या सुरक्षेला देखील प्राधान्य द्यावे लागते आहे. यासाठी भाविकांची सुरक्षा आणि मंदिरातील जिर्णोध्दाराचे काम यांची सांगड घालत कामे पुर्ण करणे सध्याच्या परिस्थितीत अडचणीचे होते आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत सर्वानुमते कोणता निर्णय घेतला जातो आहे हे महत्वाचे असणार आहे.

# जाधववाडीच्या शेतकऱ्यांनी मजुरावर काढला पर्याय

## ट्रॅक्टरमध्ये खत भरण्यासाठी बसविले बकेट

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. १० मार्च-**

जाधववाडी ता माळशिरस येथील शेतकरी रणजित मनोहर गायकवाड यांनी शेती बरोबरच शेणखत वाहतुकीचे काम करीत असून खत भरण्यासाठी मजुराचा वापर करीत होते परंतु सध्या मजुरांचा प्रश्न मोठा असून त्यांची मजुरीही परवडत नसल्याने खत वाहतूक करणाऱ्या ट्रक्टरलाच बकेट बसविल्याने तसेच ट्रेलरलाहि हायड्रोलिक बसविल्याने मजुराचा खर्च व वेळ वाचू लागला आहे.

ट्रक्टर मध्ये खत भरण्यास व उतरविण्यास १२०० रुपये असून एवढी मजुरी देऊनही वेळेवर मजूर मिळत नसल्याने हा व्यवसाय करण्यास अनेक अडचणी येत होत्या .यावर उपाय म्हणून या वाहतुकीस असणाऱ्या ट्रक्टरच्या हायड्रोलिकलाच बकेट बसवून घेतले त्यामुळे खत भरण्यास मजुराची आवशकता राहिली नाही त्याच बरोबर खत वाहतूक करणाऱ्या ट्रॉलीला हायड्रोलिक बसविल्यामुळे खत उतरविण्यासहि मजूर लागत नाही .ट्रक्टर चालकच हे सर्व काम करीत असल्याने मजुराचा खर्च कमी झाला तसेच मजुराकडून खत भरण्यासहि वेळ लागत होता तो कमी झाला आहे.त्यामुळे खत भरण्याचा वेळ व मजुरासाठी लागणाऱ्या पैशाची बचत होत आहे. त्यासाठी त्यांना २७ हजार रुपये खर्च आला.



> ट्रक्टरला बकेट व ट्रॉलीला हायड्रोलिक बसविल्यामुळे वेळेचा ,पैशाचा,मजुराचा प्रश्न मिटला असून एकच व्यक्ती सर्व काम करू लागल्याने खर्चात बचत झाली आहे.
>
> **- रणजित मनोहर गायकवाड,**
> रा.जाधववाडी ता माळशिरस




### बणजगोळ येथे स्व. देशमुखांच्या हत्येच्या निषेधार्थ कॅन्डल मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० मार्च-**

मस्साजोगचे सरपंच स्व संतोष देशमुख यांच्या हत्येचा निषेध व्यक्त करीत सकल मराठा समाज बणजगोळ यांच्या वतीने आरोपीना फाशी झाली पाहिजे या करिता कॅन्डल मोर्चा काढण्यात आला. याप्रसंगी शिवधर्म फाउंडेशनचे दत्ता मातोळे, माजी सरपंच राम मातोळे पोलीस पाटील अमोल पाटील, उमेश पाटील, बिट हवालदार सुरवसे, तुषार शिंदे, सरपंच गाडेप्पा व्हसुरे उपसरपंच माणिक चव्हाण, स्वप्नील पाटील, कालिदास पाटील, विस्वास मतोळे, महादेव चव्हाण, रोहित मातोळे, निळू मातोळे, मंगेश चव्हाण, दादा मोरे, दादा शिंदे, अरुण कुंभार, सागर मातोळे, वैभव मातोळे, तानाजी मोरे उपस्थित होते.

# स्वन्ने वस्ती शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि. १० मार्च-**

कंदलगाव येथील स्वन्ने वस्ती जिल्हा परिषद शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. सरपंच शारदा कडते यांच्या हस्ते स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी विस्ताराधिकारी गुरुबाळा सनके, केंद्र प्रमुख आमसिद्ध बिराजदार,शिक्षक संघाचे नेते म.ज. मोरे, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ जोकारे, प्रकाश कोरे, संजय कोले , हणमंत सलगरे, धनेश कडते, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष कैलास उडाणशिव, भारतीय सैन्य दलाचे जवान महादेव उंबरजे,,मुख्याध्यापक संजय कोरे, भिमराव परिक्षाळे सोमनाथ साळुंखे उपस्थित होते. मुख्याध्यापक पंडित साबा व शिक्षिका शांता बोलदे यांच्या मार्गदर्शनाखाली वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम पार पडला. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी या सांस्कृतिक कार्यक्रमादरम्यान महापुरुषांच्या वेशभूषेसह, देशभक्तीपर गीत, नाटक, लावणी, सामाजिक जनजागृती पथनाट्यसह आपला अभिनय सादर करत उपस्थित पालक व गावकऱ्यांची मने जिंकली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते हनुमंत सलगरे व रमेश पारशेट्टी यांच्यातर्फे शाळेला स्मार्ट टीव्ही भेट देण्यात आले.



कार्यक्रमाचे खास आकर्षण दोन कुपनद्वारे भाग्यवान महिला विजेत्यास एक साडी तर पुरुषांसाठी एक घड्याळ भेट देण्यात आले.

# मोडनिंब येथे श्री संभाजी सूर्यहृदय श्लोकाचे वाचन

## छत्रपती श्री संभाजी महाराज बलिदान मासनिमित्त आदरांजली

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १० मार्च-**

धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज बलिदान मास निमित्त मोडनिंब (ता.माढा) सकल हिंदू समाजाच्या वतीने येथे २८ फेब्रुवारी ते २९ मार्च, फाल्गुन शुद्ध प्रतिपदा ते फाल्गुन अमावस्यापर्यंत धर्मवीर बलिदान मास साजरा करून छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाचे स्मरण व आदरांजली वाहिली जात आहे. बलिदान मासात रोज सायंकाळी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे नित्य पूजन व स्मरण करण्यात येणार आहे. युवकांनी सामूहिक मुंडण करून संभाजी महाराज यांना आदरांजली वाहिली आहे. छत्रपती संभाजी महाराज यांचा धगधगता इतिहास आहे. छत्रपती श्री संभाजी महाराज मृत्युच्या दिशेने बलिदानाच्या मार्गावर पुर्ण महिनाभर अति धीरोदत्तपणे देहत्याग करीत होते. त्यामुळेच छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान, त्यांनी सहन केलेल्या मरणयातना याची प्रत्येक हिंदू मनाला जाणीव होण्यासाठीच समस्त शिवशंभू पाईकांकडून हा बलिदान मास पाळण्यात येत आहे.

### असा पाळला जातोय बलिदान मास

लहानासह युवकांपैकी अनेकांनी वेगवेगळ्या प्रकारे बलिदान मास पाळण्याचा नियम केला आहे. यामध्ये काही तरुणांनी दिवसातून एक वेळा जेवण करणे, काहींनी चप्पल वापरणे बंद केले, काहींनी मुंडण केले, काही युवकांनी मिष्ठान्न तसेच गोड खाणे तर काहींनी मांसाहार बंद केला आहे.



छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या प्रतिमेसमोर ग्रामपंचायत कार्यालया समोरील प्रांगणात जवळपास दररोज ६० ते ७० युवक नित्यनियमाने उपस्थीत असतात.कार्यक्रमाची सुरवातीस प्रेरणा मंत्र म्हटला जातो. श्री संभाजी सूर्यहृदय श्लोकाचे वाचन करून याचा अर्थ सांगितला जातो. ध्येय मंत्र व प्रतिज्ञेने सांगता होते.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## परंड्यात ज्वारी, गहु काढणीला प्रारंभ; मजूरांचा तुटवडा

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१० मार्च -**

परंडा तालुक्यात रब्बी हंगामातील ज्वारी गहू काढणीला प्रारंभ झाला असून या काढणीसाठी मजूर मिळत नसल्याने शेतकऱ्यासमोर मोठे संकट उभे टाकले आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग चिंताग्रस्त झाला आहे.

काढणीसाठी आलेल्या पिकांची काढणी वेळेवर काढली नाहीत तर उत्पादन घटनेची चिन्हे दिसत आहेत. सध्या मजुरीचे दर



गगनाला भीडले आहेत. वाढलेली मजुरी आणिमजुराची टंचाई यामुळे शेतकरी हैराण झाले आहेत. तर बाजारात शेतकऱ्यांचा माल विक्रीसाठी आला तर त्या मालाला भाव योग्य मिळत नसल्याने सध्या शेती व्यवसाय डबघाईला आला आहे. शेती व्यवसाय तोट्यात आला असल्याचे शेतकरी सांगत आहेत. तालुक्यात सध्या स्थितीत शेतात काम करण्यासाठी मजुर मिळत नसल्याने पुढील काळात शेती पडीक ठेवण्याची वेळ शेतकरी वर्गावर येते की काय अशी परिस्थिती सध्या तरी जाणवत आहे.

शेतात झालेला खर्च ही निघत नसल्याचे शेतकऱ्यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### महिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने महिला दिन

**लोहारा, दि.१० मार्च -**

दि.८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त लोहारा तालुक्यातील कानेगाव येथे महिला बहूउददेशिय केंद्र येथे जागतिक महिला दिनानिमित्त सामाजिक कार्य करणाऱ्या व विविध क्षेत्रातील महिलांचा यथोचित सन्मान करण्यात आले. दि.८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून गोरे ग्रामविकास अधिकारी कानेगांव व आशा कदम सरपंच कानेगांव उपस्थित होते. यावेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते महिलांचा यथोचित सन्मान करण्यात आले तर उपस्थित मान्यवरांनी महिलांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी ताई नागरेकर, सारीका वाघमारे, गोकर्णा कदम, मंगल गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महिला बहूउददेशिय केंद्र कानेंगांव कर्मचारी प्रगती माने, तनुजा मोरे यांनी परिश्रम घेतले.

### उन्हाचा तडाखा लिंबू सरबतचा चटका

**तेरखेडा, दि.१० मार्च -**



राज्यात आता उन्हाळा वाढू लागला असून तीव्र झळा जाणवू लागल्या आहेत. दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. त्यामुळे वाशी शहराला उन्हाचे चटके लागण्यास सुरुवात झाली आहे. मात्र असे जरी असले तरी पहाटेच्या सुमारास मात्र तापमानात घट होऊन वातावरणात थोडासा गारटा निर्माण होत आहे. दिवसभर उन्हाचा तडाखा निर्माण झाल्याने नागरिकांचा ऊसाचा रस, कोल्ड्रिंक्स, ताक शेतपेयावर भर पडला आहे. परंतु उन्हाच्या तडाख्यात नागरिकांना लिंबू सरबतचा जास्त चटका लागलेला दिसत असून नागरिकांनी लिंबू सरबत पिण्याला जास्त भर दिला आहे.



### काँग्रेस कार्यालयात महिला दिन साजरा

**तुळजापूर, दि.१० मार्च -**

जागतिक महिला दिना निमित्त माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या संपर्क कार्यालयात महिलादिन साजरा करण्यात आला. राजमाता जिजाऊ आणि भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी तालुका सेवादल काँग्रेसचे अध्यक्ष तानाजीराव जाधव, आशपाक शेख, बबन जाधव उपस्थित होते.

### महिला दिनानिमित्त मोफत दंतरोग तपासणी

**लोहारा, दि.१० मार्च -**

लोहारा शहरातील सोमेश्वर मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटलच्या वतीने सामाजिक भावना जोपासत जागतिक महिला दिनानिमित्त लोहारा शहरात दि.८ मार्च रोजी महिलां व नागरिकांसाठी व बालकांसाठी मोफत दंत रोग तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी डॉ. मयुरी आम्लेश्र्वर गारठे यांनी ८० जणांची मोफत दंत तपासणी करण्यात आली. यावेळी डॉ. आम्लेश्र्वर गारठे, सोमनाथ माळी, गोविंद जाधव, मुकेश कदम, साहेबराव थोरात, ज्ञानेश्वर जाधव, कोमल ठेले, दिपाली परसे, भाग्यश्री कांबळे, यांच्यासह महिला, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी साजरी

**कळंब, दि.१० मार्च -**

शहरातील सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी दि.१० मार्च रोजी साजरी करण्यात आली. विद्यालयाचे मुख्याध्यापक तथाप्राचार्य काकासाहेब मुंडे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक सोमनाथ सावंत पर्यवेक्षक शंकर गोंदकर स्काऊट गाईड कॅप्टन प्रतिभा गांगर्डे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागाचे ज्ञानेश्वर तोडकर यांनी केले. तर आभार प्रदर्शन परमेश्वर मोरे यांनी मानले.

### गायरान धारकांची जनसंसद बैठक संपन्न

**कळंब, दि.१० मार्च -**

जागतिक महिला हक्क दिनानिमित्त कळंब पंचायत समिती येथे गायरान वहिती धारकांची मराठवाडा स्तरीय जनसंसद बैठक आयोजित करण्यात आली. मानवाधिकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भाई बजरंग ताटे आणि सचिव माया शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ही बैठक झाली.

अर्थसंकल्प : महायुती सरकारचा अर्थसंकल्प राज्याला सर्वांगाने लाभदायी असाच...

# जिल्ह्यातील चालू प्रकल्पांना निधी कमी पडणार नाही : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० मार्च -**



महायुती सरकारचा २०२५ चा अर्थसंकल्प आर्थिक शिस्त पाळत सर्वच घटकांचा विचार करून मांडलेला अर्थसंकल्प असून शेतकरी, महिला, वृद्ध, तरुण, प्रत्येक समाज, राज्यातील प्रत्येक भागाला न्याय अर्थसंकल्पाच्या माध्यमातून देण्यात आला आहे. व्यवसायपूरक वातावरण निर्माण करून उद्योगांना चालना देणे आणि रोजगार निर्मिती करणे,शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान वापर आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासोबतच आवास योजनेसाठी ५० हजार रुपये अतिरिक्त राज्य सरकार देणार आहे. यामुळे महाराष्ट्राला संतुलित करणारा हा अर्थसंकल्प आहे.

राज्यातील अपूर्ण असलेल्या सिंचन प्रकल्पांची कामे पूर्णत्वाकडे नेण्यासाठी नाबार्डच्या अर्थसहाय्यातुन निधी उपलब्ध करण्यात आला आहे. जिल्ह्यातील सिंचनासाठी महत्वपूर्ण असलेल्या कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या उर्वरित कामांना आता निधीची कमतरता भासणार नाही असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला. महायुती सरकारचा पुढील वर्षभराचा अर्थसंकल्प अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांनी सादर केला. त्यानंतर आमदार पाटील यांनी मराठवाडा आणि जिल्ह्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी हा अर्थसंकल्प मोठा लाभदायक असल्याचे नमूद करीत गोदावरी खोरे पुनर्भरण व मराठवाडा ग्रीडसाठी ३७ हजार ६६८ कोटींचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांच्या सहाय्याने राबवण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यामुळे मराठवाड्यातील दुष्काळी भूभागला नवसंजीवनी मिळणार असून दुष्काळमुक्तीच्या दिशेने आपल्या महायुती सरकारने आणखी एक महत्वाचे पाऊल उचलले असल्याचे त्यांनी नमूद केले. देशातील पहिला स्वतंत्र टेक्निकल टेक्स्टाईल पार्क एमआयडीसीच्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्यातील कौडगाव एमआयडीसीत उभारण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांसाठी २३ कोटी रुपयांचा निधी यापूर्वीच उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. आता राज्याला तांत्रिक वस्त्रोद्योगाचे जागतिक केंद्र म्हणून विकसित करण्याकरीता महाराष्ट्र टेक्निकल टेक्सटाईल मिशन ची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे कौडगाव येथील नियोजित टेक्निकल टेक्सटाईल पार्कला अधिकची गती मिळेल. आणि दहा हजार रोजगार निर्मितीची क्षमता असलेला हा प्रकल्प लवकरच पूर्णत्वास जाण्यासाठी मोठी मदत होणार आहे.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा - २ अंतर्गत सन २०२४ -२५ या आर्थिक वर्षासाठी राज्य शासनाने या योजनेच्या अनुदानात ५० हजार रुपयांची वाढ जाहीर केली आहे. त्यामुळे या योजनेसाठी पात्र असलेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. आणखी २४ लाख महिलांना लखपती करण्याचे उद्दीष्टही आपल्या महायुती सरकारने आजच्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून जाहीर केले आहे. बचतगटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात आता एक उमेद मॉल उभारण्यात येणार असल्याने राज्यातील लाखो महिलांना याचा फायदा होणार आहे. तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेकरीता एकूण ३६ हजार कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून १ हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली ३ हजार ५८२ गावे, १४ हजार किलोमीटर लांबीच्या सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याने प्रमुख जिल्हा मार्गांना, राज्य महामार्ग किंवा राष्ट्रीय महामार्गांना जोडली जाणार आहेत.

महायुती सरकारने जाहीर केलेल्या पर्यटन धोरणानुसार १० वर्षात पर्यटन क्षेत्रात १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. त्यामुळे धाराशिव जिल्ह्यात आपण पर्यटन वृद्धी आणि रोजगार निर्मितीच्या अनुषंगाने जे महत्वाचे प्रकल्प हाती घेतले आहेत त्याला आवश्यक निधी मुख्यमंत्री फडणवीस साहेबांच्या माध्यमातून उपलब्ध होणार असल्याने याला आता मोठी बळकटी मिळणार असल्याचा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

**विरोधकांची नाराजी...**

## दिलेल्या शब्दाला न पाळणार हे तर खोटारडे सरकार : खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० मार्च -**

निवडणुकीत दिलेल्या एका तरी आश्वासनाची पूर्तता या अर्थसंकल्पात या सरकारने केली का? सरकार फक्त जनतेला फसवत आहे. त्यामुळं हे तर खोटारडे सरकार आहे, अशी प्रतिक्रिया खा. ओमराजे निंबाळकर यांनी दिली आहे.



सगळ्यांना लाडकं म्हणत जशी मत मिळवली तस आपल्या शब्दाला हे सरकार जागलेलं नाही. लाडकी बहीणीचे २१०० रुपये केले का? शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊ म्हणालात आज त्यावर सरकार का बोलत नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस परवा सभागृहात बोलताना उद्धव ठाकरे नाही असं म्हणाले तुम्ही ठाकरे नाहीत म्हणूनच तुमच्यात शेतकऱ्यांप्रती प्रेम नाही. याच ठाकरेंनी पहिल्याच अधिवेशनात शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून दाखवल. त्याला वाघाचं काळीज लागत असा टोला खा. राजेनिंबाळकर यांनी लगावला. गेल्या अडीच वर्षांपासून या सरकारने जिल्ह्यातील कृष्णा मराठवाडा प्रकल्पास पुरेसा निधी दिला असता तर हा प्रकल्प पूर्ण झाला असता मात्र अद्यापही याकडे दुर्लक्ष केल्याचं दिसत आहे. उद्योगाच धोरण ठरत पण आमच्या जिल्ह्यात त्याचा काहीच उपयोग होत नाही, आताही कोणताही नवीन प्रयत्न या सरकारने इथला उद्योग वाढविण्यासाठी केलेला नाही. असा सर्व बाबतीत जिल्ह्यावर, मराठवाड्यावर व राज्यावर अन्याय करणारा हा अर्थसंकल्प असल्याच मत खा. राजेनिंबाळकर यांनी केला आहे.

## लबाडाचे आमंत्रण जेवल्याशिवाय खरे नाही : डॉ. प्रतापसिंह पाटील



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० मार्च -**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी राज्य सरकारच्या अर्थसंकल्पावर टीका करत हा अर्थसंकल्प केवळ घोषणांचा पोकळ बाजार असल्याचे म्हटले आहे. महायुतीने विधानसभा निवडणुकीपूर्वी मोठमोठ्या आश्वासनांचा पाऊस पाडला होता, मात्र उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात त्या आश्वासनांची कोणतीही तरतूद नाही, असा आरोप त्यांनी केला. प्रत्येक जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज आकांक्षा केंद्र स्थापन करून दहा लाख उद्योजक घडवण्याच्या घोषणेचीही अंमलबजावणी नाही. त्यामुळे तरुणांच्या हाताला काम मिळण्याचा प्रश्न अनुत्तरितच राहिला आहे.

शेतकऱ्यांसाठीही हा अर्थसंकल्प निराशाजनक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. ग्रामीण भागातील विकासासाठी ४५,००० गावांमध्ये पांदन रस्ते बांधण्याचे आश्वासन सरकारने दिले होते, मात्र त्याचीही कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

निवडणुकीपूर्वी मोठमोठ्या घोषणा करून सत्तेत आल्यावर त्यांचा विसर पडणे, हाच महायुतीचा अजेंडा असल्याचे सांगताना हा अर्थसंकल्प म्हणजे 'लबाडाचे आमंत्रण जेवल्याशिवाय खरे नाही' असे स्पष्ट मत डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी व्यक्त केले.

## लाडकी बहीण व लाडका शेतकरी अर्थसंकल्पात मात्र दोघेही गायब : आ. कैलास पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० मार्च -**

निवडणुकीपुरतं लाडकी बहीण, लाडका शेतकरी, लाडका भाऊ आता प्रत्यक्षात जेव्हा द्यायची वेळ आली तेव्हा हे तीनही घटक अर्थसंकल्पातुन गायब झाल्याचे दुर्देवी बाब आज दिसून आल्याचं आमदार कैलास पाटील यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना कर्जमुक्त करु म्हणणारे आज चकार शब्द बोलले नाहीत. लाडकी बहीणीला २१०० रुपये देण्याचं आश्वासन हवेतच विरलं आहे. लाडक्या भावाचा तर उल्लेख सुद्धा सरकारने केला नाही. त्यामुळं हे तीनही घटक फक्त निवडणुकीपुरते होते हे आता सिद्ध झाल्याचे आमदार कैलास पाटील यांनी म्हटले आहे.



पिकासाठी आवश्यक निविष्ठा खरेदी करताना राज्याचा जीएसटीतुन शेतकऱ्यांना सूट देणार असंही सांगण्यात आलं होत त्यावरही सरकार काहीच बोलल नाही. निवडणुकीत नुसत्या घोषणा करणाऱ्या सरकारच खरं रूप यनिमित्ताने समोर आल्याचे पाटील यांनी म्हटले आहे.

जिल्ह्याचा विचार करता कृष्णा मराठवाडा प्रकल्प, टेक्निकल टेक्सटाईल पार्क, वैद्यकीय महाविद्यालय याबाबतही पदरी निराशा झाली आहे. एका बाजूला गोसी खुर्द प्रकल्पासाठी दीड हजार कोटीची तरतूद होते त्याच प्रमाणे जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पासही भरघोस निधीची अपेक्षा होती ती फोल ठरली आहे.

## पुजारी नगर फाऊंडेशनतर्फे पत्रकार सौभाग्यवतींचा सत्कार

**▶▶ जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील ७५ महिलांचा एकत्रितपणे सन्मान ...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१० मार्च -**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शहरातील पुजारी नगर फाऊंडेशनच्या वतीने तुळजाई नगरीतील पत्रकारांच्या सौभाग्यवतींचा सत्कार करण्याचा प्रथम योग असून भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्षकाळ पूर्ण झाल्याचा आनंदोत्सव म्हणून विविध क्षेत्रातील ७५ महिलांचा एकत्रितपणे सन्मान करण्यात आला.

शुभांगी गणेश पुजारी यांच्या संकल्पनेतून हा विशेष उपक्रम राबवण्यात आला. सत्कार





सोहळ्यानंतर उपस्थित सर्व महिलांसाठी धर्मवीर छावा चित्रपटाचा शो दाखवण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ साहित्यिक प्रा. स्मिता पेशवे, प्रमुख अतिथी म्हणून रोहिणी रामचंद्र रोचकरी, डॉ. सुप्रिया वडणे उपस्थित होत्या.

पुजारी नगर फाऊंडेशनच्या माध्यमातून सातत्याने वेगवेगळे उपक्रम राबविले जातात, अध्यक्ष गणेश पुजारी आणि कार्याध्यक्ष श्रावण पवार यांनी महिला दिनाच्या निमित्ताने शहरातील कर्तृत्ववान महिलांना गौरव व्हावा यासाठी प्रथमच नारीशक्ती सन्मान सोहळा घडवून आणला. यावेळी पूजारी नगर सोसायटी परिसरात जवळपास ६० महिलांचा गौरव यावेळी करण्यात आला.

कार्यक्रमाचे विशेष म्हणजे सर्व सत्कार मूर्ती महिलांना शाल, गुलाब पुष्पांसह श्यामची आई या कादंबरी भेट देण्यात आली. पूजारी नगर फाउंडेशन सर्व पुरुष सदस्यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन तानाजी म्हेत्रे यांनी केले.

## आयटीआयचे विद्यार्थी बुद्धिबळ खेळात चमकले

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१० मार्च -**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आयोजित नाशिक येथे आयटीआयच्या विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय पारंपारिक क्रीडा महाकुंभ व विविध स्पर्धांचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.


बुद्धिबळ या क्रीडा प्रकारामध्ये राज्यातून मुलींमधून हर्षदा अशोक डोईफोडे हिने द्वितीय क्रमांक तर मुलांमधून सुदर्शन प्रल्हाद देवगिरे याने राज्यातून प्रथम क्रमांक पटकाविला.

या दोन्ही विद्यार्थ्यांना त्यांच्याच संस्थेत कार्यरत असणारे शिल्प निदेशक भगवान जाधव यांनी बुद्धिबळाचे प्रशिक्षण दिले आहे. संस्थेचे प्राचार्य संतोष कांबळे व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रविण औताडे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

धाराशिव या विध्यार्थी यांनी बुद्धिबळ खेळात बाजी मारल्यामुळे जिल्हा भरातून त्यांचे कौतुक केले जात आहे.

हर्षदा अशोक डोईफोडे ही वाशी तालुक्यातील पारा गावची असून मुलातून प्रथम क्रमांक मिळवलेला.

# धाराशिवमध्ये अवैध कत्तलखान्यावर प्रशासनाचा बुलडोझर





**परिसर होणार दुर्गंधीमुक्त...**

या अवैध कत्तलखान्यांमुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरत होती. तसेच, सार्वजनिक आरोग्यावरही त्याचा विपरीत परिणाम होत होता. ही कारवाई झाल्यामुळे नागरिकांना स्वच्छ व दुर्गंधीमुक्त परिसर मिळणार आहे.

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० मार्च -**

धाराशिव शहरातील अनधिकृत कत्तलखान्यांविरोधात पोलीस आणि नगर पालिका प्रशासनाने संयुक्तपणे मोठी कारवाई करत त्यांना जमीनदोस्त केले आहे. खिरणी मळा व रसूलपुरा भागात सुरू असलेल्या या अवैध कत्तलखान्यांवर वारंवार कारवाई करूनही त्यांची संख्या वाढत होती. अखेर प्रशासनाने कठोर पावले उचलत जेसीबीच्या सहाय्याने हे कत्तलखाने उद्ध्वस्त केले.

विशेष म्हणजे, राज्यात गोवंश हत्येवर बंदी असतानाही मोठ्या प्रमाणात गोवंश कत्तलीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. आठवड्यातून दोन-तीन वेळा पोलीस प्रशासनाने कारवाई करत गोमांस जप्त केले, तसेच विक्रीसाठी जाणारी वाहने ताब्यात घेऊन संबंधितांवर कारवाई केली. मात्र, यामुळेही कत्तलीवर पूर्णविराम लागला नव्हता. त्यामुळे शेवटी धाराशिव शहर पोलीस आणि नगर पालिकेने कठोर पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला.

खिरणी मळा व रसूलपुरा भागात अनेक वर्षांपासून अवैध कत्तलखाने सुरू होते. प्रशासनाची कोणतीही परवानगी नसताना हे धंदे बिनधास्तपणे सुरू होते. केवळ धाराशिव जिल्ह्यातच नव्हे, तर येथे केलेली कत्तल मुंबई, पुणे आणि परदेशातही मांस विक्रीसाठी पाठवली जात होती. मोठ्या प्रमाणावर सक्रिय असलेल्या या रॅकेटमुळे प्रशासनावर टीका होत होती. राज्यात गोवंश कत्तलबंदी असूनही नियमांचे उल्लंघन करून गोमांस विक्री सुरू होती. अनेकदा कारवाई करूनही काही फरक पडत नव्हता. त्यामुळे प्रशासनाने कठोर निर्णय घेत आज सकाळी जेसीबीच्या साहाय्याने या कत्तलखान्यांना जमीनदोस्त केले. ही कारवाई धाराशिव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शकील शेख, नगर पालिकेच्या मुख्याधिकारी वसुधा फड, एपीआय अंभोरे, पीएसआय संदीप ओहोळ, पीएसआय अक्षय डिघोळे, तसेच पोलीस आणि अतिक्रमण विरोधी पथकाने संयुक्तपणे पार पाडली.

प्रशासनाने दिलेल्या कडक इशाऱ्यानंतर आता या भागात पुन्हा अनधिकृत कत्तलखाने सुरू करण्याची कोणीही हिम्मत करणार नाही, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची साफसफाई व स्वच्छतेबाबत विशेष लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १० मार्च-**

समाज माध्यमांवर प्रसारित होणाऱ्या कोणत्याही व्हिडिओने विचलित न होता नागरिकांनी नांदेड येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयावरील आपला विश्वास कायम ठेवावा. गरीब, गरजू लोकांसाठी दर्जेदार ईलाजाचे केंद्र म्हणून पुढेही हे रुग्णालय काम करेल, अशी ग्वाही डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाताने दिली आहे.

डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिनस्त असलेल्या रुग्णालयातील बालरोग अतिदक्षता विभाग कक्ष ७ मध्ये झुरळ असल्याचा व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल झाल्याच्या संदर्भात डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांनी खुलासा केला आहे.

जनतेच्या विश्वासाला पात्र ठरणाऱ्या व जनतेच्या इलाजासाठी सर्वात हक्काचे स्थान असणाऱ्या रुग्णालयाच्या संदर्भात शासन संवेदनशील असून या संदर्भातील चौकशी सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या प्रकरणाची शहानिशा करण्यासाठी रुग्णालय प्रशासनामार्फत चौकशी समिती गठीत करण्यात आली असून याबाबत सखोल चौकशी सुरु आहे. रुग्णालयाच्या साफसफाई व स्वच्छतेबाबत वेळोवेळी उपाययोजना करुन विशेष लक्ष दिले जाते.

रुग्णालयातील झुरळ व इतर कीटक होऊ नयेत यासाठी रुग्णालय प्रशासनामार्फत नियमितपणे बायोक्लिन पेस्ट कंट्रोल, बार्शी रोड, लातूर या कंपनीकडून पेस्ट कंट्रोलचे कामकाज केले जाते. संबंधित कंपनीला पुनश्च पेस्ट कंट्रोल करण्याच्या सूचनेनुसार संबंधित कंपनीने संपूर्ण रुग्णालयामध्ये पुनश्च पेस्ट कंट्रोल काजकाज केले जात आहे. या संस्थेतील शैक्षणिक तसेच रुग्णसेवेवर कुठलाही परिणाम पडलेला नसून रुग्णसेवा उत्तम व सुरळीतपणे चालू असल्याचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांनी दिली आहे.

## आ. प्रताप चिखलीकर यांना मंत्रिपद द्यावे

### अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष शेख साबेर यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर ,दि. १० मार्च-**

विधानसभा निवडणुकीत विक्रमी मताधिक्य मिळवत राष्ट्रवादीचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे निवडून आले. माजी खासदार दुरदृष्टी असलेला अनुभवी नेता आमदार म्हणून त्यांचा राज्य मंत्रिमंडळात समावेश करावा, अशी मागणी अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष (अजित पवार गट) शेख साबेर करीत आहेत. नांदेडकरांना मंत्रिपदाची आशा लागली आहे.



नांदेड जिल्ह्यात सर्व ९ जागांवर महायुतीचेच आमदार असून त्यांत भाजपाचे ५, शिवसेनेचे ३ तर राष्ट्रवादीकडून चिखलीकर हे एकमेव आमदार आहेत. मागील दोन दशकांत वेगवेगळ्या कालखंडात दोनदा आमदार झालेल्या चिखलीकर यांची आमदारकीची तिसरी टर्म असून खासदारकीचा ही पाच वर्षाचा अनुभव या मोठ्या अनुभवाच्या जोरावर पक्ष विस्ताराच्या त्यांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देण्यासाठी व नांदेड जिल्ह्यात भाजपाला आव्हान द्यायचे असेल, तर चिखलीकरांना सत्तापद देण्याची गरज आहे. आमदार प्रताप पाटील चिखलीकर सर्वांना बरोबर घेऊन काम करणारा नेता असल्याने, प्रदीर्घ अनुभवाच्या शिदोरीवर त्यांना मंत्रिपदाची संधी देण्याची मागणी राष्ट्रवादी (अजित पवार) गटाचे अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष शेख साबेर शेख सगीर यांच्यासह मतदारसंघातील पदाधिकारी करीत आहे.

## सत्ता व मालमत्ता पेक्षा गुणवत्ता श्रेष्ठ : बालाजी पेटेकर

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. १० मार्च-**

वडिलोपार्जित मालमत्ता आणि त्या आधारावर सत्ता मिळवता येते पण गुणवत्ताही स्वतःलाच निर्माण करावी लागते.असे प्रतिपादन प्रख्यात साहित्यिक कवी बालाजी पेटेकर खतगांवकर यांनी केले. ते सिंधू कॉलेज ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अँड सायन्स महाविद्यालयाच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन निरोप समारंभ, बक्षीस वितरण आणि महिला दिन अशा त्रिवेणी संगमाच्या कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानीं महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश जाधव हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्था सहसचिव अशोक दाचावर हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते बालाजी पेटेकर यांनी आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये संतती कशी घडवावी यापेक्षा संपती कशी मिळवावी याची स्पर्धा लागली.पण ज्ञानाच्य जोरावर सर्व क्षेत्र काबीज करता येतात. आपल्यातली गुणवत्ता ओळखून ते सिद्ध करण्यासाठीची जिद्द आपल्यात असणे अत्यंत गरजेचे असल्याचे ते बोलत होते. त्यांनी आररं ...आररं ...बापू पाहिजे का सुख खंडीभर ...डोकं ठेवून झोपून बघ एकदा माईच्या मांडीवर... ही कविता सादर करत आईच्या माडीवर डोकं ठेवल्यानंतर येणारी झोप ही जगातल्या कोणत्याही सुखापेक्षा श्रेष्ठ आहे असे विशद केले. त्यानंतर त्यांनी सखी तुझ्या संग,आम्हीही प्रेम केलो होतो, मैत्रिणीच्या लग्नात, या टीव्ही मोबाईल मुळे अशा कवितांनी विद्यार्थ्यांना अंतर्मुख व्हायला लावण्याबरोबरच हसून हसून त्यांना एका वेगळ्याच



भाव विश्वास घेऊन गेले.कार्यक्रमाच्या प्रारंभी ज्ञानमाता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रजलित करून स्वप्ना गुनावार यांच्या वंदे मातरम या सुमधुर गीताने सुरुवात झाली.यावेळी उपप्राचार्य मिलिंद राजूरकर, प्रा.अनुराधा गंधारे, बोनंतापल्ले, सौ.मनीषा , स्वप्ना गुनावार, प्रा. भिमराव दिपके, प्रा. विश्वनाथ भालेराव, महाजन, विद्यार्थी प्रतिनिधी कपिल पाटील वैष्णवी झाडे, शंकर हिवराळे, नीता केरले, गिरी, कळसकर व सर्व महाविद्यालय विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. प्रमुख वक्ते बालाजी पेटेकर खतगांवकर यांच्या हस्ते विविध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण त्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश जाधव सर यांनी केले. कार्यक्रमाचे सुंदर नियोजन आणि आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख अभिनंदन सीताफुले यांनी केले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा.मिलिंद वाघमारे यांनी केले तर आभार मिलिंद राजूरकर यांनी मानले.यावेळी महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### दहा वर्षीय आवेज आयुब शेखचा पहिला रोजा

**मुखेड** -मुस्लिम बांधवांसाठी पवित्र असलेला रमजान महिना सुरु असुन रविवार दि. ९ मार्च रोजी शहरातील व्यंकटेश नगर येथील ५वी वर्गात शिकणारा आवेज आयुब शेख याने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा-उपवास ठेवला. रमजान महिन्यात मुस्लिम बांधव रोजा (उपवास) ठेवतात. मन व शरीर शुद्ध करण्याचा तो एक मार्ग असल्यामुळे मुस्लिम धर्मात रोजाला विशेष महत्त्व आहे. सध्या मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच उन्हाची तीव्रता वाढली आहे. मुखेड शहरातील शेख आयुब यांचा १० वर्षाचा मुलगा आवेज आयुब शेख याने आपल्या आयुष्यातील रमजानचा पहिला रोजा उपवास ठेवल्याने त्याच्या सर्वत्र स्तरांतून कौतुक होत आहे.



### जिजाऊ विद्या संकुलात शिव जन्मोत्सव सोहळा



**नायगाव-** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती येथून जवळच आसलेल्या खंडगाव (बेंद्री) ता.नायगांव येथील जिजाऊ विद्या संकुलात काल शनिवारी जागतीक महिला दिनाचे औचित्य साधून उत्साह पूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी शिवव्याख्याते तानाजी महाराज वासरीकर यांचे व्याख्यान झाले. या जयंती सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी बाबुराव पाटील शिंदे हे होते तर प्रमुखअतिथी म्हणून दिगांबर पा.कदम , पोलीस निरीक्षक सुभाषचंद्र मारकड, शिव सेनेचे तालुका प्रमुख रविंद्र भिलवंडे, सरपंच आनंदराव डुमणे, नागनाथ अनंतवाड, संचालक भास्कर पा.शिंदे, राजू पा.शिंदे, सुरज कदम आदींची उपस्थीती होती. प्रारंभी सकाळी दहा वाजता ढोल ताशाच्या निनादात महाविद्यालय परिसरात छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली असून यावेळी जिजाऊ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कॉलेजचे विद्यार्थी व विद्यार्थीनी, प्राध्यापक, प्राध्यापिका यांनी मराठमोळा पेहराव परिधान करून या शिवजन्मोत्सव सोहळ्यामध्ये स्वंयस्फुर्तपणे सहभाग नोंदवला असल्याचे दिसून आले . हा शिवजन्मोत्सव सोहळा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य बाबू आनमुलवाड यांसह विद्यार्थीनी मोलाचे परीश्रम घेतले .

### युवा उद्योजक श्रीनिवास नेम्मानिवार यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**किनवट-**किनवट शहरातील युवा उद्योजक तथा भारतीय जनता पक्षाचे तरुण तडफदार युवा कार्यकर्ते श्रीनिवास नेम्मानीवार ( क्वालिटी सिनू)यांचा वाढदिवस किनवट शहरात उत्साहात साजरा करण्यात आला असून यानिमित्त भारतीय जनता पक्षाच्यावतीने भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष स्वागत आयनेनीवार यांना भव्य पुष्पहार घालून तसेच केक कापून अभिष्टचिंतन केले आहे श्रीनिवास नेम्मानिवार हे युवा उद्योजक म्हणून सर्वत्र परिचित आहेत.प्रत्येकाशी जिव्हाळ्याचे संबंध जोपासत श्रीनिवास नेम्मानिवार यांनी किनवट माहूर तालुक्यात एक यशस्वी उद्योजक म्हणून नावलौकिक प्राप्त केला. धार्मिक व सामाजिक कार्यात त्यांचा नेहमीच पुढाकार असतो. सर्वसामान्य, गोरगरीब लोकांच्या सुखदुःखात धावून जाणारे ते एक उभरत नेतृत्व म्हणून उदयास आले आहेत अशा अशा भावना स्वागत आयनेणीवार यांनी याप्रसंगी बोलताना व्यक्त केल्या आहेत. वाढदिवसाच्या कार्यक्रमाला आशिष नेम्मानीवार,संतोष दासरवार,व्यंकट माडपेलिवार,सागर नेम्मानीवार,सतीश नेम्मानीवार,संतोष माडपेलीवार यांच्यासह श्रीनिवास नेम्मानिवार यांचे चाहते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### कापूस विक्रिसाठी सि.सि.आयकडे नोंदः सूर्यवंशी

**भोकर-** भारतीय कापूस निगम सि.सि.आय.हंगाम २०२४-२०२५ मध्ये किमान हमीदराचा लाभ मिळवण्याकरिता सर्व शेतकऱ्यांनी दि.१५ मार्च पर्यंत सि.सि.आय.कडे नोंदणी करण्यात यावी त्यानंतर आलेल्या शेतकऱ्यांचे कापूस विक्रिसाठी नोंदणी केली जाणार नसल्याचे बाजार समितीचे सचिव सूर्यवंशी यांनी सांगीतले. कापूस उत्पादक शेतकरी आपल्याकडे असलेला कापूस भारतीय कापूस निगम सि.सि.आय.कडे हमीदराचा भाव मिळविण्यासाठी दि.१५ मार्च पर्यंत नोंदणी करावी त्यानंतर आलेले शेतकरी कापूस विक्रिसाठी नोंदणी करु शकणार नाहीत.त्यामूळे ठरवून दिलेल्या दिनांकापर्यंत आपली कापसाची विक्रिसाठी नोंद सि.सि.आय.कडे करण्यात यावी असे अवाहन बाजार समितीचे सचीव सूर्यवंशी यांनी केले आहे.

## आठ वर्षीय इशरतचा पहिला रोजा पूर्ण



**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. १० मार्च-**

येथील युवा कवी,गीतकार जाफर आदमपूरकर यांची भाची व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ मुखेड आगारातील वाहक शेख शब्बीर शहाहुसेन यांची आठ वर्षीय मुलगी शेख इशरत हिचा आपल्या जीवनातील पहिला रमज़ान रोजा(उपवास) संपन्न झाला.

सकाळ प्रहरी उठणे,पाच वाजता सहेरी म्हणजे उपवास बाळगणे, नमाज पठण करणे, कुराण पठण, रोजा, दानधर्म, इश्वराचा जपजाप आणि सायंकाळी पावणे सात वाजता इफ्तार म्हणजे उपवास सोडणे असा दिनक्रम रमज़ान महिण्यातील असतो. ह्या पुण्यकर्म बाबींना अगदी प्रत्येक मुस्लिम बांधवांसह लहान मुले देखील मनोभावे जीवापाड जपत असतात.

सदरील मुलीचे कौतुक करीत त्याला सद्भावरूपी शुभेच्छां देण्यात आल्या. शेख शब्बीर शहाहुसेन (वाहक रा.प.म. मुखेड), शेख कलीम, शेख बाबू, माजी बँकर फक्रूशा मदार, चांडोळा बँक सहाय्यक महमदरफी मदार, बिलोली महसूल सहाय्यक शहा अजिमोद्दीन, कवी, गीतकार जाफर आदमपूरकर, शहा मैनोद्दिन, शहा अहेमद, शहा उस्मान कासराळीकर,शेख फारूक, यासह मुस्लिम बांधव व पाहुण्यांनी इशरतचे कौतुक केले आहे.

## उमरीच्या मॉडर्नमध्ये स्कुलमध्ये महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. १० मार्च-**

शहरातील मॉडर्न इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कृतत्वान महिलांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी उमरी नगर परिषदेच्या मुख्याधिकारी डॉ. निलम कांबळे, डॉ. ज्योति चोपवाड यांनी, विधिज्ञ विजया गुंडाळले, सहशिक्षिका मनिषा सितावार, महिला पोलिस शांता शिंदे, सफाई कामगार सुनंदा खंदारे यांनी मार्गदर्शन व अनुभव कथन केले. ह्यावेळी उपस्थित महिलांसाठी विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम करण्यात आला त्यात अनेक महिलांनी भाग घेतला. सोनाली देशपांडे यांनी संतकवी दासगणू महाराज यांनी रचलेला राणी लक्ष्मीबाई पोवाडा गाऊन दाखविला.

शाळेतील विद्यार्थीनींनी स्वत : रचलेल्या कवितांचे वाचन करून दाखविले.वर्षा जाधव यांनी सोशलमिडियाचे माध्यम व त्यात स्त्रियांचा सहभाग ह्यावर प्रकाश टाकला. विविध गुणदर्शन कार्यक्रमात ऐश्वर्या उत्तरवार, विद्या पबितवार, परदेशीताई, रसिका मुक्कावार, चंदनकर, निलिमा वर्मा, सोनाली देशपांडे आदींनी भाग घेतला. कार्यक्रमास कंदकुर्ते, सविता रणखांब, श्रुती मुक्कावार, मिराबाई चौदंते, ढगे, सानिका कुलकर्णी व शाळेतील सर्व महिला कर्मचारी व महिला भगिनींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन इयत्ता आठवीतील विद्यार्थीनी गोजिरी गोजे हिने केले तर प्रास्ताविक व आभार शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा कुलकर्णी यांनी केले आहे.

## व्हाईस ऑफ इंडियाच्या दक्षिण नांदेड अध्यक्षपदी संभाजी सोनकांबळे तर सचिवपदी शिवाजी राजूरकर

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. १० मार्च-**

व्हाईस ऑफ इंडिया पत्रकार संघटनेची नांदेड (दक्षिणची) कार्यकारिणी नुकतीच घोषित करण्यात आलीअसून,अध्यक्षपदी संभाजी सोनकांबळे यांची तर सचिवपदी शिवाजी राजूरकर यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे. व्हाईस ऑफ इंडिया या पत्रकार संघटनेचे संस्थापक- अध्यक्ष संदीप काळे, जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश जोशी व राज्य सरचिटणीस श्रीनिवास भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा उपाध्यक्ष तुकाराम सावंत यांचे अध्यक्षतेखाली १० मार्च रोजी सिडको, नांदेड येथे बैठक घेण्यात आली. या बैठकीत व्हाईस ऑफ इंडिया, या पत्रकार संघटनेच्या नांदेड (दक्षिणच्या) अध्यक्षपदी पत्रकार संभाजी सोनकांबळे यांची, तर सचिव तथा 'सल्लागार'पदी पत्रकार शिवाजी राजूरकर यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे.



या बैठकीतच व्हाईस ऑफ इंडियाच्या नांदेड दक्षिण शाखेच्या उपाध्यक्षपदी सूर्यकुमार यन्नावार, कोषाध्यक्षपदी तुकाराम सावंत व कार्याध्यक्षपदी दिगंबर शिंदे यांची, तर सहसचिवपदी पत्रकार सुरेश आंबटवार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. नूतन कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांचे नांदेड (दक्षिण) विधानसभा मतदार संघातील सामाजिक कार्यकर्ते तथा विविध राजकीय पक्ष, धार्मिक संघटना, शैक्षणिक संघटनेचे पदाधिकारी, माजी लोकप्रतिनिधींकडून स्वागत करण्यात येत आहे.

## होळीनिमित्त काव्यपौर्णिमा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १० मार्च-**

येथील आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलच्या वतीने होळी व धुलीवंदन या सणांच्या पार्श्वभूमीवर शहरातील मालेगाव रोड स्थित भावसार चौक नजीकच्या पवन नगर परिसरातील सप्तरंगी साहित्य मंडळाच्या ९३ व्या काव्यपौर्णिमा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन दि. १३ मार्च २०२५ रोजी सायंकाळी चार वाजता प्लास्टीक व कचऱ्याची होळी पेटवून होणार असून त्यानंतर परिसरातील कवी कवयित्रींच्या सहभागाने काव्य पौर्णिमा या कविसंमेलनाच्या कार्यक्रमास प्रारंभ होणार असल्याची माहिती काव्यपौर्णिमेचे संकल्पक प्रज्ञाधर ढवळे आणि आयोजक पांडुरंग कोकुलवार यांनी दिली.

येथील सप्तरंगी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने दरमहा पौर्णिमेचे औचित्य साधून काव्यपौर्णिमा या कविसंमेलनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या मालेतील ही ९३ वी काव्यपौर्णिमा असून होळी निमित्ताने मंडळाच्या वतीने सहभागी होणाऱ्या सर्व कवी - कवयित्रींचा खारिक खोबऱ्याचा हार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. याच कार्यक्रमात विविध पुरस्कारांनी सन्मानित गोंडरकार अशोक कुबडे, सप्तरंगी साहित्य मंडळाचे सहसचिव मारोती कदम, युवा कवी सोनु दरेगांवकर, पत्रकार राम तरटे यांना मंडळाच्या वतीने सन्मानित करण्यात येणार आहे.

## असर्जन येथील बौद्ध स्माशानभूमीला संरक्षक भिंत बांधुन देण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १० मार्च-**

शहरातील असर्जन येथील बौध्द स्मशानभूमीवर गावातील काही स्वयंघोषित राजकीय कार्यकर्त्याकडून कब्जा करण्याचा प्रयत्न होत आहे. हा प्रयत्न हाणून पाडत बौध्द स्मशानभूमीवरील अतिक्रमण हटवावे तसेच या स्मशानभूमीला संरक्षक भिंत बांधून पिंजऱ्याची व्यवस्था करुन द्यावी, अशी मागणी असर्जन येथील बौध्द समाज बांधवांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे एका निवेदनाव्दारे केली आहे.

शहरातील असर्जन येथील दत्तात्रय मंदिर परिसराला लागून असलेल्या जागेत मागील ६० वर्षापासून येथील बौध्द समाजाच्या स्मशानभूमीवर अंत्यसंस्कार करण्यात येतात. परंतु मागील काही दिवसापासून याच परिसरातील काही स्वयंघोषित राजकीय कार्यकर्ते समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. या जागेवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न त्यांनी सुरु केला असून, यामुळे जातीयवाद निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे हा प्रकार घडण्यापूर्वीच याच स्मशानभूमीला संरक्षक भिंत बांधावी तसेच पिंजऱ्याची व्यवस्था करुन द्यावी, अशी मागणी असर्जन येथील बौध्द समाज बांधवांनी जनता पँथरच्या माध्यमातून जिल्हाधिकाऱ्यांकडे एका निवेदनाव्दारे केली आहे. या निवेदनावर आकाश चव्हाण, रामजी रगडे, संजय रगडे, राजू रगडे, प्रविण पाटील, नेमीचंद भोकरे, धम्मा सरपाते, शिवाजी गोडबोले यांच्यासह जवळपास शंभर नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## शेतकरी फार्मर आयडी तयार करा : पुरी

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर,दि. १० मार्च-**

शेती व शेतकऱ्यांच्या विकासासाठी तंत्रज्ञानाच्या मदतीने कृषी क्षेत्रात डिजिटल क्रांती घडविण्यासाठी सरकारने शेतकरी फार्मर आयडी योजना सुरू केली आहे. नोंदणी निः शुल्क आहे. शेतकऱ्यांनी या योजनेंतर्गत नोंदणी करावी, असे आवाहन तलाठी पुरी यांनी केले आहे.



या योजनेत सहभागी होण्यासाठी तलाठी व मंडळ यांनी प्रत्येक गावांत नोंदणी शिबिराचे आयोजन केले आहे. महसूल, कृषी यांचे संयुक्त पथक गावनिहाय गठित केले आहे. आधारकार्ड, आधारलिंक असलेला मोबाईल क्रमांक, सातबारा उतारा घेऊन शेतकऱ्यांनी सीएससी सेंटरच्या सहकार्याने नोंदणी पूर्ण करावी. विविध सरकारी अनुदान व आर्थिक मदत, पीकविमा योजना, पीककर्ज मंजुरी, खत, बियाणे व औषधांसाठी मिळणारे अनुदान असे विविध फायदे या शेतकरी फार्मर आयडी नोंदणीचे आहे. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या शेतकरी फार्मर आयडी योजनेत नोंदणी करावी, असे आवाहन तलाठी पुरी व मंडळ अधिकारी चव्हाण यांनी केले आहे.

## बंजारा समाज आणि होळी

बंजारा समाजात होळीचा सण अगदी दिवाळीसारखाच साजरा होतो, लोकगीतं हे बंजारा समाजाच्या लोकसंस्कृतीचे खास आकर्षण आहे . खरं तर होळीच्या आधी येणाऱ्या दांडी पौर्णिमेपासून त्यांच्या होळीला सुरुवात होते. या गीतांना 'लेंगी गीत' असेही म्हटले जाते. बंजारा समाजाच्या होळीत 'पाल', 'गेर', 'फगवा', 'धुंड' अशा अनेक परंपरा जोपासल्या जातात.

भारतीय सनातन संस्कृती विविध सण उत्सवांनी नटलेली आसून समाजात एकोपा रहावा तसेच समाज संघटित, सुरक्षित व समरस रहावा यासाठी सण उत्सवांचे अनन्य साधारण महत्व आहे. 'होळी' हा सण पूर्ण भारतात विविध प्रकारे साजरी केला जातो. बंजारा समाजातील होळी सण तर फारच उल्लेखनीय असतो.

बंजारा समाजात दोन सण प्रामुख्याने साजरी केले जातात एक होळी आणि एक दिवाळी. बंजारा समाजाचा पारंपारिक आणि अति विशेष सण म्हणजे होळी आहे. बंजारा समाजाच्या आकर्षक संस्कृतीचे दर्शन होळी मधून दिसते. बंजारा समाजात दांडी पौर्णिमेपासून होळीला सुरवात होत असते म्हणजे एक महिना आधीपासून. या होळी उत्सवात अगदी लहानांपासून तर वृद्धांपर्यंत सर्वचजण सहभागी होतात. निसर्गाला अनुसरून होळी उत्सव साजरा केला जातो.

बंजारा समाजात नृत्याचे विविध प्रकार आहेत राधा नृत्य, लडी नृत्य, उपरेरो नृत्य, पीर नृत्य, लंगडी पाय नृत्य. सर्व नृत्य होळी साजरी करत असताना सादर केले जातात. बंजारा समाजाचा इतिहास हा मौखिक असल्यामुळे लोकगीतांच्या माध्यमातून इतिहास समजतो. लोकगीतांना बंजारा समाजात अनन्यसाधारण महत्त्व आहे. नृत्य आणि लोकगीतांशिवाय बंजारा समाजाची होळी होऊच शकत नाही. होळी उत्सव पारंपरिक नृत्य, लोकगीते हे बंजारा समाजाचे अविभाज्य घटक आहेत.

सामान्यतः अन्य ठिकाणी पौर्णिमेच्या दिवशी होलिका पेटवून होळी साजरी केली जाते. परंतु, बंजारा समाजात दुसऱ्या दिवशी म्हणजेच धुलीवंदनाच्या दिवशी



पहाटेच्या अंधारात होळी पेटवली जाते. परंपरेनुसार तांडासमोर पूर्व दिशेला होलिकेस पेटवल्यानंतर महिला व पुरुष निघून जातात, पण युवक युवती होलिकाजवळ गाणी गातात आणि नाचतात. होळी खेळणा-या युवकाला 'गेरीया' तर युवतीला 'गेरळी' असे म्हटले जाते. मौजमजेसाठी महिला मोठ्या, मोठ्या काठ्या घेवून पुरुषांवर प्रहार करतात. विशेषकरून वहिनी-दिरावर काट्यांचा प्रहार करते. बंजारा समाजात केसुलाला(पळस) विशेष महत्त्व आहे. तांड्यावर केसुलाला पाण्यात टाकून ओला रंग केला जातो व तो मोठ्याप्रमाणात वापरला जातो. ज्यांच्या घरात होळीच्या आधी किंवा नंतर मुलगा जन्माला आला आहे त्याचा जन्मदिवस होळीच्या दिवशी साजरी केला जातो त्याला 'धुंड' असे म्हणतात. ज्यांच्या घरात लहान मूल जन्माला आलं आहे त्याचा शोध घेतल्या जातो व त्यांच्या अंगणात 'धुंड' केला जातो. धुंड करत असताना त्या तांड्यातील सर्वजण नंगारा,हलगी,डफडा वाद्य वाजवत लेंगी गातात व नृत्य करतात. 'धुंड' च्या ठिकाणी खीर एका हंड्यात टाकली जाती, तो हंडा एका खड्यात टाकल्या जातो, मग नंतर तो हंडा काढण्यासाठी पुरुष प्रयत्न करतात तेव्हा महिला त्यांच्यावर लाठीमार करतात, कितीही लाठीमार झाला तरी शेवटी त्या व्यक्तीला हंडा पळवून न्यायचा असतो.

बंजारा समाजाच्या होळी मध्ये कोणत्याही प्रकारचा भेद नसतो, तांड्यातील प्रत्येकजण होळी उत्सव साजरा करण्यासाठी घराबाहेर एकत्र येतात. होळी सण साजरी करतांना बंजारा समाजातील सर्वसमावेशकता, संघटीतपणा, एकात्मता, बंधुभाव सहजपणे दिसून येतात. हजारो वर्षापासून देश व समाज रक्षणासाठी बंजारा समाज विविध प्रांतात भटकंती करत राहिला, तरीही आपली सनातन संस्कृती या समाजाने कायम जपून ठेवली आहे.

**विशाल पवार, देगलूर**

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# डॉ. क्रांती सातपुते यांना पुरस्कार प्रदान

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० मार्च -** येथील दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राचार्या डॉ. क्रांती लिंबाजीराव सातपुते यांना जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून जिल्हा प्रशासनाच्या वतीने 'मन्विथा कर्मसिद्धी पुरस्काराने' जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

डॉ. क्रांती सातपुते यांनी फार्मसी क्षेत्रात केलेल्या संशोधन कार्याची दखल घेत विद्यापीठाने २०२४-२०२५ चा युवा संशोधक प्राध्यापक हा पुरस्कार प्रदान केला आहे.

फार्मसी क्षेत्रातील त्यांचे योगदान पाहूनच जिल्हा प्रशासनाकडून त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे सी.ई.ओ. राहुलकुमार मीना, उपजिल्हाधिकारी केशव नेटके,



उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे विरोळे यांची प्रमुख -उपस्थिती होती.

डॉ. सातपुते यांना मिळालेल्या पुरस्कारा बद्दल संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंद सोनवणे, सचिव रमेश बियाणी, सहसचिव विशाल लाहोटी, सहाय्यक सचिव अजिंक्य सोनवणे, कोषाध्यक्ष संजय बोरा व महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद यांनी कौतुक केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...

### ॲड. भारत साबदे यांचे निधन

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० मार्च -** येथील लातूर एज्युकेशन सोसायटीचे संचालक, जिल्हा वकील मंडळाचे सदस्य, माजी नगरसेवक, राज्य वखार मंडळाचे माजी संचालक ॲड. भारत प्रभाकरराव साबदे (वय ६०) यांचे रविवारी सायंकाळी ७वाजेच्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दुपारी १२.१५ वाजता येथील मारवाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, सूना, नातू असा परिवार आहे.

### कोल्हेनगरमध्ये महिलादिन साजरा

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० मार्च -** येथील कोल्हेनगरमधील रमापती प्रतिष्ठानच्यावतीने जागतिक महिला दिन



उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून प्रतिष्ठानच्या अध्यक्षा रमा कांबळे यांनी अभिवादन केले. यावेळी वर्षा कांबळे, अश्विनी कांबळे, रोहिणी सूर्यवंशी, पल्लवी सूर्यवंशी, विद्या सूर्यवंशी, सीमा कांबळे, शीला गायकवाड, अलका गायकवाड, पद्मिनी पालकर, शेवंताबाई कांबळे यांच्यासह महिला व नागरिक उपस्थित होते.

### 'बीएसएनएल'मध्ये महिलादिन

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० मार्च -** येथील बीएसएनएलच्या जिल्हा महाप्रबंधक कार्यालयात शनिवारी (दि.८) जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त कार्यालयाच्या आवारात महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

बीएसएनएलचे जिल्हा महाप्रबंधक अनिल बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात बीएसएनएल कार्यालयाच्या आवारात महिलां अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी कार्यालयातील अधिकारी बीएसएनएलच्या सहायक महाप्रबंधक संगीता देशमाने, उपमंडल अभियंता रजनीगंधा गिरवलकर, प्राप्ती कुलकर्णी, सुचिता कोळेकर, संगीता कबूर, लता कदम, मेघना सासवडकर, शोभा पांचाळ, सुशीला मसुरे, शीला कुंभार यांच्यासह कार्यालयातील अन्य अधिकारी-कर्मचारी, महिला उपस्थित होत्या.

### १७० कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० मार्च -** मागील २४ वर्षांपासून प्रा.मोटेगावकर सरांचे आरसीसी हे शैक्षणिक कार्याबरोबरच विविध सामाजिक,धार्मिक कार्यक्रमांमध्येही सक्रिय सहभाग नोंदवून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये,सामाजिक बांधिलकी,सांस्कृतिक वारसा ई चे जतन व संवर्धन केले पाहिजे याची शिकवण देतो. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून प्रा. शिवराज मोटेगावकर यांच्या ठउउ झढढएठछ च्यावतीने सर्व शाखांमध्ये जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात व सन्मानपूर्वक साजरा करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान महिला शिक्षक, विद्यार्थीनी, कर्मचारी तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला.

लातूर येथील नालंदा कॅम्पसमधील विशेष कार्यक्रमात १५० महिलांचा सन्मान करण्यात आला. तर इतर शाखेतही विविध कार्यक्रम आयोजित करून महिलांना भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी प्रा. मोटेगावकर सर, मीनल मोटेगावकर व संपूर्ण आरसीसी टीम उपस्थित होती. या विशेष प्रसंगी प्रा. मोटेगावकर सरांनी सर्व महिलांना शुभेच्छा देत, ज्या घरामध्ये पत्नीचा, आईचा, बहिणीचा तसेच इतर स्त्रीयांचा सन्मान केला जातो त्या घरामध्ये लक्ष्मी अखंड वास करते. अशा शब्दांमध्ये त्यांनी स्त्रीचे महत्व समजावून सांगितले. त्याचबरोबर महिला सशक्तीकरण, शिक्षणातील त्यांचे योगदान आणि समाजातील महत्त्वाच्या भूमिकांवर सौ. मीनल मोटेगावकर यांनी आपले मत व्यक्त केले.

# शुद्ध पाणी पुरवठा करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० मार्च -** महापालिकेच्यावतीने शहरात नळाद्वारे पुरवठा करण्यात येणारे पाणी गेल्या महिनाभरापासून पिवळसर येत आहे. यामुळे रोगराई पसरण्याची भीती नाकारता येत नाही. मात्र, महापालिका प्रशासन अद्यापही गांभीर्याने घेत नसल्याने नागरिकांत संतापाची लाट उसळली असून याबाबत महापालिका प्रशासनाने उपाययोजना करून शुध्द पाणीपुरवठा करावा, अशी मागणी होत आहे.

गेल्या महिनाभरापासून शहरवासीयांच्या नळाला पिवळ्या पाण्याचा पुरवठा होत आहे. त्यामुळे नागरिकांना विकतच्या पाण्यावर तहान भागवावी लागत आहे. शहरातील वेगवेगळ्या भागांत हे पिवळसर पाणी येत असून या संदर्भात नागरिकांची ओरड वाढली असतानाही महापालिका प्रशासन याची गांभीर्याने दखल घेत नसल्याचा आरोप होत आहे. शनिवारी खाडगाव रोड भागात प्रकाशनगर, क्रांतीनगर, संभाजीनगर, कपिलनगर, रहिमनगर आदी भागांत पिवळे पाणी आल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला. शहरातील डालडा फॅक्टरी जलकुंभावरून तिसऱ्यांदा काही नगरांमध्ये नळाला पिवळे पाणी आले. तर बार्शी रोडवरील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या जलकुंभावरून महिन्यापासून गढूळ पाण्याचा पुरवठा होत आहे. हे पाणी पिण्यायोग्य असल्याचे महापालिका प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. मात्र, पाणी पिण्यास योग्य



की अयोग्य, असा संभ्रम निर्माण झाला आहे. शुध्द व पिण्यायोग्य पाणीपुरवठा करावा, अशी मागणी होत आहे.

**'पाणी पिण्यास योग्य'चा दावा**

महानगरपालिकेने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रयोगशाळेत या पिवळ्या पाण्याची तपासणी करून हे पाणी पिण्यायोग्य असल्याचा निर्वाळा दिला आहे. तरीही नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. नागरिक नळाद्वारे येणारे पिवळे पाणी पिण्याऐवजी विकतचे जारचे पाणी घेऊन तहान भागवत आहेत. शुध्द व पिण्यायोग्य पाणीपुरवठा करावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

### ड्रेनेजच्या पाइपलाइनची दुरवस्था

शहरातील मित्रनगरसह अनेक भागात गेल्या ४० वर्षांपूर्वीची ड्रेनेजची कामे झाली होती. तेव्हापासून देखभाल व दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाले. आता या भागातील अनेक ड्रेनेज पाइपलाइन फुटल्या आहेत. ठिकठिकाणी पाइपलाइनची दुरवस्था झाली आहे. पाइपलाइन फुटून चेंबरही तुंबत आहे.

त्यामुळे गटारातील सांडपाणी रस्त्यावर येत आहे. परिणामी, या परिसरात रस्त्यावरून वाहणाऱ्या गटारामुळे कमालीची दुर्गंधी पसरत आहे. या भागातील नागरिक, महिला व बालकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सांडपाणी वाहत असल्याने रस्त्यावर चालताही येत नाही. या दुर्गंधीमुळे नागरिकांना नाकावर रुमाल बांधून मार्गक्रमण करावे लागत आहे. त्यातच फुटलेल्या ड्रेनेजचे सांडपाणी पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीमध्येही शिरत आहे. परिणामी, अनेक भागातील नळाला दूषित पाणीही येत आहे. त्यामुळे फुटलेल्या जलवाहिन्या दुरुस्त कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# स्त्रियांनी स्वजाणीव ठेऊन आत्म सन्मानाने जगावे

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० मार्च -** स्त्रियांमध्ये कुटुंब व्यवस्थापनाबरोबरच समाज आणि राष्ट्राला आकार आणि संस्कार देण्याची अद्वितीय क्षमता आहे त्यामुळे स्त्रियांनी स्व जाणीव ठेऊन आत्म सन्मानाने जगावे आणि आपला आपणच सन्मान मिळवावा असे प्रतिपादन सुप्रसिद्ध वक्त्या डॉ. क्रांती मोरे यांनी केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील युवती मंच व महिला तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त विशेष व्याख्यान कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारपीठावर पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. शिवप्रसाद डोंगरे, प्रा. किसनाथ कुडके, स्टाफ सचिव प्रा. रवींद्र सुरवसे, प्रा. रवींद्र सोनोने, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. किसनाथ कुडके आणि डॉ. अश्विनी रोडे यांची उपस्थती होती.

कार्यक्रमाचा प्रारंभ कु. मिताली आगलावे आणि कु. भक्ती पांचाळ यांनी गायलेल्या नारीशक्ती गीताने झाला. त्यानंतर जगत् ज्योती महात्मा बसवेश्वर आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना डॉ. मोरे म्हणाल्या की, भारतीय स्त्रियांनी प्राचीन काळापासून राष्ट्र निर्माणात आपले योगदान दिले आहे. स्वराज्य निर्मिती, भारतीय स्वातंत्र्यलढा, हैदराबाद मुक्तिसंग्राम यात अतुलनीय योगदान दिले आहे. कला, क्रीडा, वाणिज्य, संशोधन, समाजसेवा, शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे असे त्या शेवटी म्हणाले.

# लातूर महापालिकेने हटविले ६०० अनाधिकृत बॅनर

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० मार्च -** शहरातील अनधिकृत होर्डिंग व बॅनरच्या विरोधात महापालिका आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांच्या निर्देशानुसार रविवारी (दि.९) विशेष मोहीम राबविण्यात आली. यात ६०० अनधिकृत होर्डिंग व बॅनर काढत दोघांवर ३ गुन्हे दाखल करण्यात आले.

उच्च न्यायालयाने अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स होर्डिंग व कमानीबाबत आदेश दिले आहेत. ३१ जानेवारी २०१७ नुसार महाराष्ट्र मालमत्ता वीरूपन प्रतिबंध कायदा १९९५ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत तरतुदीनुसार कार्यवाही करण्यास्तव पालिकेकडून अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मनपा आयुक्त मनोहरे यांनी शहरातील अधिकृत होर्डिंग बॅनर व कमानी काढण्यासंदर्भात आदेश दिले आहेत. त्यानुसार उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी सकाळी ६ वाजताच रस्त्यावर उतरले होते. या मोहिमेत शहरातील ६०० हून अधिक अनधिकृत होर्डिंग व बॅनर हटविण्यात आले.

शहरात होर्डिंग व बॅनर लावण्यासाठी महापालिका प्रशासनाची पूर्व परवानगी घ्यावी, असे आवाहन पालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. कसलीही परवानगी न घेता हे बॅनर लावण्यात आले होते. त्यामुळे ते काढून टाकण्यात आले आहेत. यापुढे अशा पद्धतीने बॅनर लावू नयेत, अन्यथा दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही पालिकेच्यावतीने देण्यात आला आहे.

# अट्टल चोरटे गजाआड

## सहा लाखांचा मुद्देमाल जप्त;तिघे फरार



तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० मार्च -** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने चोरीच्या गुन्ह्यातील दोन अट्टल आरोपींना नांदेड जिल्ह्यातून अटक करून ६ लाख ९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यातून ॲल्युमिनियम तार चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आले आहेत. यातील तीन फरार आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील विविध गुन्हे उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेची पथके तयार करून त्यांना मार्गदर्शन करण्यात आले होते. पथकांमार्फत तपास सुरू होता. अहमदपूर, चाकूर व उदगीर ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील महावितरणच्या ॲल्युमिनियम वायर चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी हे नांदेड जिल्ह्यातील असून त्यांनी साथीदारांसह सदर गुन्हे केले आहेत, अशी माहिती पथकाला मिळाली. रविवारी सदर पथक नांदेड जिल्ह्यातील माळटेकडी परिसरात पोहचून संदीप लक्ष्मण गायकवाड (वय २५) आणि शेषराव श्यामराव वाघमारे (वय २६, दोघेही रा. पुणेगाव, ता. नांदेड) यांना ताब्यात घेऊन त्यांची कसून चौकशी केली.

काही महिन्यांपूर्वी लातूर जिल्ह्यातील विविध ठिकाणी सचिन आनंदराव कांबळे (रा. पूर्णा, जि. परभणी), बादल अशोक गायकवाड (रा. अंबड, जि. जालना) आणि आदिनाथ मनोहर मोरे (रा. सुमठाणा, ता. वसमत, जि. हिंगोली) या साथीदारांसह महावितरणच्या विजेच्या ॲल्युमिनियम तार चोरीचे गुन्हे केल्याची कबुली त्यांनी दिली. त्यांच्याकडून २ लाख ८४ हजार ७५८ रुपये किमतीची ॲल्युमिनियम तार व गुन्ह्यात वापरलेले पिकअप वाहन असा एकूण ६ लाख ९ हजार ७५८ रुपयांच्या मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. फरार आरोपींचा शोध सुरू आहे. आरोपींना पुढील कार्यवाहीस्तव अहमदपूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मिरकले यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार योगेश गायकवाड, सूर्यकांत कलमे, राजेश कंचे, तुळशीराम बरुरे, गोविंद भोसले, चालक पोलीस अंमलदार चंद्रकांत केंद्रे, प्रदीप चोपणे यांनी ही सेवा बजावली.

# बहुजन महिला हक्क श्रमिक संघटनेचे धरणे आंदोलन



तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० मार्च -** कष्टकरी महिलांचा सर्व्हे करून त्यांची सामाजिक व कौटुंबिक माहिती जाहीर करावी. कष्टकरी महिलांसाठी स्वतंत्र आर्थिक महामंडळ स्थापन करण्यात यावे, या मागण्यांसाठी बहुजन महिला हक्क श्रमिक संघटनेच्यावतीने जागतिक महिलादिनी शहरातील महात्मा गांधी चौकात संघटनेच्या अध्यक्षा लक्ष्मी कांबळे व सचिव निशा कांबळे यांच्या नेतृत्त्वात धरणे आंदोलन करण्यात आले.

शासनाने कष्टकरी महिलांना वर्षातून दोनवेळा ५० हजारांचे अनुदान द्यावे. कष्टकरी महिलांच्या कामांचे दर निश्चित करावे. कष्टकरी महिलांसाठी स्वतंत्र गृह योजना निर्माण करण्यात यावी. कष्टकरी महिलांच्या अपत्याच्या शिक्षणासाठी शासनाने वेगळी तरतूद करावी, आदी मागण्या करण्यात आल्या. या मागण्यांसाठी आम्ही तीन वर्षांपासून सातत्याने आंदोलने करीत आहोत. परंतु, शासनाकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे. आमच्या मागण्यांचा शासनाने विचार करून त्या पूर्ण कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

# महिलांनी तणावमुक्त जीवनशैलीचा अंगीकार करावा

## दयानंद विज्ञान महाविद्यालयात महिलादिन साजरा

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० मार्च -** आजच्या धावपळीच्या युगात महिलांनी तणावमुक्त जीवनशैलीचा अंगीकार करावा, असे आवाहन दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या सेवानिवृत्त प्राध्यापक स्मिता सौताडेकर-गोजे यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात शनिवारी महिलादिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी त्या प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या. यावेळी पर्यवेक्षिका डॉ. संध्या कोल्हे, पर्यवेक्षिका डॉ.वैशाली पाटील, सीईटी समन्वयक प्रा. कविता जाधव, डॉ. कोमल गोमारे, प्रा. मनीषा बाजपाई यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी प्रा. सौताडेकर म्हणाल्या, महिलांनी कौटुंबिक व इतर जबाबदाऱ्या सांभाळत तणावमुक्त जीवनशैलीचा अंगीकार करावा. स्वतःसाठी किमान अर्धा तास तरी वेळ काढून अध्यात्मिक गोष्टीसाठी वेळ दिला पाहिजे. जेणेकरून तणावमुक्त जीवनशैली अंगीकारता येईल, असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक पर्यवेक्षिका डॉ. पाटील यांनी केले तर आभार पर्यवेक्षिका डॉ. कोल्हे यांनी मानले. यावेळी प्रा. व्ही. एन. अंकुशे व प्रा. बाजपाई यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी अन्य महिला प्राध्यापक, महिला कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# चौपदरीकरणाला टप्प्याटप्प्याने मंजुरी

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० मार्च -** लातूर-टेंभुर्णी या रखडलेल्या रस्ता कामाला अखेर मुहूर्त लागला आहे. मात्र, चौपदरीकरण होणार की नाही याबाबत शंका होती. जनतेची मागणी आणि लोकप्रतिनीधींचा रेटा यामुळे टप्प्याटप्प्याने का होईना सुरुवात झाली आहे. आता काळे बोरगाव ते जवळा या ३७ किमीच्या चौपदरीकरणासाठी ५७४ कोटी रुपये मंजूर झाले आहेत.

या महामार्गाचे काम त्वरीत व्हावे याकरिता लातूर-मुरुड-टेंभुर्णी चौपदरीकरण कृती समितीकडून सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. मुरुड अकोला ते बोरगाव काळे वन साईट ९ मीटर प्रमाणे १२ किमी रस्त्याला मंजुरी दिल्याबद्दल या कृती समितीने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. शिवाय उर्वरित रस्ता कामाचा त्वरीत प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी केली. यावेळी लक्ष्मीकांत तवले यांच्यासह कृती समितीमधील सदस्य उपस्थित होते.


# विवाहानंतरचे कलह टाळण्यास होणार मदत

## जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते विवाहपूर्व संवाद केंद्राचे उद्घाटन

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० मार्च -** वैवाहिक जीवनातील कलहांमुळे अनेक दाम्पत्यांचा संसार मोडतो. त्यांना विभक्त होऊन जीवन जगावे लागते. विवाहानंतरचे असे कलह टाळण्यासाठी आपल्या जोडीदाराला, त्यांच्या कुटुंबियांना समजून घेण्यासाठी, त्यांच्या अपेक्षा जाणून घेण्याबाबत मदत करण्यासाठी जिल्हा परिषदेत विवाहपूर्व संवाद केंद्र सुरू करण्यात आले आहे.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या विवाहपूर्व संवाद केंद्राचे उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी जावेद शेख, संरक्षण अधिकारी गणेश जोंधळे आदी उपस्थित होते.



सध्या विवाहितेला मारहाण करणे, कौटुंबिक कलह, अपमानीत करणे, हे प्रकार वाढत असून, ज्यांना कुटुंब, शिक्षण आणि सामाजिक मूल्यांचे महत्त्व कळलेले नाही, अशांमध्ये वाद-विवादाचे प्रमाण अधिक आहे. सामूहिक कुटुंब पध्दती, बदलती जीवनशैली या कारणांमुळे एकमेकांतील संवाद कमी झाला आहे. त्यामुळे राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा रहाटकर यांच्या संकल्पनेतून येथील जिल्हा परिषदेत विवाहपूर्व मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले आहे.

विवाहापूर्वी आपल्या जोडीदारांविषयी, कुटुंबियांविषयी जाणून घेतल्याने विवाहानंतर होणारे अनेक वाद टाळले जाऊ शकतात. सध्या लग्न जमल्यानंतर नियोजित वधू-वर एकमेकांशी वेगवेगळ्या विषयांवर बोलतात. मात्र, एकमेकांविषयी माहिती जाणून घेणे, कुटुंबियांच्या अपेक्षा यासारख्या विषयांवर अपेक्षित चर्चा होत नाहीत.

त्यामुळे अशी चर्चा घडवून आणण्यासाठी विवाहपूर्व संवाद केंद्र उपयुक्त ठरेल, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी यावेळी सांगितले. तसेच वैवाहिक जीवनात एकमेकांवर विश्वास ठेवून एकमेकांना समजून घेत, एकमेकांचा सन्मान जपण्याला महत्त्व दिल्यास विवाहानंतरचे अनेक वाद टळतील, असेही त्या म्हणाल्या. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

CMYK

# लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## बोळेगाव येथे अवैध शिंदी ताडी विक्री प्रकरणी गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.१० मार्च -**

देवणी तालुक्यातील बोळेगाव येथे अवैध शिंदी ताडी विक्री प्रकरणी देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोमवार, १० मार्च रोजी पोलिसांनी कारवाई करून आरोपीकडून मोठ्या प्रमाणात शिंदी ताडी जप्त केली.



बोळेगाव येथे राहत्या घरी अवैधपणे शिंदी ताडी विक्री करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत चार प्लास्टिक कॅनमध्ये ९० लिटर, कॅरीबॅगमध्ये ३४ लिटर आणि प्लास्टिकच्या बाटलीत २० लिटर, असे एकूण १४४ लिटर आंबट व उग्र वास येणारे शिंदी ताडीचे द्राव्य जप्त करण्यात आले. या द्रव्याची बाजारातील किंमत ११,५२० रुपये इतकी आहे.

या प्रकरणी हेडकॉन्स्टेबल गोरख लामतूरे यांच्या फिर्यादीवरून आरोपी कृष्णाजी रतनाजी चौधरी याच्याविरोधात गु.र.नं. ६२/२५, कलम ६५(ड) मदाका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक कोंडामंगले करत आहेत.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### बोरीत महिला दिनानिमित्त महिलांचा सत्कार

**वाशी, दि.१० मार्च -**

बोरी तालुका वाशी येथे जागतिक महिला दिन येथील भाजप महिला मोर्चाच्या कार्यकर्त्या उज्वला पाटील यांनी अत्यंत उत्साहाचे वातावरणात महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच गावातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या नारीशक्तीचा फेटा व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उज्वला पाटील यांनी महिलांना मार्गदर्शन करताना नारी शक्तीचे महत्व विषध करून घर व संसाराचा गाडा ओढण्याचे काम नारीशक्ती करते. तसेच लाडक्या बहिणीचे दोन हप्ते महिला दिनानिमित्ताने बँकेमध्ये जमा करण्यात आले असल्याचे सांगितले.



### लोहाऱ्यात सावित्रीबाई फुलेंना अभिवादन

**लोहारा, दि.१० मार्च -**

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १२८ व्या स्मृती दिनानिमित्त लोहारा शहरातील महात्मा फुले युवा मंच यांच्या वतीने शहरातील शिवनगर येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन संजय दरेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेवक अविनाश माळी, सुग्रीव क्षिरसागर व्हा. चेअरमन राम क्षिरसागर, श्रीनिवास माळी, राजेंद्र क्षिरसागर, अमोल माळी, संतोष क्षिरसागर, विष्णू क्षिरसागर, आप्पा लोखंडे, अशोक काटे, ज्ञानेश्वर क्षिरसागर, शशिकांत माळी, बंटी माळी, लक्ष्मण क्षीरसागर यांच्यासह समाजबांधव संख्येने उपस्थित होते.



### खानापूरात महिला दिन साजरा

**वाशी, दि.१० मार्च -**

खानापूर तालुका वाशी येथे जागतिक महिला दिन ग्राम पंचायत कार्यालयामध्ये साजरा करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सदस्या छाया शिंदे मुख्याध्यापिका प्रणिता जगताप, वैशाली कदम, राहीबाई छत्रे, संगीता तोडकर, दत्तात्रय छत्रे, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जाणीव संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे यांची प्रमुख उपस्थित होते. महिला दिनानिमित्त ग्रामपंचायत मध्ये सावित्रीबाई फुले व माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी रामभाऊ लगाडे व इतर महिलांचे मार्गदर्शन पर भाषण झाली. अत्यंत उत्साहात जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.



### जयप्रकाश विद्यालयात सत्कार सोहळा

**धाराशिव, दि.१० मार्च -**

जयप्रकाश माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे सत्कार सोहळा संपन्न झाला. सुरज जयपाल जाधव, विविध कार्यकारी सोसायटी संचालक, रुईभर यांना बेस्ट फार्मर पुरस्कार मिळाल्याबद्दल व माजी सरपंच व ग्रा.प. सदस्य बालाजी कोळगे यांच्या ४४ व्या वाढदिवसानिमित्त डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे यांच्या हस्ते हार, शाल घालून सत्कार करण्यात आला. सुरज जाधव यांना वसंतराव नाईक कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्थेतर्फे नागपूर येथे बेस्ट फार्मर म्हणून सन्मानित करण्यात आले होते.

# काठेरी झाडे ठरू लागले जीव घेणे; अपघाताच्या प्रमाणात वाढ

## ▶▶ सार्वजनीक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष...

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१० मार्च -**

शिरूर अनंतपाळ ते आरी मोड ते लातूर जाणारा व आरी मोड ते नळेगाव जाणाऱ्या रस्त्याच्या साईड पट्यावर मोठ्या प्रमाणात काठेरी झाडे झुडपे वाढल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. पण सार्वजनीक बांधकाम विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

शिरूर अनंतपाळ ते लातूर व चाकुर, अहमदपूर जाणाऱ्या वाहनांची संख्या ही मोठी असून या रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात वळणावर काटेरी व इतर प्रकारचे झाडे आल्यामुळे या रस्त्यावर ये जा करणाऱ्या वाहनांचा अनेक वेळा अपघात झाला आहे.त्यामुळे या दोन्ही रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात आलेल्या काटेरी व इतर प्रकारचे झाडे तोडून हा रस्ता मोकळा करण्यात यावे, अशी मागणी महाविकास आघाडीच्या वतीने उपअभियंता यांच्याकडे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे



प्रदेश सचिव महादेव आवाळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने निवेदनाद्वारे करून हा विषय गांभीर्याने घेऊन नागरीकांना होणारा त्रास कमी करावा तसेच होत, असलेले अपघात कमी करण्यासाठी तात्काळ या दोन्ही रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात वाढलेल्या काटेरी व इतर प्रकारचे झाडे तात्काळ काढून टाकून रस्ता मोकळा करून नागरिकांची व वाहन चालकांची होणारी गैरसोय टाळावी नाहीतर आपल्या कार्यालया समोर आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

अनेक वेळा या दोन्ही रस्त्याच्या बाजूने वाढलेल्या काठेरी झाडा झुडपा मुळे होत असलेल्या अपघातामुळे आनेकांना जीव गमवावा लागला तर काही गंभीर जखमी झाले आहेत. यामुळे सार्वजनीक बांधकाम विभागाच्या उपविभागीय अधिकारी व संबंधीत रस्त्याची देखरेख करणाऱ्या कनिष्ठ अभियंता वर कार्यवाही करावी, अशी मागणी वाहन धारकातून होत आहे. या दोन्ही रस्त्याच्या डागडूजी करणे व साईड पट्टी वरील वाढलेले काठेरी झाडे-झुडपे काढण्याचे टेंडर देखील सुटले संबधीत कंत्राटदाराने अर्धवट कामे करून बिल उचल्याची चर्चा तालुक्यातील जनतेतुन ऐकायला मिळत आहे.

या निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे, शिवसेनेचे भागवत वंगे, जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद धुमाळे, सेवानिवृत्त पोलिस अधिकारी अँड. रमेश उंबरगे यांच्या स्वाक्षरी आहेत.

## अवैध वृक्षतोड करणाऱ्यावर तात्काळ कार्यवाही करावी



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१० मार्च -**

निलंगा तालुक्यातील नणंद येथे हजारो झाडाची कत्तल ही बेकायदेशीररित्या केली जात असून या संदर्भात संबंधितावर तात्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रा. अण्णासाहेब मिरगाळे यांनी वन अधिकाऱ्याकडे केली आहे.

निलंगा तालुक्यातील नणंद ता.निलंगा, जि. लातूर) येथील नणंद वनपरिक्षेत्रात बेकायदेशीर हजारो वृक्षाची तोड चालू आहे.

TS ३० T ३२४५ या क्रमांकाच्या ट्रकमध्ये तोडलेले हजारो लाकडे कामगार लोड करत आहेत. वन विभागाच्या परिसरात या क्रमांकाची MH ४६ BK ४५४५ फोरचुनर का थांबली आहे. गोविंद चव्हाण हा कर्मचारी सुद्धा येथे थांबला होता.

कामगारांना व कर्मचाऱ्यास विचारणा केली असता आम्हाला काहीही माहिती नाही. आम्ही कामगार आहोत आम्ही धाराशीवचे आहोत असे त्यांनी सांगितले. संबंधित वृक्षतोड करणाऱ्या गुत्तेदार व कामगारास विचारणा केली असता ते काहीही उत्तर देत नाहीत. वृक्षतोड करण्यासंबंधी काही पत्र आहे का अशी विचारणा केली असता गप्प बसत आहेत.

बेकायदेशीर वृक्षतोड करणाऱ्या व्यक्तीवर व संबंधित अधिकाऱ्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रा. अण्णासाहेब मिरगाळे यांनी वनाधिकाऱ्याकडे पत्राद्वारे केली आहे.

## राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराजांचा १०८ वा जन्मोत्सव उदगीरमध्ये साजरा

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१० मार्च -**

उदगीरमध्ये राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराजांचा १०८ वा जन्मोत्सव विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. सन २००८ पासून, शिष्य उमादेवी अशोक स्वामी यांच्या परिवाराने प्रतिवर्षी हा उत्सव आयोजित केला आहे.

यावर्षी, २ मार्च रोजी सकाळी ६ वाजता शिवालय निवास, बिदर नाका, उदगीर येथे महाद्रअभिषेक पार पडला. या कार्यक्रमात माजी मंत्री आ. संजय बनसोडे, डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज, शंकरलिंग शिवाचार्य महाराज, आचार्य गुरुराज स्वामी यांच्यासह अनेक शिवाचार्य उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी, राष्ट्रसंतांच्या जीवनकार्यावर भाषण देण्यात आले.

शिवभक्तांनी पाळणा व पोवाड्याच्या कार्यक्रमांसह १०८ दीपप्रज्वलन व महाआरती करून जन्मोत्सव साजरा केला. पुढील वर्षी, आ. संजय बनसोडे यांच्याकडे शिवकथेचे आयोजन करण्याची मागणी शिवभक्तांनी केली.

यावेळी महिला भजनी मंडळांनी विविध धार्मिक स्पर्धांमध्ये भाग घेतला. ज्यात शिवशक्ती महिला भजनी मंडळ, बसवेश्वर महिला भजनी मंडळ, सोन्या मारुती महिला भजनी मंडळ आदींचा सहभाग होता.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. अश्विनी इटकर स्वामी यांनी केले, तर आभार अक्षय स्वामी यांनी मानले.

## महिला दिनानिमित्त वलांडी येथे विशेष महिला ग्रामसभा व आरोग्य शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.१० मार्च -**

महिला दिनाचे औचित्य साधून वलांडी ग्रामपंचायतीच्या वतीने विशेष महिला ग्रामसभा तसेच आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

स्त्रिया आज सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने कार्यरत असून, समाजात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करत आहेत. त्यांच्या संघर्षाची, आत्मनिर्भरतेची आणि यशाची कहाणी सांगणारा हा महिला दिन वलांडी ग्राम पंचायत कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या आदेशानुसार विशेष ग्रामसभा घेण्यात आली.

एसबीआय जनरल इन्शुरन्सच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालयात महिलांच्या हस्ते केक कापून शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून ७५ महिलांची बीपी व शुगर तपासणी करण्यात आली.

यावेळी डॉ. आरती घोरुडे, मोना सरवदे आणि गोविंद हरसनाळे यांनी आरोग्य तपासणी केली.

## महिलांनी स्वच्छता व सकस आहाराची काळजी घ्यावी : डॉ. पुजा बिडवे

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१० मार्च**

महिलांनी स्वच्छेते बरोबरच वेळेवर सकस आहार घेणे गरजेचे आहे. चांगला आहार, जास्त पाणी पिणे, प्रोटीनयुक्त आहार खाणे, मासीक पाळीतील काळजी घेणे या विविध विषयावर महाविद्यालयीन युवतीना जागतीक महिला दिनानिमित्त सांस्कृतीक सभागृहात दि.८ मार्च रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग, समाजशास्त्र विभाग, महिला सक्षीमीकरण विभागाच्या वतिने आयोजीत कार्यक्रमात वैधकीय अधिकारी डॉ.पुजा बिडवे मॅडमनी मार्गदर्शन केले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.बी. धालगडे हे होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून ग्रामीण रुग्णालयाच्या वैधकीय अधिकारी डॉ. पुजा बिडवे, बचत गटाच्या समन्वयक सरोजा बिराजदार, व्यासपीठावर प्रा. वर्षा खरोबे, डॉ. जयश्री शिंदे, सुनिता जाधव, प्रा.डॉ. उज्वला पाटील यांची प्रमुख उपस्थीती होती.

यावेळी बचत गटाच्या समन्वयक सरोजा बिराजदार यांनी बचती संदर्भात मार्गदर्शन केले. बचत करणे ही भविष्य काळाची गरज असून बचतीच्या व गटाच्या माध्यमातून आनेक युवतीने स्वताचे व्यवसाय सुरू करून नाव लौकीक केला आहे. त्यामुळे आता पासूनच मुलीनी बचत करण्याची सवय लाऊन घेण्याचे आव्हान सरोजा बिराजदार यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमाचे प्रस्तावीक डॉ उज्वला पाटील यांनी केले. तर सुत्रसंचालन अंकिता हाळ्ळे यांनी केले. तर आभार गायत्री वाले हिने मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक रासेयोच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## श्रीराम विद्यालयात जागतिक महिला दिन विविध उपक्रमांनी साजरा



**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.१० मार्च -**

श्रीराम प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय रेणापूर येथे नेहरू युवा केंद्रा तर्फे जागतिक महिला दिन दि.८ मार्च रोजी विविध उपक्रमानी साजरा करण्यात आला.

याप्रसंगी अध्यक्ष म्हणून रेणूका शिक्षण संस्थेचे संचालक अनिता भातीकरे तर व्यासपीठावर समाजातील समाजसेवी महिला, नेहरू युवा केंद्राचे समन्वयक अविनाश दुमपल्ले, प्राचार्य सिध्देश्वर मामडगे, मुख्याध्यापक सतिष मोरे, अनिल कुटवाड, विवेक भातीकरे, अमृतेश्वर स्वामी, प्रा.एल.आर. शेवाळे यांची उपस्थिती होती.

सावित्रीबाई फूले यांच्या प्रतिमेचे पुजन करून अनुराधा अकनगिरे, माधव बाग, हिना देशमुख, रत्नमाला सूर्यवंशी, मीना चव्हाण, आश्विनी सुरवसे या नारीरत्नाचा सत्कार करण्यात आला. त्यांनंतर किशोरवयीन मुलींच्या कबड्डी स्पर्धा संपन्न झाल्या. यामध्ये श्रीराम विद्यालय रेणापूरचा संघ प्रथम, वीर हनुमान व्यायाम शाळेचा संघ द्वितिय तर प्रभात क्रिडा मंडळाचा संघ तृतीय आला. या विजेत्यांना नेहरू यूवा केंद्रातर्फे ट्रॉफी प्रदान करण्यात आल्या.

या स्पर्धेचे पंच म्हणून सुरेखा बस्तापूरे, महानंदा माने, पुष्पा निकम यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनिता वेल्हाळे यांनी केले. प्राचार्य सिध्देश्वर मामडगे यांनी जागतिक महिला दिनाचे महत्व सांगितले.

तर सुरेखा बस्तापूरे यांनी आभार मानले.


## महिलांच्या विकासासाठी मोबाईल आणि सोशल मिडीयाचा वापर कमी करावा : डॉ. रामप्रसाद लखोटीया

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१० मार्च -**

महिलांच्या विकासासाठी मोबाईल, टी. व्ही., सोशल मिडिया यांचा वापर कमी करण्याचे आवाहन डॉ. रामप्रसाद लखोटीया यांनी केले.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्ररूग्णालय, उदगीर येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी सोशल मिडियाचा अति वापर टाळून, संस्कृतीला शोभेल, असे व्हिडीओ बनवण्याचे आवाहन केले. डॉ. लखोटीया म्हणाले, महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी लढा दिला आहे, परंतु आजही काही ठिकाणी महिलांना घरच्या कारभारातच अडकून राहावे लागते. विज्ञान युगात महिलांनी आपला ठसा उमठवला आहे, परंतु त्यांची सुरक्षा अजूनही प्रश्नचिन्ह आहे. कार्यक्रमात इश्वरप्रसाद बाहेती, डॉ. सचिन चोले, डॉ. सुदाम बिरादार, डॉ. सुरज लवटे, डॉ. माधव, डॉ. समगे, डॉ. मनीषा ढाके उपस्थित होते. यावेळी, महिलांच्या योगदानाचा सन्मान करत, विविध क्षेत्रांमध्ये महिलांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमठवला असल्याचे सांगण्यात आले.

## कै. सुनीता सुरवसे यांच्या स्मरणार्थ महिलांचा गुणगौरव



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१० मार्च -**

९ मार्च रोजी जागतिक महिलादिनानिमित्त महालांचा गुणगौरव व मार्गदर्शन सोहळा कै. सुनीता बळीराम सुरवसे यांच्या स्मरणार्थ महादेव मंदिर, आनंद मंगल कार्यालयात उत्साहात आयोजित करण्यात आला. या सोहळ्यात शहरातील सहा महिलांचा विशेष सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. महिलांनी प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत, संघर्षातून परिवाराचा सांभाळ करत यशाचे शिखर गाठले आहे, यासाठी त्यांचा गौरव करण्यात आला.

सन्मानित महिलांमध्ये कल्पना सूर्यवंशी, महानंदा अंधारे, जयश्री गडदे, सुरेखा शिंदे, शिवकांता शिंदे आणि प्रिया साखरे यांचा समावेश होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. मनीषा शिंदे होत्या, तर मार्गदर्शक म्हणून जिजाऊ ब्रिगेडच्या रेखा सूर्यवंशी उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्यांमध्ये शिवाई गायकवाड, अँड. आकांशा चौगुले, प्रतिभा सूर्यवंशी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाला जवळपास ६०० महिलांनी हजेरी लावली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रीती जाधव यांनी केले, आभार प्रियंका करपे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शुभम सुरवसे, राहुल शिंदे, शिवा सुरवसे, आणि नितीन सूर्यवंशी यांनी परिश्रम घेतले.

## विश्वेश्वरय्या पब्लीक स्कुलमध्ये जागतिक महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१० मार्च -**

श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, आलमला संचलित विश्वेश्वरय्या पब्लीक स्कुल लातूर येथे महिला दिनाचे औचित्य साधून जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

प्रा.डॉ. प्रमोद पाटील, डॉ. मेघा साळुंके, सचिव बसवराज धाराशिवे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. महिलादिनाचे औचित्य साधुन महिलांसाठी आपत्ती व्यवस्थापन या विषयावर डॉ. प्रमोद पाटील व डॉ. मेघा साळुंके यांनी मार्गदर्शन केले.

विविध क्षेत्रात आपले नाव लौकिक केलेल्या थोर व नामांकित महिला व्यक्तीमत्वाची वेशभुषा परीधान करुन स्कुल मधील मुली कार्यक्रमास उपस्थित होत्या. डॉ. मेघा साळुंके म्हणाल्या, महिलांना समाजात अधिक संधी प्राप्त झाल्यास त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळेल. महिलांच्या क्षमतांवर विश्वास ठेवुन संधी दिल्यास त्या काय करू शकतात हे अनेकवेळा दाखवून दिले आहे. परंपरा, रुढी आणि समाजाच्या संकोचित प्रवृत्तीमुळे अनेक महिला उपेक्षित राहिलेल्या आहेत.

आपल्या आसपास पाहिल्यावर लक्षात येते की महिलांना ज्या-ज्या क्षेत्रात संधी मिळाली त्या-त्या सगळ्या क्षेत्रात महिलांनी आपले वेगळेपण सिध्द करून दिले आहे, असे मत डॉ. साळुंके यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वतीतेसाठी राधिका गुरव, रुपाली वाडकर, प्रियंका मुसने, सोनाली स्वामी, मेघा मुळे, संजीवनी शिंदे, आर्या बाबुटी, पुजा साठे, पुनम माने, पवन बिराजदार, विला सगरे, श्रीकांत क्षिरसागर, अक्षय मुंडे यांनी परीश्रम घेतले.

